# TIGHT BINDING

UNIVERSAL
LIBRARY
OU_192592
UNIVERSAL
LIBRARY

OUP—390—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M83 Accession No. M1671

Author S46H

Title

This book should be returned on or before the date last marked bel

# हिंदोळ्यावर

विभावरी शिरूरकर, बी. ए.

प्रकाशक—हरि विष्णु मोटे, प्रतिभा कचेरी, मुंबई

किमत सव्वा रुपया

प्रथमावृत्ति, एप्रिल १९३४

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क
प्रकाशकाचे स्वाधीन.

मुद्रक:
मं. ना. कुळकर्णी, प्रोप्रायटर, कर्नाटक प्रिंटिंग प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २

# हिंदोळ्यावर

# हिंदोळ्यावर

शामला माणिकच्या स्वाधीन करून अचला घरीं जायला निघाली. “ हें काय, जातेस इतक्यांत ? ”

“ हो ग, जातें; बाबा आला असेल घरीं. ”

“ अग तो कसला येतो इतक्यांत ? तो आतां संध्याकाळपर्यंत येत नाहीं ! ” माणिक म्हणाली. माणिक व अचला दोघी हंसल्या. माणिक-पेक्षां अचलेचें हंसणें जरा निस्तेज होतें खरें. ती लगेच म्हणाली, “ नाहीं ग, आज तो मला डॉक्टरकडे घेऊन जाणार आहे डोळे तपासायला. ”

“ ताई, बाबा येत नाहींत, मी सांगतें तुला. त्याच्या लक्षांतसुद्धां नाहीं राह्यचं हो आतां ! ”

“ माणिक, तुला माहीत नाहीं बाबाचं बहिणीवर प्रेम किती आहे तें. असे भाऊ मिळायलासुद्धां भाग्य लागतं. ”

“ वा, वा, जणुं तुझा भाऊ नू माझा नाहींच जसा ! ”

“ तुझा आहे नि माझाहि आहे. पण तुझ्या संसारांत तूं इतकी गढली आहेस, कीं तुला तें दिसून येत नाहीं.— ”

" आणि त्याच्या संसारापुढें त्याला बहिणी दिसायच्या नाहींत ! " माणिक हंसत म्हणाली.

" त्याला अजून अवकाश आहे." अचलेला आपल्या भावाचें आपल्याकडे दुर्लक्ष होत असल्याची जाणीव करून घेणेंसुद्धां जिवावर येत होतें. ती शामला म्हणाली, " शाम, जाऊं ना आतां मी ? भुर्र् जातें हं. "

" भू ! " शाम काय एका पायावर तयार होता. तो लागलाच दुडदुड धांवत डोक्यावर टोपी घालण्यासाठीं खुंटीजवळ गेला आणि पाय उंच करीत " पोपी " म्हणत आळीपाळीनें मावशीकडे व टोपीकडे पहात राहिला.

" डोक्यावर पोपी न् बाकी उघडा भोंपळा ! " अचला हंसत म्हणाली. शामला कोण घाई झाली ! तो पुन्हां तिच्याकडे धांवत आला व तिचे ओंचे धरून उभा राहिला.

" माछी, भू "

" आतां उद्यां जाऊं हं. "

छेः त्याला कुठला विश्वास. तो तिला मुळींच सोडीना. मावशी, मामा, वडील, आई, घरांतील कोणीहि " भुर्र " निघालें, कीं त्याच्या बरोबर सलगी करून, वेळीं हट्ट धरून, रडून, हक्क शावीत करावयाचा, ही त्याची नेहमींचीच तऱ्हा होती. बाबांनीं, नाहीं तर मामांनीं डोक्यावर टोपी घातली, आई, नाहींतर मावशी पदर सोडून उभ्या असल्या, कीं तो " भुर्र " म्हणून समजे. शामचा डोळा चुकवून

जायचें, म्हणजे " जायचें " म्हटल्यानंतर खरोखर जायला पंधरा मिनिटें तरी लागत. त्यांतून शामला मावशीचा किती तरी ओढा होता.

" कुंदा कुणाची ? "—" आईची " आणि " शाम कुणाचा ? " " माछीचा " असला तोंडी कबुली जबाब दिवसांतून अनेक वेळां तो मावशीजवळ देत असे. कुंदा झाल्यापासून माणिकचा बराच वेळ कुंदेच्या परिचारांत जाई. अचलेला शामचे लाड करायला पुरेसा वेळ होता. शामला इकडे हिंडव, तिकडे हिंडव, पोराहून पोर होऊन त्याच्या बरोबर खेळ. यामुळें शामच्या बंडाईला अचलेजवळ अधिक अवसर मिळे. दोन मुलांच्या मागें राहतां राहतां नाकीं नऊ आलेल्या माणिकलाहि तें सोईचें असे. शाम सबंध दिवसभरसुद्धां मावशीजवळ राही. पण रात्रीं मात्र आईच्या पुढें, नाहीं तर पाठीशीं निजून कुंदेकडे तोंड न करितां आपल्याकडे तोंड करून निजण्याबद्दल तो आईजवळ हट्ट घेई. आईच्या अंगावर आपला चिमकुला हात टाकून " आतां आई माझी, कुंदेची नाहीं. " या गोड समाधानानें स्वारी क्षणार्धांत झोपीं जाई.

माणिक म्हणाली, " जा घेऊन ये त्याला. संध्याकाळीं येतील हे न्यायला. "

अचलेला मध्येंच कसलीशी आठवण झाली, " अगबाई, माणिक, गुलाबाची आठवणच नाहीं कीं ग. तूं गेली होतीस बागेंत ? परवां बागेंत तीन कळ्या पाहिल्या होत्या. आज उमलल्या असतील नाहीं ? " अचला उत्कंठेनें बागेकडे जायला निघाली. " अग, कसले गुलाब न्

कसलीं फुलं. आतां हौस नाहीं, मौज नाहीं. या मुलांचं करतां करतां तोंड वर काढायला होत नाहीं. ”

“ होय रे शाम ? आईला छळतां का रे ? ” शाम रडायला लागला. “ माछी मी. ”

“ गुलामा, माछीला कांहीं उद्योग नाहीं कीं काय ? ” असें म्हणून तिनें त्याला लटक्या रागानें उचलून घेतलें व त्याचे पटापट मुके घेत ती बागेकडे निघाली.

“ आतां आपऽण बागेकडे जाऊंऽऽ ”

“ अचलेनें बरोबर आणल्यामुळें खुशींत असलेला शाम म्हणाला, “ जाऊंऽऽ ” तिच्याप्रमाणेंच त्यानें स्वर ओढल्यानें अचलेला हंसूं आलें. ती म्हणाली, ” आणीऽऽगुलाबाचंऽफूल तोडूंऽऽ ”

“ तोलूंऽऽ ”

“ आणि मऽऽग आमच्याऽऽशामच्या पोपींत घाऽऽलूंऽऽ ”

“ घाऽऽलूंऽऽ ” शाम अगदीं पोपटासारखा बोलत होता.

“ बघ कछं आहे छान छान ! ” अचलेनें गुलाबाकडे प्रसन्नतेनें पहात म्हटलें. फुलांचा मोहक गुलाबी रंग पाहून, शामही खालीं उतरण्यासाठीं धडपडूं लागला. “ माऽनाऽ ”

“ माना काय ? हात नाहीं हो लावायचा ! काते आहेत. तोचतील ” कांटा टोंचल्याचा लटका आविर्भाव करीत ती म्हणाली, “ सूऽऽ , हा. ”

# हिं दो ळ्या व र

" नाहीं, माना "

" नाहीं. नाहीं. नाहीं. तो पाहिलास का पोपट ? " शामला फुलांचा विसर पाडण्यासाठीं झटकन् दुसऱ्या बाजूला वळून अचला म्हणाली. तिनें गुलाबाकडे पाठ केली, पण शाम तिच्या खांद्यावरून मागें वळून फुलांकडेच पहात होता.

" माना फू. "

" अस्सा आहेस अगदीं. " अचलेनें त्याला एक कोऱ्हांटीचें फूल तोडून दिलें. त्यानें त्या फुलाच्या केव्हांच पाकळ्या पाकळ्या करून टाकल्या. आणि पुन्हां इवल्याशा हातानें गुलाब दाखवीत तो म्हणाला, " फू "

" शाम, पाकळ्या पाकळ्या केल्यास ना त्या फुलाच्या ? आतां फू बी कांहीं नाहीं. "

शामच्या आत्मप्रतिष्ठेला केवढा धक्का बसला ! जगांत येऊन अवघीं एक दोन वर्षें सुद्धां पुरीं न झालेला शाम—तो घरांत राजा होता. आई, वडील एवढेंच नव्हे, तर घरीं येणारा जाणाराला सुद्धां त्याचा केवढा शह असे ! त्याला पाहिजे असणारी प्रत्येक गोष्ट त्याच्या मर्जीप्रमाणें करावयास लावण्यांत तो पटाईत झालेला होता. अधिक शब्द वायां न दवडतां, दोन दोन अक्षरी एकेकाच शब्दांत सर्व वाक्याचा अर्थ खचून भरून तो जेव्हां घरांत बोले, तेव्हां आपल्या गोड वाणीला भुलून थोर माणसेंही कशीं पोर होतात, याचा त्याला पुरता अनुभव होता. त्याचें हंसणें, त्याचें खेळणें, त्याचीं एकशब्दी

वाक्यें–त्याच्या सगळ्या गोष्टींनीं घरांतील माणसें वेडावून जात. अमुक गोष्ट पाहिजे असून त्याला मिळणार नाहीं ? त्याला आपलें स्वत्त्व कसें राखायचें याची पुरी जाणीव होती. मावशीच्या अवज्ञेचा त्याला राग आला.

“ फूऽऽ ” म्हणून त्यानें अमोघ अस्त्र सोडलें. गालावरून अश्रू ओघळले सुद्धां. त्या अश्रूंचा प्रभाव त्याला माहीत होता.

“ शाम, कमाल आहे बाई तुझी. ” अचलेनें लालभडक जास्वंदीचें फूल तोडून त्याच्या हातीं दिलें. गुबगुबीत गालावर अर्धवट आलेले अश्रू अनुयायांच्या अभावीं तेथेंच थबकले. शामच्या तोंडावर व डोळ्यांत हास्याची लकेर झळकली. “ पाकळ्या नाहीं हं काढायच्या. ” तिनें त्याचे डोळे पुसले.

“ हं. ”

“ आईलाऽफूऽऽल दाखवूंऽहं ? ”

“ आई फू. ” समाधानानें फुलाकडे बघून आपल्या गोड वाणीनें भुरळ घालीत असतांना, शामला फुलांच्या पाकळ्या तोडून आत्मसात् करण्याची अनिवार इच्छा झाली. सुंदर वस्तु त्रयस्थपणें दुरून बघण्यापेक्षां ती माझ्याजवळ आहे म्हणण्यांत किती आनंद असतो ! त्यापेक्षांही “ त्या सौंदर्याचा मनमुराद उपभोग मी घेईन. ” ही इच्छा किती बलवत्तर असते ! मावशी बागेंतील उनाड रोपटीं तोडून टाकण्याच्या नादांत असतांना, शामला त्या फुलाचें सौंदर्य छेडून पहाण्याच्या विचारानें वेडावून टाकलें.

" शाम, फुलाच्या पाकळ्या काधू नये अं. "

" नये " म्हणत शामनें एकेक पाकळी तोडलीसुद्धां.

" ताई ! " अचलेनें दचकून मागें पाहिलें.

" अगबाई, किती दचकलें ! चच्च् शाम, कुस्करलंस ना फूल एकदांचं ? तुमचा मुलगा अगदीं व्यतीपात आहे बाई. " भाऊसाहेबांना उद्देशून अचला म्हणाली.

" थोडासा मावशीच्या वळणावर गेला आहे. "

" होय का रे गुलामा ? " शामनें कांहीं न बोलतां " होय " असें मानेनेंच उत्तर दिलें. दोन पाय पसरून पाकळ्या तोडण्यांत तो गढून गेला होता. शब्द खर्च करण्याइतकी सवड त्याला होती कुठें ?

" भाऊसाहेब, तुम्हीं जा घेऊन स्वारीला. आतां मी जातें. "

" नको बुवा. मी जातों आहें दुसरीकडे."

" असं काय हो ? अजून सुद्धां लाजतां कीं काय मुलाला घ्यायला ?"

" हट्, लाजायचं काय त्याच्यांत ? "

" खरंच, माणिक सांगत होती मला, कीं शाम दोन महिन्यांचा होता तेव्हां ती माहेरीं होती. आणि एकदां आसपास कुणी नाहींसं पाहून, तुम्हीं शामला हातांत घेतलं आणि इतक्यांत काकू आली न् म्हणाली, " अग बाई, मुलाचं कौतुक चाललं आहे वाटतं ? " तेव्हां

ओशाळे होऊन तुम्हीं त्याला खालीं ठेवलंत. ” भाऊसाहेब या आठवणीनें मनापासून हंसले.

“ काय बुवा, बिलबिलित पोरं ! काय त्यांना आकार का विकार ! मानसुद्धां सावरत नाहीं. कसं घ्यायचं त्यांना ? गोळे नुसते ! ”

“ म्हणून लाजलांत होय ? ”

“ अरे अरे ! कांटे टोंचतील.” भाऊसाहेब शामकडे पाहून ओरडले.

“ काय बाई तरी. गेलास का तिकडे. अगदीं धडपड्या आहेस नुसता. ” शाम चोरासारखा उभा राहिला. त्याला घेत ती म्हणाली, “ भाऊसाहेब, परवांचं तुमचं तें गुलाबाचं कलम चांगलं आहे कीं. रंग छान आहे आणि फूल पण डवरलेलं आहे. ”

शाम अधाशासारखा फुलाकडे पाहूं लागला.

“ आतां अश्शी चपराक मिळेल एक. सांग, आईचं फूल कोणतं ? ” शाम बोटानें फुलें दाखवूं लागला.

“ बाबाचं ? भाऊचं ? आणि माझं ? ” शामनें मागें वळून कण्हेरीच्या झाडावरचें किडलेलें, खुरटलेलें फूल दाखवलें.

“ अरे गुलामा ! ”

“ खरं सांगतो आहे तो ! ” भाऊसाहेब म्हणाले.

अचला एकदम खिन्न झाली. “ खरं आहे तो सांगतो तें. वास नाहीं, घाण नाहीं, रूप नाहीं, रंग नाहीं; किडलेलं, खुरटलेलं फूल हें माझं प्रतीक आहे खरं. ” ती स्वतःशींच म्हणाली.

# हिंदोळ्यावर

" ताई, वाच हें " भाऊसाहेबांनीं वर्तमानपत्रांतील एका कॉलमवर बोट ठेवून तिला म्हटलें. तिनें शामला भाऊसाहेबांच्या हातीं देत वाचायला सुरुवात केली. झरझर फिरणाऱ्या डोळ्यांनीं एकेक अक्षर ओढून घेऊन तिच्या हृदयांत अस्वस्थता माजवून टाकली. " शाम, आतां मावशी नको ना ? " अचलेनें मनाचे आवेग जेथल्या तेथें रोधून म्हटलें. भाऊसाहेबांना तिच्या या बाह्यतः धीरवृत्तीचें कौतुक वाटलें. अचलेला सहानुभूतीचा एक शब्दही ऐकण्याची इच्छा नव्हती; कारण उकळतें तेल जलबिंदूच्या स्पर्शानेंही कडकडूं लागतें.

## २

अचलेच्या स्वभावाबद्दल भाऊसाहेब व माणिक या पतिपत्नींत बोलणें निघे, तेव्हां " ताई भारी खंबीर अंतःकरणाची आहे " यावर त्या दोघांचेंही एक मत होई. पण तिच्या स्वभावानें भाऊसाहेबांच्या मनांत एकप्रकारें कुतूहल निर्माण झालें होतें. अचलेच्या मनाच्या सगळ्या रंगछटा कळणें, हें तितकेंसें सोपें काम नव्हतें. त्या रंगछटा हुडकून पाहण्याची तीव्र जिज्ञासा भाऊसाहेबांना असे. अचला कशी आहे, हें त्यांना माणिकपेक्षां अधिक कळलें होतें.

अचला घरीं गेल्यावर, असेंच बोलण्यावरून बोलणें निघालें; तेव्हां एकदम कसलीशी आठवण होऊन माणिक म्हणाली, " अग बाई, ताई अशी तशी नाहीं हो. मला तेव्हांचं आठवतं अजून. ताईचं लग्न झाल्यावर सहा महिन्यांनीं ती माहेरीं म्हणून आली. त्याला सुद्धां

महिना दोन महिने झाले. एक दिवस सकाळीं आम्हीं झोंपाळ्यावरच बसलों होतों दोघी. इतक्यांत नानासाहेब बाहेरून आले, त्यांचा चेहरा काळवंडून गेला होता. म्हटलं, ' झालं काय बाई.' चांगले रडल्यासारखे दिसत होते. आम्हीं दोघी चरकलों, ते आमच्याशीं कांहीं न बोलतां, तडक दिवाणखान्यांत कोंचावर जाऊन पडले. व डोळे टिपूं लागले. आई लगबगीनें जवळ जाऊन म्हणाली, ' काय झालं ?' ते काय बोलले, हें आम्हांला ऐकूं आलं नाहीं. आईही रडूं लागली. मी हळूच आईजवळ जाऊन म्हटलं, ' आई, काय झालं ?–'

' अचल, कपाळ फुटलं ग तुझं.' ' ताई ताड्कन् उभी राहिली. ' नाना पाहूं पत्र.' नानासाहेबांनीं तिच्या हातीं पत्र दिलें, तिनें तें वाचलें. विनायकराव वारल्याची हकीकत त्यांत होती. आम्हीं तिघं रडत होतों. ताईचा चेहरा चमत्कारिक झाला. ती कटोर-पणानें जमिनीकडे दृष्टि खिळवून झोंपाळ्यावर बसली. तिच्या डोळ्यांतून टिपूससुद्धां आलं नाहीं. ' काय कठोर आहे ही !' आम्हां तिघांनाही असं वाटल्याखेरीज राहिलं नाहीं. ' नवरा मेला, तरी डोळ्यांत पाणी येत नाहीं.' आमचे डोळे तिच्यावर खिळले. तिलाही त्याची जाणीव होतीच. शेवटीं ती कांहींशा घोगऱ्या आवा-जांत म्हणाली, ' रडतां काय ? कांहीं रडूं नका.' आम्हांला तिच्या या अमानुष वागण्याचा अर्थच कळेना. आम्हीं दुःखांत चूर होतों. आणि तिच्या चेहऱ्यावर कठोरतेशिवाय कांहीं नव्हतें. शेवटीं आई म्हणाली, ' अचल, समजायचं काय आम्हीं, तुझ्या अशा वागण्यानं ?''

‘ आई, त्यांना कांहीं सुद्धां झालेलं नाहीं. ’

दोन महिन्यांत ताईला विनायकरावांकडून बोटभर चिठ्ठीसुद्धां आली नव्हती. मग ती असं काय बोलते ! कांहींच कळेना. ती कांहीं बोलली नाहीं. नेहमींप्रमाणें तिनें वेणी कुंकू यथास्थित केलं. आम्हांला तिच्या अशा वागण्याचा तिटकारा सुद्धां आला थोडासा. नानासाहेब शेवटीं रागावले. तेव्हां मात्र तिच्या डोळ्यांतून खळखळ पाणी आलं. ती म्हणाली, ‘ नाना, आज दोन महिने पकडवॉरंटं निघालीं आहेत. तीं चुकविण्यासाठीं या गांवचे त्या गांवाला असे गुप्तपणें हिंडताहेत. त्यांनीं मला सांगितलं कीं, अशानं जर निभलं नाहीं तर, मेल्याची अफवा पसरवीन. तें पत्र असंच कुणीतरी साव-कारानं लिहिलं आहे. ’ आम्हां सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. दोन महिने ताईला घरीं येऊन झाले होते. पण तिनें यजमानांचा इतकासुद्धां उणेपणा सांगितला नाहीं. ती मुळीं सासरचं कांहीं बोलतच नसे. आम्हांला कल्पनासुद्धां नव्हती तिच्या परिस्थितीची. इतकी नवऱ्याच्या अब्रूवर पांघरूण घालणारी बायको अन् कुठला मेला भिकार नवरा तिच्या नशिबीं आला पहा ! ”

अचलेला संसाराची किती हौस होती ! विनायकरावांबरोबर लग्न झालें, तेव्हां तिला किती धन्यता वाटत होती. नुकतेंच लग्न झालेल्या प्रत्येक मुलीला ‘आपल्याला कांहीं तरी विशेष स्थान प्राप्त झालें.’ याचा एक प्रकारें अभिमान वाटत असतो. याच दृष्टीनें अचलाही सभोंवतालीं

पहात होती. तिचे चुलते अत्यंत प्रेमळ होते. पोरक्या अचलेला व बाबाला त्यांनीं लहानाचीं मोठीं केलीं. अगदीं आपल्या पोटच्या मुलीसारखी –माणिकसारखी–अचलेला त्यांनीं वाढविली. अचला व माणिक या दोघींनाही आपण चुलत बहिणी आहोंत, हा विसर पडला होता. अचला माणिक-पेक्षां चार वर्षांनीं मोठी होती. तरी त्या बहिणी बहिणीच नव्हेत, तर मैत्रिणीही होत्या. अचला इंग्रजी सहावींत असतांना तिचें लग्न केलें. अचलेचें लग्न ठरलें, तेव्हां दोघींना एक प्रकारें आनंद झाला. दोघींचीं नाना तऱ्हांनीं रहस्यें चालत. लग्नाच्या आदल्या दिवशीं आनंदी वृत्ति असली, तरी दोघींच्याही मनांचा गोंधळ उडाला होता. अचलेला भावी आयुष्याच्या अज्ञातपणानें, तर माणिकला आपली जीवाभावाची मैत्रीण दुरावणार व आपण एकट्या राहणार, या कल्पनेनें गोंधळल्यासारखें झालें होतें. अचलेला जांवयाच्या हातीं देतांना तिच्या चुलत्या चुलतीला आनंद झाला असला, तरी त्यांचे डोळे वारंवार पाण्यानें भरून येत. भटजींनीं खड्या सुरांत मंगलाष्टकें म्हणून नानासाहेब, सीताकाकू, माणिक यांच्या हृदयांत वाढवलेली कालवाकालव शेवटच्या टाळीनें अश्रुरूपानें ओघळूं लागली. माणिक तर हुंदके देऊन रडूं लागली. अचलेला माणिकच्या किंवा काका-काकूंच्या अकृत्रिम प्रेमाची पूर्ण जाणीव होती. कितीही नाहीं म्हटलें, तरी लग्नानें अचला घरा-पासून दुरावलेली होती. विनायकरावांच्या घरीं सर्व आनंदीआनंद होता; चार महिने अचलेच्या कानांत संसाराच्या नांदीचे मधुर स्वर तरंगून राहिले होते. तिला पुढील दुःखान्त कथेची कल्पनाही नव्हती.

तिची विनायकरावांवर पूर्ण श्रद्धा होती. त्यांच्या चांगल्या गोष्टी दुसऱ्यांना सांगून, वाईट गोष्टींकडे कानाडोळा करण्याचा पत्नीधर्म ती कसोशीनें पाळीत होती. पुढें बिचारीला सासरच्या मायानगरीचें स्वरूप कळूं लागलें. ती अंतःकरणांत दुःखी होऊं लागली. विनायकरावांनीं थोडें थोडें, पण जागोजाग करून ठेवलेलें कर्ज बोलूं लागलें. त्यांची अब्रू जागजागीं विरलेल्या कपड्याप्रमाणें झाली होती. त्या विरलेल्या, फाटलेल्या अब्रूनें बाहेर हिंडणेंही त्यांना असह्य झालें. कोणाही कर्जदारानें वाटेंत अडवून त्यांना विचारावें, " काय राव, किती दिवस तुमच्या बुटासुटाची भीड बाळगावी ? " विनायकरावांच्या मनाला डंख लागत. त्याचा वचपा म्हणून ते अचलेवर रागावूं लागले. तिचा बिचारीचा काय दोष ! इंग्लंडहून आलेले पतिराज, पांच हजार हुंडा देऊन तिनें विकत घेतले असले, तरी ती आर्यपत्नी होती. ती सर्व सहन करी. विनायकरावांना कर्ज कां ? हें तिला कळलें नव्हतें; कोणालाच कळलें नव्हतें. कर्जदारांचा भुंगा टाळण्यासाठीं अचलेला माहेरीं पाठवून विनायकरावांनीं घरांतून पळ काढला, तेव्हां गांवांत डंका वाजला. पण तो तिच्या माहेरच्या माणसांच्या कानीं आला नव्हता. तीही माहेरीं त्याबद्दल अवाक्षर बोलली नव्हती. शेवटीं विनायकरावांनीं बऱ्याच मोठ्या किंमतीचें रहातें घर विकून कर्जदारांची भरपाई केली. त्या गरिबींतही अचलेनें सुख मानलें असतें. पण विनायकराव तिच्या देखत दारू पिऊं लागले. नित्य नव्या बायकांना घरीं आणून नरकांत लोळूं लागले. त्या बायांची सेवा कर-

प्यासाठीं अचलेला फर्मानें सोडूं लागले. ती ऐकेना. तिला मारझोड नाना तऱ्हांनीं होऊं लागली. विनायकराव अक्षरशः पशू बनले. शेवटीं त्या सर्वच प्रकारांची शिसारी आल्यानें, तिनें माहेरीं येऊन विनायकरावांना नरकाचा मार्ग निर्विघ्न करून दिला.

किती आवडी हौशीनें चुलत्यानें तिचें लग्न करून दिलें होतें! विनायकरावांनीं पाश्चात्य सुधारणेचीं काय काय पुटें अंगावर चढविलीं होतीं, याची त्यांना काय, कुणालाच कल्पना आली नव्हती. आपल्या मुलीप्रमाणें मानलेल्या अचलेच्या जन्माची धुळधाण झालेली पाहून, चुलत्याला धक्का बसल्याशिवाय राहिला नाहीं. अचला पुन्हां सासरीं जाणें शक्य नव्हतें. एकादी तारका अभिमानानें व आनंदानें चमचमूं लागावी आणि क्षणार्धांत निखळून निस्तेज व्हावी, तशी अचलेची अवस्था झाली. येवढेंच नव्हे, तर तिचें अंतःकरण सुद्धां त्या तारके-सारखेंच फत्तराचें झालें होतें. दुरून रम्य दिसणाऱ्या हिरवळीवर विश्वा-सानें पाऊल टाकतांच इंगळीनें डंख द्यावा, तशीच मोहक संसारांत पाऊल ठेवतांच तिची अवस्था झाली. तिच्या वेदना प्रतिक्षणीं वाढल्या. अचलेच्या चुलत्यानें तिला पुन्हां शाळेंत घातली. ती बी. ए. झाली. लगेच तिचीं चुलताचुलती दोघेंही वारलीं. तिला माहेरीं आधार काय तो तिच्या भावाचा—बाबाचा. अचलेच्या आयुष्याचा हा चित्रपट पहात असतांना, बाबाचा पंचवीशींतील कठोरपणा कोठल्याकोठें विरून गेला होता. बाबा आणि अचला! त्या दोन बहीणभावंडांच्या अकृ-त्रिम प्रेमाचा कोणालाही हेवा वाटला असता.

अचला माणिकच्या घरून निघाली. त्या बोटभर वर्तमानपत्राच्या तुकड्यानें तिच्या अंतःकरणांत काहूर उठविलें होतें. कित्येक दिवसांनीं पुनः दुःखद आठवणी ताज्या झाल्या होत्या.

## ३

दारूच्या नशेंत एका वेश्येला जखमी केल्याचें तें वृत्त होतें. विनायकरावाशीं आपला कांहीं संबंध नाहीं, अशा अभिनिवेशांत ती वागत असली, तरी अंधारांतून वर्मी घाव बसावा, तशी तिची अवस्था झाली. "बाबासाहेब जोशी, इंजीनीयर यांच्या भगिनी, अचलाबाई लोणकर बी. ए., यांचे पती विनायकराव लोणकर, यांना दारूच्या नशेंत वेश्येला जखमी केल्याच्या आरोपावरून आज रोजीं पोलीसांनीं अटक केली."

गोफणीनें सहजासहजीं फेंकलेला बारीकसा दगड वर्मी लागून आकाशांत भ्रमण करणारा पक्षी घायाळ होतो. बिचाऱ्या बातमीदाराला कल्पनाही नव्हती, कीं आपल्या या शब्दांच्या गोफणीनें एका स्त्रीच्या हृदयाला आपण किती खोल जखम करणार आहों ! त्याला कोठून कल्पना असणार ! आणि नाहीं तरी जगांत असेंच नाहीं का? कोठेंतरी, कोणी-तरी वाऱ्यावर बोललेला एकादा शब्द, कोठेंतरी, कोणातरी व्यक्तीच्या आयुष्याचें हितानहित करतो. तसेंच हें झालें. दडपून थोपटून निजविलेलें मूल हुंदके देत देत झोंप घेत असतें, तसें अचलेनें आपलें दुःखी मन दाबून दडपून निजवलें असलें, तरी त्याचे दुःखाचे निःश्वास शमले नव्हते. आज तर त्याची झोंपही पुरी चाळवली.

# हिंदोळ्यावर

बाबासाहेब, अचला, पति, विनायकराव, नशा, वेश्या, अटक ! कसे दुवे नशिबानें जोडले होते पहा ! ही गुणांची उतरती भांजणी करणारा " पति " हा एकच दुवा. त्यानें सर्वांच्या तोंडाला काळिमा आणला होता. जोंपर्यंत अचला अगर विनायकराव कुणीही हयात असणार, तोंपर्यंत त्यांचीं चालतीं बोलतीं पापें आपली काळी छाया अचलेवर टाकल्याशिवाय राहणें शक्य नव्हतें. विनायकरावांच्या घरून आल्याला इतकीं वर्षें झालीं, तरी अचलेला विनायकरावांची आठवण दुःसह होई. आज तर घरांत कोणी नसल्यानें, तिनें आपल्या दुःखांना रडून मोकळी वाट दिली.

अवघें अठरावें वर्ष. त्यावेळीं शरीरांत आणि मनांत कोठल्या गुप्त शक्ति अंकुरित होतात कोण जाणे ! आशा, इच्छा, उत्कंठा, कुतूहल, आत्मा, जणूं सहस्र नेत्रांनीं चौफेर न्याहाळूं लागतो. साऱ्या भावना सुखाचा बालेकिल्ला सर करण्यासाठीं दबून तयारीनें राहतात. त्यांना आपल्याहून निराळ्या अशा नेत्याची जरूरी असते. त्यावेळीं 'उत्साह' हाच मंत्र असतो. आनंदाच्या ऊर्मी हृदयांत उसळत असतात. अविचार ? अविवेक ? छेः ! त्यावेळीं कोणताच अविचार नाहीं. कोणताच अविवेक नाहीं. अविचार, अविवेक यांनींच तर तारुण्याला सारा रंग भरला आहे. कोण ती आत्मनिष्ठा ! कोण तो आत्मविश्वास ! तारुण्यानें मुसमुसलेली स्त्री वा पुरुष जणुं जगाला आपल्या भोंवतीं गरगर फिरवीत असतात. म्हाताऱ्याकोताऱ्यांना वाटतें, " काय हा उन्माद !" उन्माद ? त्या उन्मादांतच मनुष्याचा दैवी अंश जगाच्या प्रत्ययाला

आणण्याचें सामर्थ्य आहे. त्या उन्मादांतच जन्माची सार्थकता प्रत्ययाला येत असते. जगाची फिकीर नाहीं, अशा त्या बेछूटपणांतच जगाचें संक्रमण तरुण करीत असतात. पण असे बेछूट भासणारे तरुण काय अगर तरुणी काय, कितीही "नाहीं" म्हटलें तरी अंतःकरणांत साद घालीत असतात. त्यांना कुणाची तरी—आपल्यापेक्षां निराळ्या जातीच्या कुणाच्या तरी हुंकाराची अपेक्षा असते. तितक्याच, किंबहुना अधिक आशेनें, उत्कंठेनें, कुतूहलानें दिलेल्या त्या सात्विक हुंकारांतच स्त्रीपुरुषांचा आत्मिक विकास व्हावयाचा असतो. तरुण हृदयाला तरुण हृदयानें दिलेल्या हुंकारांतच तारुण्याचें खरें उन्मीलन व्हावयाचें असतें, त्यांतच जीवनांतील चैतन्य कायम ठेवण्याची शक्ति आहे. ती शक्ति अद्भुत आहे. त्या साद घालणाऱ्या हृदयाकडे दुर्लक्ष करून भागत नाहीं; कारण स्त्रीला अगर पुरुषाला केवळ बुद्धीच्या जोरावर मिळविलेलें यश व धन एकलेपणाच्या आगीनें कःपदार्थ वाटूं लागतात. जीवनांत जादू नाहीं, रस नाहीं, म्हणून कित्येकांना आत्महत्या करण्याचा मोह होतो, तो तारुण्यांतील या हुंकाराच्या अभावींच !

अचलेच्या तरुण हृदयाला हुंकार देणारें हृदय तरुण नव्हतें, किंबहुना तो हुंकारही नव्हता. तरुण हृदयाचें कुतूहल, त्याची उत्कंठा, त्याचा सात्विकपणा त्यांत नव्हता. विनायकरावांनीं सर्व केलेलें, सर्व अनुभविलेलें होतें. त्यांच्यांतील सात्विक उन्माद केव्हांच नष्ट झाला होता. तरुणांच्या स्वर्गीय स्वप्नसृष्टींतून ते केव्हांच बाजूला झाले होते. त्यामुळें अचलेच्या तरुण हृदयाची कोमल साद त्यांनीं जागच्या-

जागींच गुदमरवून टाकली होती. येवढेंच नव्हे, तर तशा दडप-लेल्या मनोवस्थेंत तिला इतके भयंकर देखावे त्यांनीं दाखविले, कीं तिला सांसारिक जीवनाची धडकीच बसली. माहेरीं परत आल्यापासून तिला विनायकरावांच्या उत्तरोत्तर अधिकाधिक अधोगतीच्या वार्ताच कानावर येत होत्या. ती बोलली नाहीं, तरी " आतां या माणसाचा आपल्याला आश्रय शक्य नाहीं व नकोही. स्वावलंबनानें जीवन कंठण्यांतच माणुसकी आहे, " असा तिनें मनाशीं ठाम निश्चय केला होता. त्यामुळें तिच्यांत एक प्रकारचें सामर्थ्य आलें आहे, असें तिला वाटे. तरी मधून मधून विनायकरावाबद्दल ऐकूं येणाऱ्या तिरस्करणीय वार्ता तिला हादरून टाकीत असत. तिला अगर त्यांना नको असलें, तरीही पति-पत्नीत्वाचें नातें शिक्कामोर्तब झालें होतें. हजार नव्हे, दहा हजार मैलांवर जरी ती गेली असती, तिनें कितीही निःसंबंध दाखविला असता, तरी जिवांत जीव असेपर्यंत त्या संकल्पाचा कांहीं उपयोग नव्हता. हजारों मैलांवर असणाऱ्या शनीची पीडा पृथ्वीला टाळतां येते काय ?

तिच्या अंतःकरणांत चाललेल्या धडपडीला सीमा नव्हती. निर्जीव कुडींत जीव भरावा व त्यानें सांगावें, " नाहीं, अजून माझी मृत्युवेला जवळ आलेली नाहीं, " तशीच अचला स्वतःची वंचना करीत होती. " नाहीं. संसाराची राख झाली, तरी माझ्या अंतःकरणाचा ताजेपणा नष्ट झालेला नाहीं. आयुष्यांत संसार हा एकच चैतन्य आणतो आहे थोडाच ? मग माझा पती ? माझीं मुलेंबाळें ?

नसत् ना. मी माझ्या आत्म्याचा विकास करीन. माझ्या आवतीं भोंवतीं शेंकडों मुलें आहेत. तींच माझीं मुलें. माझ्या दोन मुलांत समाधान न मानतां, दुसऱ्या शेंकडों मुलांवरही तितकीच ममता मी केली तर ? मी, माझा उद्योग, माझें स्वावलंबन, माझा परोपकार. माझ्या संसाराचा विचार करायला मला वेळ आहे कुठें ? " असें म्हणत असतांच चोराप्रमाणें नकळत दबा धरून मनांत शिरलेला संसाराचा विचार किती वेळ तरी तिच्या मनाची चोरी करीत राही. तास न् तास जात. तिला तें कळत नसे. लगेच ती भानावर येऊन हंसे. " छेः, हे रिकामपणाचे रिकामे विचार. मला काय करावयाचें आहे त्यांच्याशीं ? " पुनः ती, तिचा उद्योग, तिचा भाऊ, तिची बहीण, तिच्या बहिणीचा संसार, तिच्या भोंवतालचीं मुलें. " अग बाई, इतक्या गोष्टी माझें मन रिझवायला आहेत. मग आयुष्याचा लढा मी कां नाहीं जिंकणार ? कशाला तळमळ हवी ? सोबतीसाठीं ? पतीसाठीं ? तें प्रेम—तें प्रेम का असतं ? देहासाठीं. दैहिक सुखाच्या अतीत जाऊन केवळ माझ्या आत्म्याला नाहीं का विजय मिळणार ? अर्थात् मिळेल. "

खुळी अचला ! वीरवृत्तीच्या व उत्साहाच्या भरांत तिला कांहीं अशक्य वाटलें नव्हतें ! वेडी अचल ! देह आणि मन, जणुं दोन कोठड्यांत कोंडलेले दानव–देव तिला वाटत होते ! देह आणि मन–आत्मा–यांची भुलभुलावणी कशीही असली, त्यांना कोणी विभक्त करूं पाहिलें, अगर तीं झाल्यासारखीं वाटलीं, तरी तीं दोघें एकाच छावणींतील असतात.

" ताई, ताई " बाबाची प्रेमळ हांक तिला ऐकूं आली. तिनें धुडकावून दिलेल्या विचारांकडे पुनः उपहासानें पहात ती म्हणाली, " किती प्रेमळ माझा भाऊ ! माझ्या आयुष्याच्या लढ्यांत कां नाहीं बरं मी जिंकणार ? "

ती धांवतच दार उघडायला गेली. दार उघडतां उघडतां तिनें बाबाच्या तोंडचे पुढील शब्द ऐकले, " सात वर्षांची तरी सजा होणार. " दुसरें कोणीतरी म्हणालें, " योग्यच आहे तें ! आणखी फटके द्यावयाला हवेत ! "

तिला हें कुणाला उद्देशून म्हटलें, तें कळलें. पण तिनें ऐकलें न ऐकल्यासारखेंच केलें.

हातांतील हॅट अचलच्या पाठीवर मारून बाबा म्हणाला, " काय हें ! काय हें ! किती सुजले आहेत डोळे !" त्याला अचलेची व्यथा कळली नव्हती थोडीच ! तिच्या डोळ्यांतून न कळतां पाणी आलें. ती जवळच्या खुर्चीवर बसली. त्याचा कंठही दाटून आला पण तो धीर वृत्तीचा, तिचा भाऊ होता. त्यानें तिला लहान मुलीसारखी गदगदां हलवून म्हटलें, " वेडी कुठली. रडतेस ? अग, त्याच्याबद्दल वाईट वाटायला त्याची किंमत काय आहे ? हं उठ. उठ. " त्यानें आवंडा गिळला. पदरानें डोळे पुशीत लटकें हंसून ती म्हणाली, " बाबा, चहा घेतलास का ? "

" तुला टाकून ? "

अचला स्वतःशींच म्हणाली. " आणि माणिक म्हणत होती, ' आतां बाबा तुला विसरला ' म्हणून. कांहीं झालें तरी

माझा बाबा आहे." बाबाही स्वतःशींच म्हणत होता, "माझं कांहीं असलं, तरी अचलला ती माझ्या पासून दुरावूं शकणार नाहीं!"

बिचारीं बहीण भावंडें!

## ४

"काय बाई, सारखी खा खाई करायला हवी." माणिक जरा त्रासिकपणें म्हणाली. माणिक छोट्या कुंदेला मांडीवर घेऊन बसली होती. कुंदा एखाद्या अधाश्याप्रमाणें आपलं जीवन आईच्या देहांतून शोषून घेत होती. अचला निस्तब्धपणें माणिककडे पहात होती. तिला माणिकचा हेवा वाटला. आपल्याच हाडामासाचा आपल्याच भावना–प्रवृत्तींचा तो गोळा मांडीवर घेऊन त्याच्या मुखांत आपल्या जीवनाचा कस ओतणाऱ्या माणिकचा अचलेला हेवा वाटला!

माणिक केव्हां तरी मरणार. मीहि केव्हां तरी मरणार. पण माणिक जगली; जगली आणि तिनें आपला ठसा जगावर उमटवून ठेवला. माणिक मेली तरी तिच्या जीवनरसाची गंगा शाम कुंदेच्या रूपानें जगांत राहील. आणि मी? माझी बुद्धी, माझी शक्ति, माझं रूप, भावना, विचार, प्रवृत्ति यांची वाट काय? मी मेलें, माझं सर्वस्व जाईल. मग आतां तरी मी कशाला जगतें आहें? माझ्यांतील एका अंशमात्रालाहि माझ्या पश्चात् जगतां येत नसेल तर माझ्या जगण्यांत अर्थ काय?

तिला भूक लागली; तळमळ लागली. "मी जगलें पाहिजे. माझं असं जगांत ठेवलं पाहिजे. अचला जगांत जगून गेली असं नाहीं. अचलेची जात जगून गेली पाहिजे. माझ्या हाडामासाची, माझ्या प्रवृत्तींची प्रतिष्ठापना जगांत झाली पाहिजे. पण तें शक्य कसें होणार ?" तिला विनायकरावांची तिरस्करणीय आकृति डोळ्यांपुढें दिसूं लागली. तुरुंगांत सात वर्षें डांबून टाकलेल्या विनायकरावांच्या हीन लीला तिच्यापुढें स्वैर नाचूं लागल्या. "नको. अचलेची जात ती नुसत्या अचलेची नाहीं होणार !" तिनें दीर्घ श्वास टाकला.

"पहा, पहा, कशी करते आहे ती." माणिक कुंदेला हळूच चापटी देत म्हणाली. अचलेच्या तंद्रीचा भंग झाला.

"इतकी त्रासलीस ? देऊन टाक मला."

"जा घेऊन." माणिक कुंदेच्या अंगावरून वत्सलतेनें हात फिरवीत म्हणाली. छोट्या कुंदेच्या अंगावर उभ्या राहिलेल्या रोमांचांनीं उत्तर दिलें, "आई, अशा मानून का कुठें मुली होत असतात ?"

त्या वत्सलतेनें व ओंठापासून बोललेल्या शब्दांनीं अचलेच्या अंतःकरणांत खळबळ उडाली.

"बाई, आतां म्हणशील, जा घेऊन म्हणून, आणि अर्ध्या तासांत येशील तिच्या मागें."

"कुंदा, जायचं मावशीकडे ?" माणिकनें कुंदेला विचारलें. कुंदेनें चळवळ करून ती आईच्या अंगाला अधिकच बिलगली. व

अधिक जोरानें ती स्नेहपान करूं लागली. अचलेला मायलेकींतील त्या अदृश्य, नाजुक पण चिवट बंधनानें वेधून घेतलें.

छोटा शाम धांवत धांवत आला व आईजवळ बसला. कुंदेला मांडीवर पाहून त्याला राग आला. जेव्हां तेव्हां कुंदा, जेव्हां तेव्हां कुंदा. त्या कुंदेनेंच त्याला आईपासून दुरावलें होतें. त्याला ती मुळींच आवडत नव्हती.

" आईऽ. "

" काय ? "

" माना घे. "

" आणि कुंदा ? तिला खालीं ठेऊं ? " माणिकनें त्याच्या पाठीवरून हात फिरविला. त्याचें समाधान झालें नाहीं. उलट आईच्या गळ्यांत हात टाकून, तिला बिलगायची त्याला अनिवार इच्छा झाली. त्यानें तिला अगदीं घुसळून टाकलें.

" अरे, असं काय शाम ! "

त्याचा अपमान झाला; त्याला कारण कुंदाच. तो आईजवळ बसला. त्यानें कुंदेचा पाय ओढला. " अरे, असं काय ! " म्हणून माणिकनें त्याचा हात बाजूला काढला. ही कुंदा, तिच्याकडे आईचें सगळें लक्ष. माणिकनें कुंदेला लहानशा अंथरुणावर टाकलें !

" आतां इथं खेळायचं, रडायचं नाहीं, हं ! "

कुंदेनें हुंकार दिला. माणिकला त्या हुंकाराचा अर्थ कळला.

" हुं, नाहीं ना ललायचं ? "

जणुं " नाहीं " म्हणण्यासाठींच आपल्या हातापायांचीं वल्हीं हलवून कुंदेनें मार्ग आक्रमायाला सुरुवात केली सुद्धां.

" आतां अगदीं खुशींत आहे स्वारी." अचलेनें कौतुकानें तिच्याकडे पहात म्हटलें.

" असेल तर काय झालें. तबला भरलाय् ना पोटाचा ?" असें म्हणत माणिक उठली.

" शाम, ताईला खेळवायचं हं ! हात लावायचा नाहीं. "

" ना " म्हणून शाम तिच्याजवळ मांडी घालून बसला. माणिक स्नानाला गेली. हातांतील पुस्तकावर अचला डोळे फिरवूं लागली.

शाम किती वेळ कुंदेकडे पहात होता. चालायला बोलायला लागलेल्या शामला, कुंदा नुसती हातपाय हलवीत पडते, हें अगदीं वेड्यासारखें वाटलें. कुंदा जोराजोरानें हातपाय हलवून खिडकींतून येणाऱ्या प्रकाशाकडे वळली. तिच्या हातापायाची गति मंद झाली. डोळे प्रकाशाकडे स्थिरावले. ती न्याहाळीत होती. रात्रंदिवस डोळे मिटून मातेच्या उदरांत नऊ महिने काढलेल्या अज्ञातवासाचें चिंतन करण्याचें तिनें सोडून दिलें होतें. त्या अज्ञात अंधारांतून आल्यामुळें दिपून गेलेली कुंदा प्रकाशाकडे स्थिर दृष्टीनें पाहूं लागली. मध्येंच तिनें हुंकार दिला. " आहे, जगांत नानाविध आश्चर्यें आहेत. प्रकाशही आहे. मी त्यांचा शोध लावणार. " असेंच जणुं ती म्हणत होती.

शामनें तिच्या स्थिरावलेल्या दृष्टीकडे पाहिलें. त्याला कुंदा काय आहे हें कळत नव्हतें. " अशी काय पहाते ही. " त्यानें तिच्या स्थिरावलेल्या डोळ्यांत बोट घालून पाहिलें. कुंदा कळवळून रडूं लागली. तिच्या सामर्थ्याची आतां त्याला जाणीव झाली. त्यानें तिच्या तोंडावर आपला चिमुकला हात घट्ट दाबून ठेवला. गप्प बसेल त्याला डिवचणें आणि बोलणाऱ्याची वाचा बंद करणें ही जगांतील मानव प्राण्याची करमणूक त्यानेंही अनुभवायला सुरुवात केली होती. अर्धवट गुदमरल्यानें कुंदा तांबडी लाल झाली. अचला व माणिक धांवून आल्या.

" शाम, काय चावलास का चिमटा घेतलास ? केलंस तरी काय ? " माणिकनें त्याच्या पाठीवर चापट देत म्हटलें. शाम अपराध्याप्रमाणें विरमला असला, तरी कुंदेबद्दलचा त्याचा मत्सर वाढला.

" आईला हिनें माझ्यापासून दूर केलें. आईला कुंदा मात्र हवी. " त्याला कुंदेचा तिटकारा आला. अचलेनें त्याला जवळ घेतलें.

" शाम, असं करूं नये. आपली आहे ना ताई ? " त्यानें जोरानें मान हलवून सांगितलें " नाहीं. "

" मग देऊन टाकूं तिला राजाईला ? "

" दे " मान हलवीत त्यानें म्हटलें.

" बरं. राजाई ! राजाई ! " माणिकनें कुंदेला देऊन टाकण्याच्या आविर्भावानें मोलकरणीला हांक मारली.

“ राजाई, तुला आवडते ना कुंदा ? ”

“ व्हय् ना. मला अक्षी लइ आवडत्याती कुंदाताई. आमच्या बाळासंगं खेळायला न्येती आतां. ” अशा थट्टेंत चटकन् सामील होण्याचा अंगगुण असणारी राजाई म्हणाली.

“ जा. घेऊन जा हिला. ” माणिकनें कुंदेला राजाईजवळ दिलें. शामला वाटलें “ खरंच नेणार वाटतं कुंदेला ही. ”

मावशी आपली, बाबा आपले, आई आपली, कुंदा आपली, सगळीं आपलीं. आपल्या घरांतील कुंदेला परक्या घरची राजाई नेते, याचा अर्थ काय ? त्याला कळेना. तो तिच्याकडे पहातच राहिला. तिचा हेवा वाटला तरी वेडेचार करणारी कुंदा त्याची करमणूक होती. ती रडायला लागल्यावर त्यानें कितीदां तरी पाळण्याजवळ जाऊन “ लल्लू ना ” म्हणून तिला प्रेमळपणानें सांगितलें होतें. घंटा, नाहीं तर ताटवाटी, वेळीं जें सांपडेल त्यानें ठोकाठोकी करून त्यानें तिची रिझवणूक करावयाची खटपट केली होती. तीही त्याच्यावर दृष्टि स्थिरावून हर्षभरानें हंसली होती.

“ जाते घेऊनशानी आतां हं. ” म्हणून राजाई दाराआड झाली. शाम रडूं लागला.

“ माछी ? ” एक शब्दी प्रश्नानें शामनें आपल्या प्रधानाला झालेल्या गोष्टीवर तोड विचारली.

“ माछी ? तिच्या डोळ्यांत बोट कोणी घातलं गुलामा ? तिचा पाय कोणी ओढला ? ”

"केलं खरं सारं, तरी पण" अशा हतबुद्धपणें तो तिच्याकडे पाहूं लागला. अचलेला त्या पाहाण्याचें हंसूं आलें, तें दाबीत ती म्हणाली, "नाहीं ना असें करायचास पुन्हां ?"

"नाहीं नाहीं," केविलवाणें होऊन दुहेरी तिहेरी कबूलीजबाब त्यानें एकदम दिला. माणिकला हंसूं आलें.

"राजाई, का ग आमच्या शामच्या कुंदेला नेतेस ? वा, ग ! चल आण इकडे !"

राजाई दाराआडून पुढें आली. घोर निराशेंतून आशेचा किरण दिसला. स्तिमितपणानें शाम राजाईच्या हातांतील कुंदेकडे पाहूं लागला.

माणिकचा असा किती तरी वेळ त्या दोन मुलांत जाई. तिच्या साऱ्या दिवसाची ती करमणूक असे. शाम उठला, कुंदा उठली, त्यांचें रडणें, त्यांची बंडाई, त्यांचें न्हाणें, त्यांचें खाणें, त्यांची झोप ! तिच्या दैनंदिनींत या दोन मुलांना केवढें स्थान होतें ? लहान मुलांचा लळा असलेली अचला भुकेल्या नजरेनें सगळें पहात होती. संयमानें ती भूक मारीत होती.

## ५

आईची माया सगळ्या मुलांवर सारखी असते का ? असें जर कोणत्या आईला विचारलें, तर ती "सगळ्यांवर सारखी असते" असेंच म्हणेल. तिला त्यांत "डावं उजवं" कांहीं नाहीं. पण आईच्या मायेच्या

छत्राखालीं उभ्या असलेल्या मुलांना तो फरक कळतो. कोणी छत्राच्या घनदाट सांवलींत अगदीं मधोमध असतील, तर कोणी कडेला उभीं असल्यानें मायेची अर्धवट ऊब घेत राहतील. मग आई कोणाचें खाणें-पिणें कमी अधिक करते कीं काय? तसें कांहीं नाहीं. खाणेंपिणें, कपडे-लत्ते, बोलणें, कशांतही ती फरक करीत नाहीं. बहिरुपचारांत हा फरक नसतोच. तरी तिचा ओढा कोणाकडे अधिक आहे हें मुलांना कळतें. हें आईच्याप्रेमाबद्दल ! मग इतरांचें काय ! सगळ्याच " सारख्या " म्हटल्या जाणाऱ्या प्रेमांत असे तरतम भाव असतात. आईच्या प्रेमा-पेक्षां त्यांतील तरतम भाव तर फारच उठून दिसतो.

एकाच आईचीं मुलें—बाबा आणि अचला. दोघें बहीण भावंडें. अचलेवर अकृत्रिम प्रेम करणारा बाबा. बाबावर अकृत्रिम प्रेम करणारी अचला, एकाच झाडाच्या फांद्या एकाच दिशेनें वाढतील, पण त्या दोन्ही एकच व एकत्र असणें शक्य नाहीं. एक फांदी जर गदगदां हालवली, तर दुसरीही थरथरूं लागेल. पण एकीवर बसणाऱ्या घावाचें तितकेंच दुःख दुसरीला होणार नाहीं. अगदीं अत्यंत प्रेमानें एक फांदी दुसऱ्या भोंवतीं वळसे घालून जरी वाढली, तरी दोघींचीं सुखदुःखें एकच होऊं शकणार नाहींत. त्यांतील एक फांदी तोडली तर ती सुकेल, पण दुस-रीही सुकेल असें नाहीं. ती दुसरी भोंवतीं कित्येक दिवस तसेच निर्जीव वळसे घालून बसेल. सुकेल सुकेल, अगदीं काष्टवत् होईल पण दुसरीची वाढ कांहीं खुंटावयाची नाहीं.

त्या बहिणभावंडांचं किती अकृत्रिम प्रेम ! पण बाबा निराळा व अचला निराळी ! बाबाच्या आयुष्याला पूर्णत्व आणणाऱ्या गोष्टी निराळ्या व अचलच्या निराळ्या. बाबाची बायको कितीही प्रेमळ असली; बाबा, वहिनी अचलेला कितीही चांगलेपणानें वागवीत असलीं, तरी लग्नाबरोबर बाबाच्या प्रेमांत नकळता फरक झाला. अचलेला हें कळत होतें. एकदां भावाचें आत्यंतिक प्रेम तिनें अनुभविलें होतें. म्हणूनच त्यांत रेखामात्र उणा अधिक फरक तिला जाणवूं लागला. बाबा तिला कांहींही कमी करीत नव्हता. पण घरीं आल्याबरोबर "ताई, ताई." म्हणून त्याची ती हांक तिला ऐकूं येईनाशी झाली. त्या हांक मारण्यांत काय होतें ? पण सूक्ष्म स्पर्शही ग्रहण करणाऱ्या ताजव्या-प्रमाणें अचलच्या मनाला असल्या गोष्टींनींही आंदोलनें मिळालीं.

"आपल्याला वहिनी येणार" या कल्पनेनें आनंद होणार नाहीं, अशा मुली फारच थोड्या असतील. बाबाचें सिंधूशीं लग्न होणार हा कयास तिनें मनाशीं केव्हांच बांधला होता. सिंधू अनेक वेळां घरीं येई. अचला कांहीं काम काढून दुसरीकडे जाई. त्या दोघांतील बंधन अधिक दृढ होऊन, आपल्याला अशी प्रेमळ वहिनी मिळावी यासाठीं ती त्या संधिकालांत मोठ्या चतुराईनें वागे. बाबा व सिंधू दोघांच्याही लक्षांत ही गोष्ट येई. तीं दोघें हंसत, अचलही हंसे. तिघांना काय तें कळत होतें. अचला मिष्किलपणानें त्यांच्याकडे पहात जाई, तेव्हां तिची दृष्टि त्या दोघांना जणूं बजावून सांगे "चांगला शोभतो आहे हो जोडा. जर का माघार घेतलीस तर पहा !"

## हिंदोळ्यावर

प्रेमांत गुरफटलेल्या दोन व्यक्ति आपल्याबद्दल कोणाची सहानुभूति आहे व कोणाची नाहीं, सहानुभूति असली तर ती खरी आहे कीं जरा हिणकस आहे हें पहाण्यासाठीं कानोसा घेऊन असतात. खरी सहानुभूति असल्याशिवाय त्यांचें रहस्य कोणाला त्यांच्या मुखानें कळावयाचेंच नाहीं. हें जसें, तसें अशा सहानुभूति असणाऱ्या माणसाजवळ प्रिय माणसांचें कांहीं तरी बोलल्याशिवाय त्यांना चैन पडावयाचें नाहीं. दोघांनीं वचनबद्ध होऊन त्याचा आनंद आपणच उपभोगण्यांत गंमत असली, तरी अतिशय जवळच्या तिसऱ्या माणसाच्या कानावर ही गोष्ट प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें घालून त्याला आपल्या आनंदाचा वांटेकरी करण्यांत उत्पन्न होणारा आनंदही कांहीं निराळाच असतो. तो रहस्याचा ठेवा त्याला दाखविल्यानें त्याच्याबद्दलही आत्मीयतेची भावना तीव्रतम झालेली असते.

बाबाला व सिंधूला अशीच आत्मीयता अचलेबद्दल वाटत होती. कधीं कधीं भावनांच्या आवेगांत, एकमेक एकमेकांना कशीं वाटतात हें सांगण्यापेक्षां, तें अचलेजवळ बोलण्यांत त्यांना आनंद वाटे. अचलेलाही त्यांचीं हीं रहस्यें आनंदवून टाकीत होतीं. शेवटीं तिच्या मनाप्रमाणें झालें. तिला वहिनी आली. अशा दांपत्याच्या वागण्यांतील अर्धस्फुट प्रेम पहात राहाणें ही मोठी गोड करमणूक होती. पण कां कोण जाणे! तिला मधून मधून या दोघांमध्यें आपली उगाच अडचण होत आहेसें वाटे. अशी जाणीव तिला झाली कीं, तिच्या वागण्यांतील सहजता नाहींशी होऊन ती त्यांच्या दृष्टीआड जाई. तिच्या मनाची

ही स्थिति त्या दोघांनाही नेहमींच कळणें शक्य नव्हतें. कधीं एखाद्या वेळीं ती लक्षांत येऊन बाबा किंवा सिंधू म्हणत, " थांब कीं, आहेच तुझें वाचन मग. बस इथें, नाहीं जायचं. " अचलेचा संदेह नाहींसा होऊन ती बसे; गप्पा मारी; अगदीं अकृत्रिमपणें वागे. पण तीं दोघेंही कधीं कधीं तिला सहजपणेंच आग्रह करीत नसत. आणि अचला दोघांच्यामध्यें माझा व्यत्यय येत आहे अशा संदेहानें ओशाळी होई. व कांहीं तरी निमित्तानें त्यांच्यापासून दूर होई.

पण मनुष्याच्या मनांत असमाधानाचें बीज केव्हां रुजतें हें सांगणें कठीण असतें. कदाचित् त्या संदेहांतूनच पुढें असमाधानाचा अंकुर फुटला असेल. अचला एखादे दिवशीं विचार करीत बसे. तिच्या जवळचे पाश दुरावत आहेतसें तिला वाटूं लागे. बाबाच्या प्रत्येक शब्दांत, प्रत्येक कृतीमध्यें प्रेमाची अत्युत्कटता अचलेनें पाहिली होती. आतां कधीं कधीं तिला चुकल्यासारखें होई. प्रेमळ वृत्तींनीं व शब्दांनीं ओसंडणारें बंधुप्रेम ओहोटीला लागल्यासारखें तिला वाटूं लागलें.

" ताई, ताई. " म्हणून घरीं येतांच बाबाची प्रेमळ हांक येत नाहींशी झाली. ती तासन् तास एकटी बसली, तरी बाबाची हंसायला लावणारी प्रेमळ थट्टा तिला क्वचित् ऐकूं येऊं लागली. तिच्या बुद्धीला, हा फरक कां होत होता, हें समजण्याची ताकद होती. बाबाची नव्यानवलाईच्या संसारांत झालेली एकतानता तिला कळत होती. त्याचा त्यांत कांहींच दोष नव्हता, हें तिच्या विवेकाला कळे. पण तिच्या अंतःकरणाला

पीडा होई. तिला वाटे, आपल्या मागें उद्योग लावून घ्यावा. तिनें बाबाला पूर्वी किती तरी वेळां म्हटलें असेल, "बाबा, मी कोणत्या तरी शाळेंत शिकवितें रे. वेळ जातां जात नाहीं!" पण तो म्हणे, "तूं दुसरें वाटेल तें—कांहीं कर. माझ्या ताईला पोसण्याचें सामर्थ्य माझ्यांत आहे, तोंपर्यंत तिला मी नौकरीला नाहीं लावणार." तोच बाबा परवां तिनें तोच प्रश्न विचारला असतां म्हणाला, "नौकरी करतेस? पहा बुवा तुझा तूं विचार, तुला इतकंच वाटत असेल, तर मी नाखुश करीत नाहीं तुला." तिला नौकरी करण्याची खरी इच्छा होती. त्याची परवानगी मिळावी अशी तिची इच्छा होती. पण त्यानें ती दिली, यांतच तिच्या अंतरंगांत कांहींसें टोंचलें.

अशीं अगदीं बारीक सारीक कारणें जमून आलीं. तिला भावापासून दुरावल्यासारखें अधिकाधिक वाटूं लागलें.

अचलेनें अकोल्यासच मुलींच्या शाळेंत तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागेसाठीं अर्ज केला. तिला ती जागा मिळालीही.

शाळेचा हा नवीन उद्योग अचलेला करमणुकीचा झाला यांत शंका नाहीं. कोणत्याही कामाची घडी बसेपर्यंत जें कुतूहल अगर जी अस्वस्थता वाटत असते, त्यांतही एक करमणुकीचा भाग असतो. अचलेनें उत्साहानें कामाला सुरुवात केली. दिवसाचा बराचसा भाग शाळेच्या घडामोडींत जात असल्यानें, रिकामपणीं येणारे विचारही तिला त्रास देईनासे झाले. एकदम निराळ्या वातावरणांत ती टाकली गेल्यानें, नव्या ओळखी, नव्या माणसांची परीक्षा, किती तरी गोष्टी तिचें मन

व्यापून राहिल्या होत्या. तिला बाबा-सिंधूशीं बोलायचें मनांत असलें, तरी तास न् तास बोलतां येणें अशक्य झालें. माणिककडे तर ती किती तरी दिवसांत गेली नाहीं. दररोज एक तरी फेरी घालणारी अचला पंधरा दिवसांत माणिककडे जाऊं शकली नाहीं.

## ६

माणिक तापानें फणफणत होती. घराला जिकडे तिकडे निस्तेजी आली होती. घरांतील बारीक सारीक कामाची विल्हेवाट लावून दोन मुलांचा संभाळ करणाऱ्या माणिकचें काम डोळ्यांत भरण्यासारखें नसलें, तरी त्या दिवशीं ती अंथरुणाला खिळली असतां बारीक सारीक गोष्टी अव्यवस्थेचा बाऊ करून माणिकचें महत्व पटवून देत होत्या. दार उघडें राहिलें, मांजरानें दूध खाल्लें, कुंदेनें डबा अंगावर पाडून घेतला, शाम कोळशाचें काळें अंगाला लावून बसला, मोलकरीण धुण्यापाण्याला वेळेवर आली नाहीं, भाऊसाहेबांचे कपडे सांपडले नाहींत. एक ना दोन; नानातऱ्हांनीं सारा गोंधळ माजला होता. मुलें बेचैन झालीं होतीं, भाऊसाहेबही जरा वितवितले होते. माणिक घरांतील जबाबदार स्त्री. आजारानंतर तिला विश्रांति घेत बसतां आलें नसतें. पण आजार तर जायला पाहिजे? तापानें फणफणलेल्या माणिकला घरांत माजलेला गोंधळ कळत होता. शेवटीं तिनेंच अचलेला बोलावून आणायला भाऊसाहेबांना सांगितलें.

अचला आल्यावर सर्वांना जरा हायसें वाटलें. अचलेचें घरकामांत नेहमींच बारीक लक्ष असे. तिनें माणिकचें, मुलांचें,

सर्वांचें यथास्थित केलें. दुपारीं चहाच्या वेळेला पुन्हां माणिकला ताप आला होता. चहा घेतां घेतां बोलण्यावरून बोलणीं निघालीं. भाऊसाहेब म्हणाले, " संसार जितका दुरून रम्य वाटतो तितका प्रत्यक्ष नाहीं. "

" खरंच. मला नेहमीं कोणत्याही कुटुंबाकडे पाहिलं, तरी वाटतं हीं सुखी असतील का ? कां कोण जाणे. जिकडे तिकडे असमाधानाचेच सूर मला ऐकूं येत असतात. "

" सर्वस्वीं असमाधान नाहीं, तरी खरं असंच आहे कीं, जितकं प्रारंभीं वाटतं तितकं कांहीं यांत समाधान नसतं. मी आपल्या अनुभवावरून सांगतों, आणि मला वाटतं, बहुधा सगळ्या पुरुषांचे अनुभव असेच असावेत—नव्हे असतात. "

" कसले अनुभव ? "

" लग्नानंतर कांहीं थोडीं वर्षे पुरुषाचं बायकामुलं यांच्यांत चित्त असतं; पण पुढं त्याच्या पलीकडे कांहीं तरी तो पहातो. दिवसेंदिवस स्त्री ही संसारांत तनमनानें अधिक गुरफटत जाते, आणि पुरुषाचें चित्त तितकं संसाराबाहेर अधिक फांकतं एवढं खरं. "

" म्हणजे काय ? "

" म्हणजे स्त्री ही नवरा व मुलें यांत स्वतःचं सर्व कांहीं विसरून विलीन होऊं लागते; तर पुरुष हा जमिनींतून वर डोकें काढूं पहाणाऱ्या अंकुराप्रमाणें संसारांतून बाहेर पाहूं लागतो. "

" एकूण पुरुष हा अधिक असमाधानी होतो तर ! "

" निःसंशय. ताई, मी सुद्धां असंच म्हणतों, कीं माणिकवर माझं प्रेम आहे, मुलांवर माझं प्रेम आहे, पण कधीं कधीं मला त्यांची माझ्या मार्गात अडगळ वाटूं लागते. "

माणिकवर अकृत्रिम प्रेम करणारी अचला. ती भाऊसाहेबांच्या शब्दांनीं मुळींच दचकली नाहीं. अशा तऱ्हेनें कठोरपणानें अगर उघड-मनानें केलेलें परीक्षण समजण्याची तिच्यांत पात्रता होती; म्हणूनच भाऊसाहेब तिच्याशीं मोकळेपणानें बोलत असत. एवढेंच काय, पण माणिकपेक्षांहि अचलेजवळ ते अधिक मोकळेपणानें बोलत.

" भाऊसाहेब, अडगळ वाटते याचा अर्थ मला नाहीं कळला. "

" म्हणजे, माणिक माझं सर्वस्व होऊं शकत नाहीं. सारा वेळ संसार व मुलंबाळं या गोष्टींना माझ्या दृष्टीनें शिळेपणा आला आहे. एवढींच माझीं बंधनें होऊं शकत नाहींत. त्या बाहेर माझें व्यवधान असतें. त्यांत कोणत्याही सांसारिक गोष्टींचा व्यत्यय हा मला त्रास-दायक वाटतो.

" मग बिचाऱ्या बायकांनीं काय करावं ? "

" या भिन्न मनःप्रवृत्तीच आहेत. एक अधिकाधिक अंतर्मुख होत जाणं व दुसरं बहिर्मुख होत जाणं, यांत अस्वाभाविक असं मला कांहींच वाटत नाहीं. "

" याच प्रवृत्तीनं कधींकधीं तो स्वतःचा व संसाराचा नाश करतो. "

" त्या प्रवृत्ति कोणतं वळण घेतील यावर सर्व अवलंबून आहे. कोणी वक्ते, कोणी लेखक, कोणी समाजकारणी, कोणी धर्मकारणी, कोणी राजकारणी होतील; तर कोणी बायाबाटल्यांत पिचत रहातील; कोणी नुसतें ' काय करावें ' या संभ्रमांत रहातील."

अचलेच्या डोळ्यापुढें विनायकरावांची छिन्नविछिन्न मूर्ति आल्याशिवाय राहिली नाहीं. तिच्या चेहऱ्यावर किंचित् गोंधळ, किंचित् तिरस्कार उमटलेला दिसला. भाऊसाहेबांच्या हें लक्षांत आलें. न कळतां अचलेला स्वतःच्या दुःस्थितीची जाणीव करून दिल्याबद्दल त्यांना वाईटही वाटलें. ते लगेच म्हणाले, " ताई, लग्नानंतर कांहीं वर्षांनीं पुष्कळ पुरुषांना आपल्या संसारांत विजोड असल्याचं आढळून येतं. अगदीं प्रेमविवाह जरी घेतले, तरी हीच स्थिति असते. खरं सांगू का ? पुरुष हा जात्याच एकनिष्ठ नाहीं, असं मला वाटतं. "

" भाऊसाहेब काय विधानं चालविलीं आहेत तुम्हीं ? "

" पुरुष हा त्यांतल्यात्यांत आपल्या आवडीचं असं नेहमीं शोधीत रहातो. "

" मग पुरुष हें पापच जन्माला आलं म्हणायचं."

" हें म्हणण्यांत अर्थ नाहीं. स्त्रीचा स्वभावही हाच असावा. थोडक्यांत स्त्री-पुरुषांचीच ही मनोवृत्ति आहे. आहे त्यापेक्षां चांगलं असतं तर बरं झालं असतं, असं त्यांना वाटतं. पण स्त्रिया या अत्यंत मर्यादित जगांत वावरत असल्यानें व त्यांच्यावरील जबाबदारी

त्या ओळखीत असल्यानें, त्या असल्या मनोवृत्तींना कह्यांत ठेवूं शकतात. पुरुषांपैकींही अशा वृत्तींना मुरड घालणारे पुरुष थोडे नाहींत; पण निःसमर्थ दुबळे पुरुष अशा वृत्तींचे दास होतात. ”

अचला भाऊसाहेबांचें बोलणें ऐकत होती खरी, पण तिचें चित्त स्वतःकडेच रोखून पहात होतें. “ आहे त्यापेक्षां चांगलं असतं तर— ” खरेंच. हा विचार तिच्या मनांत कितीदां तरी आला होता. विनायकरावांपेक्षां चांगल्या माणसाशीं गांठ पडली असती, तर तिच्या हौसेला मोल नव्हतें. तिचा संसार किती सुखाचा झाला असता. पण आतां भाऊसाहेब म्हणाले, त्याप्रमाणें ती मनाला मुरड घालीत नव्हती काय ? विनायकरावांच्या घरून निघाल्यावर मनाला मुरड घालण्यासाठींच एक–दोन–तीन–चार,–नव्हे, अर्धे तप खर्च करून ती बी. ए. झाली.

माणिकचें लग्न झालें. त्याच्या आधींपासूनच अचलेनें सासर वर्ज केलें होतें. आपल्या जन्माची वाताहात झाली ती झाली. माणिकला तरी सुखांत आयुष्य घालवायला मिळावें, ही तिची मनापासून इच्छा होती. अचलेचें सांसारिक कठोर जीवन पाहून माणिकला एकप्रकारें धक्का बसला होता, एवढेंच नव्हे, तर स्वतःच्या भावी जीवनाबद्दलही तिला अतिशय काळजी वाटे. पाण्यांत पोहोतांना निर्माण होणारीं सगळीं संकटें लक्षांत घेऊन नवीन पोहोणारा पाण्यांत उडी टाकतांना छप्पन वेळां “ होय, नाहीं ” करीत रहातो. तशीच माणिकची अवस्था झाली होती. उलट अचला तिला धीर देत होती. “ अग, असं नेह-

मींच का सगळ्यांचं होत असतं ? कोणती गोष्ट फार कसाला लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. भाऊसाहेब चांगले वकील आहेत, सुस्वभावी, गांवां-तल्या गांवांत सगळ्या लोकांना चांगले माहीत आहेत. कशाला उगीच शंकांनीं मन हळुवार करायचं मग ? ''

लग्न, डोहाळजेवणें, अगर अन्य सोहाळे पहायला, अनुभवायला सगळ्याच बायकांना आवडतात. पण त्यांतल्या त्यांतही विशेष आस्थेनें त्रयस्थांच्या असल्या सोहाळ्यांत मन घालून चवकशी करणारा एक वर्ग असतो. तो म्हणजे बालविधवा व अवमानिलेल्या सुवासिनी यांचा. त्यांना आपल्याला जें करायला, अनुभवायला मिळालें नाहीं, तें दुसऱ्याला अनुभवायला मिळत असलें तर एक प्रकारचें वाईट वाटत असतें, पण त्याचबरोबर आपल्याला जें मिळणें शक्य नाहीं, त्याबद्दलची आपल्या मनाची भूक इतरांच्या तसल्याच गोष्टींत मन घालून त्या बिचाऱ्या शमवीत असतात.

अचलेला स्वतःसाठीं वाईट वाटत नव्हतें, असें म्हणणें कसें शक्य आहे ? पण त्याबरोबर अचला व माणिक यांच्यांतील स्नेहसंबं-धच अशा तऱ्हेचे होते, कीं माणिकला सुखांत पाहून अचला सुखी झाली असती. माणिकचें भाऊसाहेबांशीं लग्न ठरल्यानंतरहि त्या दोघी तास न् तास बोलत असत. अचलेची भूमिका नेहमींच उपदेशकाची, वडिल-कीची असे. _माणिकच्या लहान सहान शंकांचें समाधान करून अचला तिचें मन तयार करीत होती. माणिकच्या भोळ्या मित्र्या जिवाला अचला हा नेहमींचाच मोठा आधार असे. माणिकच्या लग्ना-

नंतरही ती आपलीं सुखदुःखें अचलेपाशीं मोकळ्या मनानें सांगे. अचला तशाच वडिलकीनें भाऊसाहेबांजवळ बोले. भाऊसाहेबांचा स्वभाव खूप बोलका होता. त्यांनाही आपलें मन मोकळें करून तिच्याशीं बोलावेंसें वाटे.

गेल्या पंधरा दिवस घरीं न फिरकल्याबद्दल माणिक व भाऊसाहेब यांनीं तिला चांगलेंच छेडलें. " अरे वा, शाळा झाली म्हणून काय माणसं सोडलीं आहेत कीं काय सगळ्यांनीं. "

" नाहीं हो. सारं बस्तान बसेपर्यंत गोंधळल्यासारखं झालं होतं. "

" झालं ना आतां सारं ? ' माछी ' ' माछी ' करून शामनें तर भंडावून सोडलं. " भाऊसाहेब म्हणाले.

अचला लवकरच या नवीन जीवनाला सरावली. भाऊसाहेब, माणिक, सिंधू सर्वांना तिचें हें नवें जीवन बोलण्याचा विषय होऊन बसलें.

## ७

शाळेंतून कंटाळून थकून दमून आल्यावर जिव्हाळ्यानें कोणाशीं तरी चार घटका बोलण्यासाठीं उत्सुक असलेली अचला माणिककडे जाई. माणिकजवळ बोले. मनापासून, प्रेमानें, मैत्रीण म्हणून, बहीण म्हणून बोले. तिच्या मुलाचें तितक्याच तऱ्हेचें कोडकौतुक करी. पण माणिक व तिच्याजवळ बोलायचे विषय यांना माणिकच्या सांसारिक जीवनाची मर्यादा पडल्यानें त्यांत नवचैतन्य दररोज असणें शक्य नव्हतें. अचलेच्या सुबुद्ध मनाला तेवढ्यानेंच करमणुक होत नसे. भाऊ-

साहेबांनीं नानातऱ्हेचे विषय काढावे व तिनें नाना तऱ्हांनीं त्यांना विचारून घ्यावें. दोघांनीं वाद करावे, भांडावें, प्रसन्न अगर खिन्न मनोवृत्ति दोहोंपैकीं कुणाची असल्यास, एकमेकांनीं त्याचीं कारणें काढून अति प्रसन्नतेला अगर अति खिन्नतेला समतोल करावें, हा नेहमींचा क्रम असे. माणिकही बहुतेक वेळां त्यांत भाग घेई, पण तिला सर्व कांहीं नीरस व कंटाळवाणें वाटूं लागे, व ती उठून आपल्या कामाला जाई.

भाऊसाहेब कांहीं गमतीचें बोलले म्हणजे त्या गमतींत माणिकला सामील करण्यासाठीं अचला म्हणे, " माणिक, अग भाऊसाहेब बघ काय म्हणताहेत. " माणिकनें म्हणावें, " मला नाहीं बाई कळत कांहीं यांतलं. बदामी हलवा कसा करतात, नाहीं तर मेसूर कसा करतात हें मला विचार हवं तर; ती तुमची असेंब्ली न् डॉ. गौरांचीं बिलं न् ऑस्कर वाइल्ड न् काय तें मला कांहीं कळत नाहीं. " प्रथम माणिक तितक्याच सहजपणानें व सरळ मनानें असें म्हणत असे. पण पुढें पुढें " माझा जन्म फुकट, आपलं शिक्षण बेताचं, संसारांत नवऱ्याचं मन रिझवायला तें सुद्धां पाहिजे. " असें स्वतःच्या बौद्धिक उणीवेचे विचार तिच्या मनांत तरंगूं लागले व ती खिन्न होऊं लागली.

एक दिवस जेवायची वेळ झाली होती. माणिकनें जेवायला येण्याबद्दल भाऊसाहेबांना दोन तीन वेळां सांगितलें. भाऊसाहेब बोलण्याच्या इतक्या रंगांत आले होते, कीं त्यांनीं " आलों " म्हणत ऐकलें न ऐकल्यासारखें करून ते पुढें बोलूं लागले. " असा तो

गुन्हेगार. त्यांची ती मनोवृत्तीच बनलेली असते. त्यांना माहीत असतं कीं कायद्यानं शिक्षा कशाला? तर चोरी करूं नये म्हणून. पण चोरी करूं नये तर खावं काय हा प्रश्न कायदा सोडवूं शकत नाहीं. मग त्याच कायद्याच्या आधारें चोरी करून तुरुंगांत गेलं, तर दोन वेळेला रेती मिसळलेली कां होईना पण भाकरी मिळेल."

अचलेचें भाऊसाहेबांकडे बिलकूल लक्ष नव्हतें. ती त्यांना पुनः पुनः जेवायला जाण्याबद्दल सुचवीत होती. "हो ग." म्हणून ते पुढें बोलूं लागले. तेव्हां तर तिनें साफ सांगितलें, "भाऊसाहेब, मी आतां कांहीं ऐकायला तयार नाहीं. जा पाहूं तुम्हीं. माणिक किती वेळची वाट पहाते आहे." त्यावर माणिक म्हणाली, "कांहीं नाहीं. तुमचं दोघांचं पुरं होऊं द्या. मी आहें माजघरांत. झालं कीं मला सांगा." माणिकनें अगदीं पहिल्यांदाच अशारीतीनें वैषम्य दाखविलें. अचलेला व भाऊसाहेबांना दोघांनाही मोठें चमत्कारिक वाटलें. माणिक एकदम एवढी चिडली कां? दोघांनाही कळलें नाहीं. आणि आतांपर्यंत चाललेल्या सहज मस्करीची कुस्करी झाल्यानें सर्वांच्याच मनाचा विरस झाला. पण माणिकनें भाऊसाहेबांच्यावर रागावणें, अचलेला त्यावेळीं अगदीं साहाजिक वाटलें.

अशींच एक दिवस तिघें बोलत बसलीं होतीं. मुलें जवळच खेळत होतीं. भाऊसाहेबांच्या गळ्यांत हात टाकून शाम त्यांना घुसळूं लागला. "अरे असं काय, दूर बस बुवा." असें म्हणत शामला उचलून त्यांनीं दूर ठेवलें व ते तसेच पुढें बोलूं लागले. माणिक लगेच

उठली, स्वयंपाकघरांत गेली, तिनें "शाम" म्हणून शामला हांक मारली. शाम धांवत धांवत आंत गेला. माणिकनें आपल्या मनांतील सगळा राग त्या बिचाऱ्या प्राण्यावर काढला. "जाशील का मोटीं माणसं बोलत असलीं तर?" म्हणून तिनें चारपांच दणके त्या अजाण मुलाच्या पाठींत घातले. अचला एकदम धांवत गेली "अग हें काय, माणिक, मारतेस कां त्याला?" तिला कांहींच उत्तर न देतां माणिक त्यालाच उद्देशून रागानें म्हणाली, "निलाजरा नाहीं तर. छप्पनवेळां सांगितलं असेल, कीं मोटीं माणसं बोलत असलीं तर जाऊं नये म्हणून."

"अग पण त्याला काय कळतं आहे. आणि एवढं अगदीं आजच मोठ्या न् लहान माणसाचं काय आणलं आहेस हें खूळ?" माणिकच्या मनांत तिला जळजळीत उत्तर द्यावयाचें आलें, पण तिला बोलण्याचें धाडस झालें नाहीं. ती तशीच अबोलपणानें कामाला लागली. अचलेला सारें कांहीं उमगलें.

अचलेला या गोष्टीची रुखरुख लागून राहिली. माणिकच्या मनांत उत्पन्न झालेल्या वैषम्याला वाचा फुटली. पहिल्या वेळीं अचलेला वाटलें, कीं हा आपलाच माणिकबद्दल चुकीचा ग्रह झाला असेल, या दुसऱ्या प्रसंगानें तिची खात्री पटली. बेसावध असतां मर्मी घाव पडावा, तशी तिची आज अवस्था झाली होती. अगदीं पहिल्या विचारानें झाल्या गोष्टीबद्दल माणिकला गुन्हेगार ठरविलें. "काय वेडी माणिक, लहानणापासून एकत्र खेळलों, वाढलों, लग्नाला तयार नव्हती, तर मीच तिचं

मन वळवलं. तिनें माझ्याशीं विश्वस्तपणें हजारों गोष्टी सांगितल्या. मी तिचं समाधान करीत आलें. आणि इतका माझ्यावर विश्वास नसावा ? तिच्यादेखत बोलणं चालणं, त्यांत तिला इतका राग यावा ? माणिक अगदीं हळव्या मनाची. जशी होती तश्शी अजून आहे. दोन मुलांची आई झाली तरी अजून मनाचा समतोलपणा नाहीं." पण या विचारावर दुसऱ्या विचारानें मात केली. "पण भाऊसाहेबांचाच हा दोष आहे. बोलायला लागले कीं लागले. त्याला प्रमाण नाहीं मग राह्यचं." लागलाच मनांत तिसरा सूर उमटला, "आणि तूं ? तुला तें प्रमाण होतं का ?" दोन दोन तास गप्पांत घालवल्याचा आढावा मनानें उपहासानें सादर केला. "तूं कां गेलीस ? तूं कां बोललीस ? कोणत्या भावनेनें भाऊसाहेबांशीं बोलत असस ?" अचला स्वतःशीं निष्ठुर झाली. टोंचलेला कांटा काढण्याकरितां सुईनें सभोंवतीं उकरावेंच लागतें.

'शाळेंतून थकून भागून आलेली तूं माणिककडे जात असस. पण माणिकशीं बोलण्यापेक्षां भाऊसाहेबांशीं बोलतांना तुला अधिक सुख वाटे कीं नाहीं ? तें सुख कां वाटे ? माणिकच्या शब्दांत नव्हतें असें सामर्थ्य भाऊसाहेबांच्या शब्दांत वाटे. तें आकर्षण कां ?' तिला स्वतःचा राग आला. [पाण्यापासून दुरावलेल्या वेलीचीं मुळें पाण्याच्या दिशेनें वाढूं लागतात, ती त्यांची सहजप्रवृत्ति असते. मनुष्याचें मन तसेंच आहे. सुखाचा ओलावा जेथून मिळेल त्या दिशेला वळून न कळत तें सुखाचें शोषण करीत असतें.]

सहानुभूतिशून्य जगांत वावरतांना आंत तळमळणारें अचलेचें मन सहानुभूतीचा ओलावा शोधीत होतें. 'भाऊसाहेबांचें सर्वस्व एकदां माणिकला वाहिलेलें असतां मी त्यांच्या सहानुभूतीची अपेक्षा करणं हा गुन्हाच नाहीं का ?' तिनें खूप विचार केला ! भाऊसाहेबांशीं बोलण्यांत तिचा कोणताही हीन हेतु नव्हता. माणिकवर ओसंडीत असलेल्या जिव्हाळ्याचा उन्हाळा व्हावा, अशीही तिची इच्छा नव्हती. परंतु हेंही कांहीं खोटें नाहीं, कीं तिच्या दुर्दैवी जीवनाबद्दल माणिकनें दाखविलेल्या सहानुभूतीपेक्षां भाऊसाहेबांची सहानुभूति तिला अधिक भरींव वाटे. सहानुभूतीचें कार्यच मोठें विचित्र आहे. हळुवार मनाला सहस्रपटीनें सामर्थ्य द्यायला केवळ सहानुभूतीची कित्येक वेळां जरूर असते.

नीरस आयुष्याशीं झगडतांना अचलेला पाहिजे असणारी मनाची शक्ति ही बाबा, भाऊसाहेब, माणिक यांच्या सहानुभूतीनेंच मिळत होती. पण मृत्युमुखीं पडलेल्या माणसाच्या शरीरांत प्राणवायु घालणें व बाबा, अगर भाऊसाहेबांकडून सहानुभूति घेणें हें सारख्याच तऱ्हेचें होतें. त्यांत तिचें स्वतःचें सामर्थ्य कोठें होतें ? बाबा, भाऊसाहेब व माणिक या तिघांच्या सहानुभूतीवर सामर्थ्य कमावूं पहाणाऱ्या स्वतःच्या मनाची अचलेनें पुरी पारख केली.

स्वतःची निर्भर्त्सनाच करायला बसलेलें तिचें मन तिला सहज, अजाणपणें घडलेल्या गोष्टीही भडक करून दाखवूं लागलें. एकादे वेळीं असेंही होत नाहीं का ? कीं आपल्या दुःखद स्थितीबद्दल जेव्हां दुसरें माणुस सहृदयता दाखवतें, तेव्हां स्वतःच्या दुःखापेक्षां सहानुभूति

दाखवणाऱ्याबद्दलच अधिक ओढ लागते. कठोरपणें स्वतःचें निरीक्षण करतांना अचलेला हेंच आढळून आलें. तिच्या शिळ्या झालेल्या दुर्दैवाच्या कथेबद्दल जेव्हां भाऊसाहेब बोलत अगर हळहळत, तेव्हां स्वतःच्या दुर्दैवाबद्दल वाईट वाटण्यापेक्षां सहानुभूति दाखविणाऱ्या भाऊसाहेबांकडेच तिचें मन अधिक ओढत असे. त्या ओढींत कोणताही हीन हेतु नव्हता. पण हेतु नसला, तरी ही रिकामी ओढ घेण्याचा तिला काय अधिकार होता? "माणिक रागावली, तें बरोबर आहे. माझेंच चुकलें. मनाचें सामर्थ्य हें कोणाच्या सहानुभूतीनें कमवण्यापेक्षां स्वतःचें स्वतःच कमाविणें हें अधिक प्रामाणिकपणाचें आहे. सहानुभूतीशीं—त्यांतून पुरुषाच्या सहानुभूतीशीं मनानें बेसावधपणें खेळणें, हें कधीं कधीं विस्तवाशीं खेळण्यापेक्षांही अधिक घातकी ठरतें."

## ८

साऱ्या गोष्टी कशा जुळून आल्या होत्या. अचलेची शाळेंतील कामाची मुदत संपत आली होती. तिच्या मनाचा आनंदही बराचसा मालवला होता. माणिकच्या बाबतींत घडून आलेली गोष्ट अचलेच्या मनाला कायमचें शल्य होऊन बसली होती. बाबा व सिंधू यांपासून तिनेंच स्वतःला दुरावून घेतलें होतें. शाळेच्या निमित्तानें अचलेनें जें एक निराळें आयुष्य पाहिलें, त्यांत कायमचा समाधानाचा मार्ग सांपडला असें तिला वाटलें. बाबा आपल्याशीं कसा वागतो, वहिनी कशी वागते, माणिक कशी वागते, भाऊसाहेब कसे वागतात, याचाच सारखा रिकामपणीं विचार करीत बसण्यापेक्षां, मनाला आपल्या शक्ति दाखवा-

यला कांहीं क्षेत्र तरी या आयुष्यांत मिळेल, अशी तिची कल्पना झाली. त्यामुळेंच अकोल्यास, नाहीं तर कोठें दुसऱ्या गांवीं जायचा तिनें मनाशीं निश्चय केला.

शाळेच्या कामाबद्दल जें बरें वाईट मत झालें असेल, त्यावरून शिफारस करण्याबद्दल तिनें हेडमिस्ट्रेसला विचारलें. नवशिकीच शिक्षिका या दृष्टीनें अचलेचें काम बरें होतें. तिची वागण्याची पद्धति मात्र अशी होती, कीं तिचें बरें कामही चांगलें वाटावें. तिनें एकदोन गांवीं अर्जही केले. पण तिला उत्तर आलें तें निराशा करणारेंच होतें. असेच दोन महिने गेले. एकदां अकस्मात् नागपुरास केलेल्या अर्जाचें तिला अनुकूल उत्तर मिळालें.

बाबाला अचलेच्या प्रवृत्तींत होत असलेला फरक कळला होता. पण तो या नव्या व्यवसायामुळें, असेंच त्याला वाटे. अचलेनें आपलें असमाधान त्याला कधींच दर्शविलें नाहीं. दर्शविण्याचें कारण काय ? त्याचा त्यांत कांहीं दोष नव्हता, हें तिला स्पष्ट कळत होतें. तिचा सर्वस्वीं परावलंबीपणा—पैशांच्या बाबतींत नव्हे—तरी मनोवृत्तींचा परावलंबीपणा, तिच्या असमाधानाला कारण होता; तो घालविण्यासाठींच केवळ तिला दूर जावयाची इच्छा होती. मनाला दुबळेपणा आला असतां, कोणीतरी सांत्वन करावयाचें ही मनाला लागलेली खोड तिला नाहींशी करावयाची होती. कोणाच्याही मदतीवांचून आपल्या अडचणी आपण दूर करायच्या; आपलीं दुःखें आपणच धीरवृत्तीनें शमवायचीं असें स्वावलंबन मनाला शिकविण्यासाठीं तिला दूर जायला पाहिजे होतें. म्हणूनच अचला आनंदानें नागपुरास निघाली.

# हिं दो ळ्या व र

## १

मानील त्याला सुख, आणि मानील त्याला दुःख. कोण म्हणतें आयुष्य विषाचा प्याला आहे म्हणून? अचला त्या दिवशीं अत्यंत समाधानी होती. जगावर प्रेम करा, आणि जग तुमच्यावर प्रेम करतें कीं नाहीं पहा. अचलेचें विश्व मर्यादित होतें. तिच्या विद्यार्थिनी, तिच्या सहाध्यापिका, तिचे शाळाधिकारी–यांनीं तिचें बाहेरचें जग झालें होतें. आणखी त्या जगांत कोण होतें? नाहीं. तिला त्याबद्दल विचारच करायचा नव्हता, तिच्या मर्यादित जगाकरितां ती त्याग करीत होती. तिच्या त्या मर्यादित जगावर ती प्रेम करीत होती. तिच्यावर तें मर्यादित जग प्रेम करीत होतें का? तिला आज त्याचा प्रत्यय आला होता खरा. माळी लहान लहान कलमें कुंड्यांत आणून लावतो. दररोज त्यांना जीवन देत असतो. तीं कलमें फोंफावत असतात. तो समाधानानें पहात असतो. त्यावर फुलें, फळें धरतात. कोणासाठीं? त्याच्यासाठीं? नाहीं दुसऱ्यासाठीं. मालकासाठीं. तरी त्याला समाधान असतें. अचल अशाच त्या कोंवळ्या लता वाढवीत होती. पण ते चिमणे जीव तिच्याकडे डोळे लावून तिचा शब्द न् शब्द वेंचून घेत असतांना तिला किती आनंद होई. त्या मुली अचलेच्या प्रेमळ-पणानें जणुं भारल्यासारख्या असत. अवघ्या अकरा बारा वर्षांच्या त्या पोरी. त्यांना "बाई" म्हणजे काय वाटे कोण जाणे!

पंचविसाव्या वर्षी दुःखाचे पेले पिऊन अचलेच्या चेहऱ्यावर किंचित् खिन्नतेचा हात फिरल्यासारखा वाटत असे. तिच्या निमगोऱ्या

चेहऱ्यावर, अति विचारांनींच कीं काय कोण जाणे, एक प्रकारचें गांभीर्य खिळलेलें असे. अशा खिन्न, गंभीर चेहऱ्यावर लहान मुलींच्या सान्निध्यांत उमटलेलें वत्सलपूर्ण हास्य मोठें शोभून दिसत असे. त्या हंसऱ्या चेहऱ्यानें ती शिकवीत असतांना मुलींच्या वृत्ती उल्हसित होत असत. शिक्षणाचा आत्मा उल्हासाच्या कुडींत रहात असतो. उल्हसित वृत्तीनें खेळत खेळत सहजासहजीं मुलींच्या मनावर ती विषय बिंबवीत असे. शाळेंत आपल्या वर्गांतील त्या हंसऱ्या कळ्यांना खुलविण्यांत अचला अगदीं रंगून जाई.

मुलींचें अचलाबाई म्हणजे जणुं दैवतच होतें. ती वर्गात गेल्यावर कोणत्या तरी दोन चार पोरी हंसत, बालिशपणें मुरकत, टेबलावर फुलें आणून ठेवीत. अचला किंचित् हंसून तीं फुलें हातीं घेऊन पुन्हां टेबलावर एका बाजूस ठेवी. तिच्या ह्या सहास्य स्वीकारानें त्या मुलींच्या अंगावर जणुं मूठ मूठ मांस चढे. किंचित् अभिमानानें वर्ग न्याहाळीत त्या जागेवर पटकन् जाऊन बसत. गोष्टीनें, नाहींतर मनोरंजक माहितीनें सुरुवात करून, त्या वेड्या कोंकरांचीं बागडणारीं चित्तें मोहून घेऊन अचला विषय अचुकपणें त्यांच्या पदरीं घाली. बाईशीं आपल्याला बोलायला मिळावें, बाईनीं आपल्या घरीं यावें, आपल्यांत खेळावें, निदान आपण खेळत असतां पहावें—किती वेड्या आशा त्या कोंवळ्या पोरींना टांगून धरीत! चैत्र महिना, संक्रांत किंवा असेच कांहीं उत्सवदिवस असले, कीं "बाई याल ना आमच्याकडे हळदी-कुंकवाला. या ना बाई." म्हणून लाडिक हट्ट घेऊन त्या बसायच्या.

हळदीकुंकवाला " नाहीं " कसें म्हणायचें ? ती " नाहीं " म्हणत नसे; पण तिचें सौभाग्य केव्हांच निस्तेज झाल्यानें तिला अशा प्रसंगाला जावेंसें वाटत नसे. ती कांहीं निमित्तानें जाणें टाळी. संक्रांतीला सुंदर सुंदर कागदांचे डबे कातरून त्यांत हलवा भरून मधल्या सुटींत बाईच्या हातीं द्यायची त्यांना कोण निकड असे. डबा बाईच्या हातांत ठेऊन " बाई नमस्कार " म्हणत मुलगी खालीं वांकली कीं अचला थट्टेनें म्हणे, " मिळेल हो, चांगला बघून द्यायला सांगेन आईना. " " इश्श " करीत, परकराच्या नाड्या बांधीत बांधीत ती मुलगी हंसून पळत जाई. लगेच तिच्या भोंवतीं सर्व वर्ग–मैत्रिणींचा घोळका जमून म्हणे, " काय ग, काय ग बाई म्हणाल्या ? " तेच ते, बाईचे शब्द ऐकण्याला व " बाई असं म्हणाल्या हो. " म्हणून सांगण्याला उत्सुक असलेलीं तीं पांखरें आनंदानें अंगणांत बागडूं लागत.

बाई अगर बाईचें कांहींही ऐकायला त्या किती उत्सुक असत ! एकदां शाळा सुटल्यानंतर " बाई, थांबा ना आम्हीं खेळतों. आम्हांला खेळ शिकवा ना. " म्हणून पोरहट्ट घेऊन त्या बसल्या. मुलींना घरीं जायला उशीर होणार होता, अचलेचें डोकें दुखत होतें. ती म्हणाली, " हें पहा, आतां उशीर झाला आहे ना ? पुन्हां कधीं तरी. "

मुलींचीं वांकडीं तोंडें पाहून ती गमतीनें म्हणाली, " उशीर झाला आहे ना ? माझा भाऊ बोलेल मला ! " मुली हंसूं लागल्या,

स्तंभित झाल्या. एक चिमुरडी तर धीटपणें म्हणाली, " बाई, तुम्हांला-सुद्धां बोलतात का हो?"

" म्हणजे ? मी जर नीट नाहीं वागलें तर मलासुद्धां बोलणीं बसतील. "

एवढें बोलणें झालें. मुलींना मोठी गंमत वाटली. त्याही आपलीं दप्तरें सांवरीत, हंसत, खेळत घरीं निघून गेल्या.

जिवंत आत्मे आपल्या हातानें तनमन खर्च करून उमलवितांना अचलेला विलक्षण आनंद वाटत होता. रस्त्यांत कोठें दूर जरी ती असली, तरी लाजरीसारख्या लवणाऱ्या त्या मुली तिला लगेच ओळखूं येत. अशा आनंदांत अचलेचे दिवस जात असतां, आनंदाची शीग कालाबरोबर संवयीनें ओसरूं लागणें साहजिक होतें. पण आजच्या एका प्रसंगानें पुन्हां तो आनंद दुथडी वाहूं लागला.

कसल्याशा समारंभाच्या निमित्तानें, परप्रांतीय माधवराव सेशन-जज्जांना अध्यक्ष म्हणून बोलाविलें होतें. वक्त्यांची नेहमींची ही प्रथा असते, कीं ज्या संस्थेंत त्यांना बोलावयाचें असतें, तिचें शक्य तर कोणतें ना कोणतें, कोठलें ना कोठलें नातें जोडून दाखवायचें, व शेवटीं म्हणायचें, " तेव्हां ही आमचीच संस्था आम्हीं मानतों. येथील शिक्षण व शिस्त पाहून मला फार आनंद झाला, येथें यायचें महत् भाग्य मला लाभलें म्हणून......" वगैरे. ऐकणारांनींही त्यांतील अर्थ जेवढ्यास तेवढा समजून घ्यावयाचा असतो. परंतु माधवराव युरोपांत दोन वर्षें असतां, त्यांच्या मुलीनें त्यांना पाठविलेल्या पत्रांचा उल्लेख करून ते म्हणाले,

" मला अध्यक्ष म्हणून येथें येण्याबद्दल पत्र आलें असतां, त्या निमंत्रणाचा मी ताबडतोब स्वीकार केला, याचें कारण या संस्थेचे माझ्यावर झालेले उपकार हेंच होय. आम्हीं आमचीं मुलें शाळेच्या स्वाधीन करतों, त्यांत एक विशिष्ट हेतु असतो. पण सामान्यतः असें आढळून येतें, कीं कोणत्या ना कोणत्या कारणास्तव शिक्षकांना आपलीं कर्तव्यें नीटशीं बजावतां येत नाहींत; व विद्यार्थ्यांनाही शिक्षकांबद्दल वाटावा तितका आदर वाटत नाहीं. परंतु माझ्या मुलीच्या दर आठवड्याच्या पत्रांत शाळेबद्दल जो मजकुर असे, त्यांत प्रामुख्यानें सौ. अचलाबाई लोणकर, तिच्या शिक्षिका—यांचा अत्यंत आदरानें व प्रेमानें उल्लेख असे. दर वेळीं त्यांच्या प्रेमळ शिकवणुकीचें एक ना एक उदाहरण ती पत्रांत लिहीत असे. तिच्या त्या एकंदर पत्रांवरून सौ. लोणकर यांनीं मुलींचीं मनें भारून घेऊन त्यांना इष्ट वळण कसें लावलें आहे, याबद्दल माझी खात्री झाली. त्याहूनही विशेष म्हणजे, मी तिकडून परत आल्यावर तिच्या वागणुकींतही पडलेल्या फरकाच्या मुळाशीं या बाईच कारण आहेत, असें मला दिसून आलें. अशा तऱ्हेनें आम्हीं शाळेच्या स्वाधीन केलेली ही आमची ठेव सव्याज आमच्या हातीं येईल, तर शिक्षकवर्गाविषयीं व शाळेविषयीं आम्हांला आदर व आपलेपणा कां वाटूं नये ? माझ्या युरोपीयन मित्रांना आमच्याकडील शाळा व शिक्षकवर्गाविषयीं माहिती सांगतांना माझ्या मुलीच्या पत्रांतील गोष्टींचा उल्लेख मी करीं..."

अचला तिच्या या गौरवानें अंतःकरणांत आनंदून गेली होती.

'एकूण पेरलेलें सत्कृत्य फुकट जात नाहीं तर!' आज तिच्या मनांत नाना तऱ्हांनीं येणारे विचार तिचें सामर्थ्य एकवटीत होते. "बाबा कितीही प्रेमळ असला, तरी त्याचा संसार त्याला आहे; बहीण कितीही चांगली असली, तरी तिचा संसार तिचें चित्त ओढणार. माझें चित्त वेधायला कोण? कोणी नसलें तरी, निस्वार्थीपणानें केलेल्या प्रेमाचा मोबदला तिला मिळत होता. कोणावर आपल्या जीवनाचा भार न घालतां, ती स्वावलंबनानें जीवन घालवीत होती. तिला या निष्प्रेम जगाची भीति वाटत असे. त्या भीतीकडेच ती आज उपहासानें पहात होती. "प्रेम? माया? हे निःसमर्थ दुबळ्या अंतःकरणाचे बोल आहेत. मी माझ्या पायावर जगेन. या आत्मविश्वासाच्या भूमीवर उभी राहून माझ्या अंतःकरणांतील श्रेष्ठ शक्ति मी जगाला उकलवून दाखवीन. करील त्याला कार्य आहे, आणि कार्यांतच आयुष्याची मातब्बरी आहे. आज मी माझ्या संसारांत गुरफटून राहिलें असतें, तर मी जगांत कःपदार्थ अशीच राहिलें असतें, आयुष्य संपल्यावर दोन मुलांनीं 'आई' म्हणून माझी आठवण काढली असती. पण मी आज जो जिव्हाळा दाखवितें, त्याच्यासाठीं मी जो त्याग करतें, त्याचे लेख इतक्या मुलींच्या अंतःकरणांत कोरले जातील. व्यक्ती स्वतःकरितां तशीच समाजाकरितां जर जगत असेल, तर सद्‌गुणांच्या मुशींत इतक्या मुलींना घालून मी समाजालाही भार वाटण्याचें कारण नाहीं."

पाण्याला रूप नाहीं, रंग नाहीं, शोभा नाहीं. त्याला असीम शोभा येण्याला तें काळ्या फत्तरांवर आपटावें लागतें. कांठच्या हिरव्या-

गार वनश्रींचीं प्रतिबिंबें, आकाशांतील चित्ररंगी मेघांचीं प्रतिबिंबें, निदान अथांग पसरलेल्या निळ्या आकाशाचा पट त्यानें आपल्या हृदयांत सामावून धरावा लागतो, तेव्हांच त्या पाण्याला शोभा. मनुष्याचें अंतरंगसुद्धां निराकार, रंगहीन असलें, तर त्याची शोभा काय ? आणि कोणाचें चित्त तिकडे वेधेल ? काम, क्रोध इत्यादि सर्व भावनांचीं मानवी मनांत प्रतिबिंबें आहेत, म्हणून तर तें अतर्क्य पण चिंतनीय झालेलें आहे. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यपटाचे पांढरे स्वच्छ उभे, आडवे धागे स्वतःच्या व दुसऱ्याच्या षड्विकारांनीं रंगविले जातात. कधीं तो रंग फिकट म्हणून मनोहर दिसेल, तर कधीं तो रंग घनदाट असल्यानें भडक व तिरस्करणीय वाटेल.

अचलेबद्दल वैयक्तिक काढलेल्या प्रशंसोद्गारांनीं तिच्या बरोबरीच्या अध्यापिकांचीं मनें किंचित् मत्सरानें शेवाळलीं. त्यांना स्वतःलाही त्याची जाणीव नसेल. पण दिसून न येणारें शेवाळें पुढें इतकें बाजत जातें कीं जलाचा शुद्धपणा दिसून यायला मार्गही रहात नाहीं. त्या दिवशींच्या सभेनंतर राधिकेसारख्या एक दोन शिक्षकिणींनीं अगदीं तिच्या पाठीवर शाबासकी देत म्हटलें, “ आहे बाई, आतां काय परक्या देशांतसुद्धां कीर्तीचा सुगंध दरवळला. ” त्यांच्या मनांत कौतुकाचाच भाग विशेष होता. एक दोघींनीं नुसत्याच “ आहे बाई, आतां काय. ” या अर्थीं भुंवया चढवून, जिवणी एका बाजूनें चढवून मान डोलवीत नुसतें तिच्याकडे पाहिलें. त्यांच्या मनांवर मत्सराचा पगडा कौतुकापेक्षां अधिक होता. दुसऱ्या दोघी तिघी जणुं कांहीं झालंच नाहीं, अशा थाटानें, झाल्या गोष्टीबद्दल पूर्ण औदासिन्य दाख-

वून झरझर पुस्तकें वह्या आंवरून घरीं निघून गेल्या. त्यांचीं मनें मत्सरानें अधिक शेवाळलीं होतीं. लोकप्रियता ही गोष्ट अशी आहे, कीं ती मिळून मिळायची नाहीं. पण लोकप्रिय असणाऱ्या माणसाला नामोहरम करायला मत्सरग्रस्त लोक आपलीं जाळीं जाणून किंवा अजाणतां विणीत असतात.

## १०

पण आज तीं दोघें बोललीं खरीं.

एकमेकांविषयींच्या कुतूहलानें मैत्रीची भूमिका अगदीं पुरी तयार करून ठेवली होती. त्यामुळें तीं दोघें भावनांनीं जवळ येण्यास अगदींच वेळ लागला नाहीं. आज तीं दोघें अशाच कांहीं विषयांवर बोललीं कीं जे विषय मैत्रीची गांठ पक्की करतील. काय असेल तें असो. उभयपक्षींही स्वतःच्या विवाहाविषयीं, वैवाहिक आयुष्याविषयीं मनमोकळेपणानें बोलण्यांत तरुणांच्या मैत्रींत जीव भरत असतो. मग त्या दोन स्त्रिया असोत, दोन पुरुष असोत अगर स्त्रीपुरुष असोत. उभयतांनींही विश्वस्तपणें आपल्या मनांतील सुखदुःखांचीं दालनें एकमेकांना उघडून दाखविल्याशिवाय जिव्हाळ्याची मैत्री होऊंच शकत नाहीं. आणि त्या सुखदुःखांच्या दालनांतही कांहीं अति नाजूक, अति जिव्हाळ्याचीं सुखदुःखें असतात. त्यांत औपचारिक कोणत्याच गोष्टींना सवड नसते. नव्हे—तेथें त्या गोष्टी खुपूं लागतात. उपचारांनीं दुरावल्यासारखें वाटतें, जवळ आल्याचें समाधान होत नाहीं.

ह्या हार्दिक मैत्रींत हीनता कोठेंच नसते. केवळ भावनांची देवाण घेवाण सत्य स्वरूपानें व खुलेपणानें करून, विश्वासाचें स्थान दिल्या मिळविल्याचाच काय तो आनंद असतो.

केवळ बौद्धिक मैत्रींत हा जिव्हाळा कधींच नसतो. किंबहुना निव्वळ जी बौद्धिक, ती मैत्री तरी कशी म्हणावयाची ? अशीं समान-बुद्धीचीं माणसें जवळ येणें म्हणजे दोन हत्तींची धडकच ती ! मत्सरा-शिवाय तीं जवळ येऊंच शकत नाहींत. त्यांत चांगलाच तरतम भाव असावा लागतो. पण अशा कमी अधिक बुद्धीच्या माणसांचें सख्य हें सेव्यसेवकासारखें असतें. [जिवंत झरे असलेल्या विहिरींतून पोहऱ्यांनीं कितीही उपसा करा. पुनः कालांतरानें त्या तुडुंब भरायच्याच. हार्दिक मैत्रींतील दोन हृदयें सुखदुःखानें तुडुंब भरलेलीं असतात. एकमेकांसाठीं त्यांचा उपसा करायचा, पुन्हां तीं भरून यायचीं. जिवंत भावनांचे झुळझुळते झरेच त्या मैत्रीला जिवंत ठेवीत असतात.] त्यांतहि बुद्धि-भावनांनीं झालेली मैत्री तर याहूनही अद्‌भूत असते. जलानें ओथंब-लेल्या मेघांच्या धीर, गंभीर गर्जनेंत एक उमाळा असतो. त्या मेघांची धडक झाली, वीज कडाडली तरी जीवनाचाच वर्षाव होत असतो. तीच त्या मैत्रीची गत.

मागील बाजूनें येणाऱ्या बुटांच्या आवाजानें अचला एकदम दचकली. तिला इतक्या दूरवर आल्याची जाणीव प्रथमच झाली, आणि अंधार तर डोळ्सांना सुद्धां झरझर आंधळे करीत चालला होता. तिला भीति वाटली. सावधगिरीनें ती भराभर चालूं लागली. मागाहून

येणाऱ्या माणसाला लांबलांब पावलांनीं तिला झिपटणें कठीण गेलें नाहीं. पावलांच्या अगदीं जवळ येणाऱ्या आवाजामुळें अचला अधिकच सावधगिरीनें रस्त्याच्या एका कडेनें चालूं लागली. अंधाराला तिची दृष्टि सरावली. ती येणाऱ्या व्यक्तीकडे निरखून अंधारांतून पाहूं लागली.

" कोण ? अचलाबाई ? " त्या आवाजानें अचला क्षणभर दचकली. पण त्या आवाजाच्या ओळखीनें तिला लगेच हायसेंही वाटलें.

" विराग ? "

" इतक्या दूरवर, एकट्या आणि इतक्या संध्याकाळीं ?

" आलें झालं गंमतींत. मला कळलंच नाहीं हो इतक्या दूर केव्हां आलें ती ! "

विराग नुसता हंसला.

" कां हो हंसलांत ? "

" कांहीं नाहीं. बरं, येऊं तुमच्या बरोबर कीं जाऊं पुढं ? " बाह्यतः बेपर्वाई दाखवीत तो म्हणाला.

तिनेंही तशाच तऱ्हेनें उत्तर दिलें.

" इतके भीत असाल तर जा पुढें. "

" तीं दोघें बरोबर चालूं लागलीं. अचलेला त्याच्या अढीबाज प्रश्नांतून तिच्याबरोबर जाण्याची इच्छा दिसल्याशिवाय राहिली नाहीं. दुसरी कोणीही ओळखीची स्त्री असती, तर त्यानें ओळख दाखविली

असती, पण अशा बेपर्वाईच्या शब्दांतही त्यानें सोबत जाण्याची इच्छा दर्शविली नसती; आणि तिनेंच इच्छा दर्शविली असती, तर केवळ नाइलाजानें तो तिच्याबरोबर गेला असता.

नागपुरास आल्यापासूनच राधिकेच्या घरीं नेहमीं येणाऱ्या जाणाऱ्या अचलेची व विरागची ओळख झाली होती. विरागला आपल्या संबंधीं कुतुहल आहे, हें अचलेनें विरागच्या दृष्टींतून ओळखलें होतें. तिलाही त्याच्याबद्दल कुतूहल नव्हतें असें नाहीं. पण सात आठ महिने झाले, तरी त्या दोघांनींही सहेतुकपणें ओळख वाढविण्याचा कधींच प्रयत्न केला नाहीं. विराग सुखवस्तु, बुद्धिमान्, करारी, तुटकवृत्तीचा आहे, यापेक्षां त्याची अधिक माहिती राधिकेच्या घरीं कोणालाच लागलेली नव्हती. त्याचें गत आयुष्य कसें असेल, याबद्दल कोणालाच कुतूहल वाटलें नव्हतें. तें चांगलेंच असेल, तो श्रीमंतींतच वाढला असला पाहिजे, ही सर्वांची खात्री होती. अचला म्हणाली,

"मला वाटलं नव्हतं कुणी ओळखीचं माणूस भेटेल असं."

"ओळखीचं? तुम्ही मला ओळखलं आहे अशी तुमची कल्पना आहे?"

"असं वाटतं."

"चुकतां आहांत तुम्हीं."

"तें कसं काय?"

"मी वकील आहें."

" म्हणजे ? कधीं न ओळखण्यासारखा प्राणी आहे कीं काय वकील हा ? "

" तुम्हांला माहीत आहे ना ? कीं उत्तम वकील तेवढा आधीं कसलेला नट असतो. त्याच्या चेहऱ्यावरच्या लहरी अंतरंगांतील लहरीशीं नेहमीं विसंगत असायच्या. "

" इतक्या जिवंत माणसाशीं खेळून तुम्ही अस्सल ढोंगी होतां एकूण ? "

" पण स्वतःशीं निष्ठुरपणें खेळूनही भलतें नाटक करणाऱ्या तुमच्या इतका ढोंगी खास नाहीं. "

" तुम्हांला मला चिडवायची लहर आली आहे वाटतं ? "

" नाहीं. तुम्ही मला ढोंगी म्हणालां म्हणून मी आपलं खरं सांगितलं. "

" विराग, म्हणजे मी ढोंगी आहें कीं काय ? "

" सारा दिवस हंसून खेळून आनंदाचं नाटक करणारं मनुष्य इतक्या दूर, एकटं, अंधारांत, फिरायला येतं, आणि इतक्या दूर आल्याची आणि इतका अंधार पडल्याची त्याला जाणीव सुद्धां रहात नाहीं, यावरून काय निष्कर्ष निघतो सांगा पाहूं ? "

" बरेच आहांत कीं ! "

" पुराव्याशिवाय बोलत नाहीं. 'आलें झालं गंमतींत. मला कळलं नाहीं हो इतक्या दूर केव्हां आलें ती.' असं तुम्हींच म्हणालां नाहीं ? "

अचलेला हंसूं आलें. पण पडती बाजू सांवरीत ती म्हणाली, "मग एकादे दिवशीं गंमतीनें जातं कीं माणूस दूरवर."

"हो. नेहमीं नाहीं जात. आज आलां असाल गंमतीनें."

"मग मी तरी नेहमीं कधीं जातें?"

"आठवड्यांतले पांच दिवस तरी जातांच नाहीं?"

"तुम्ही कधीं पाहिलंत?" विस्मयानें अचला म्हणाली.

"जाऊं दे. मला काय करायचं आहे म्हणा. पण माझा मुद्दा एवढाच कीं तुम्हींही अस्सल ढोंगी आहांत." हंसत विरागनें उत्तर दिलें.

"यांचं बरंच लक्ष असतं एकूण." अचला स्वतःशीं म्हणत होती. विरागनेंही त्याच्या ठराविक लकबीनें तिच्या तें लक्षांत आणून दिलें.

"बाकी, अचलाबाई, ढोंग ही सुद्धां कला आहे नाहीं?"

"हो, आणि मला वाटतं, ती तुमच्यासारख्या वकिलांना चांगली साधलेली असते नाहीं?"

"पण जगांत ही कला थोड्याफार प्रमाणांत सर्वांना आवश्यक आहे, असं मला वाटतं. मला आवडतात ढोंगी माणसं." त्याच्या या बोलण्यानें अचलेला कां कोण जाणे पण कांहींसें समाधान वाटलें.

"विराग, अन्यायाविरुद्ध झगडत असतांना तुम्हांला किती उत्साह वाटत असेल नाहीं? सबंध दिवस कांहीं तरी सेन्सेशनमध्यें जात असेल."

" कांहीं नाहीं. तुम्हाला कल्पना सुद्धां यायची नाहीं. न्याय, अन्याय, सारे एकत्र भरडायला शिकलों आहोंत आम्ही. न्यायाबद्दल सहानुभूति नाहीं, अन्यायाबद्दल चीड नाहीं. न्यायाची घोषणा करून न्याय्याची मान कांपतांना आमचे हात थरथरत नाहींत. आम्हांला एकच गोष्ट माहीत असते, कीं कोर्टांत येणारीं भांडणें ही कॅन्सरसारखीं असतात. कॅन्सरचं ऑपरेशन केलं, तरी रोगानें धरलेलं मूळ हटकून नाहींसं होतंच असं नाहीं. तो कृमि दुसरीकडे मांस खात रहातो माणसाचं. तें डॉक्टरला माहीत असतं. तरी तो ऑपरेशन करतो. फी घेतो. एक भांडण मिटवितांना दहा कशीं उठतात किंवा कशीं उठवावीं हें वकिलाला माहित असतं. तरी तो केस चालवितो. पैसे घेतो. "

" तुम्हांला वकिली आवडत नाहीं वाटतं ? "

" छेः छेः गरिबांना नाडून त्यांचं रक्तशोषण होईपर्यंत फी घेण्यांत मला मजा वाटते. "

" चला. कांहीं तरी बोलतां झालं. तुम्ही गरीबांकडून फी सुद्धां घेत नाहीं. मला माहीत आहे. "

" तुम्हांला कोणी सांगितलं ? "

" मी दररोज एकटी फिरायला येतें म्हणून तुम्हाला कोणी सांगितलं ? " दोघेंही हंसलीं.

" इतका वेळ दंश धरला होतात तुम्हीं ? "

" हो, मग तुम्हांला काय वाटलं ? बायकासुद्धां धूर्त असतात बरं " अचला हंसली.

" निदान त्यांना असं वाटतं. "

" काय हो, फार हळू चालावं लागतं आहे का तुम्हांला माझ्यामुळं ? "

" तें कांहीं खोटं नाहीं. पण जाऊं द्या झालं. त्याचा विचार करूं नका. तुमच्यामुळें कोणाला काय सोसावं लागेल, याचा सारखा विचार करून त्या जाणीवेनें वागूं लागलांत म्हणजेच दुसऱ्यांना अधिक त्रास होण्याचा संभव असतो. तुम्हांला लवकर नाहीं ना जायचं ? माझं निमित्त पुढें करून तुम्हांला लवकर जायचं असेल, तर गोष्ट निराळी. "

" मला काय ? एकटाच जीव आहे हा. कोणाच्या ओढीनें लवकर जायचं आहे घरीं ? "

" मला लवकर गेलं पाहिजे बुवा. मला ओढ लागली आहे. "

" कुणाची ? "

" मोहनची. " गंभीरपणाचा आव आणून विराग म्हणाला.

" हा कोण मोहन ? "

" माझा आचारी ! "

दोघेंही हंसलीं.

" अस्सं होय, बाकी विराग, तुम्ही लग्न करून टाका पाहूं एकदां. "

" कां हो ? माझ्या पायांत एकदां बेडी पडली म्हणजे समाधान होईल वाटतं तुम्हाला ? "

" खरंच, इतक्या मुली सांगून येतात तुम्हांला. कां हो 'नाहीं' 'नाहीं' म्हणतां ? मी देऊं कां छानशी मुलगी पाहून ? "

" छानशी मुलगी ? जपानी खेळणं द्या ना एकादं घेऊन. "

" मग हवीतरी कशी तुम्हांला ? "

" अजून मी विचार नाहीं केला. "

" असं ? माझ्यासारखी बहीण हवी होती, कीं दररोज भंडावून सोडलं असतं. "

" आणि बहीण नसतांही आतां काय कमी त्रास देतां ? "

त्याच्या या शब्दांत दडलेल्या तिच्याविषयींच्या आपुलकीच्या भावनेनें अचलेला समाधान वाटल्याशिवाय राहिलें नाहीं; कारण विरागची कोणतीही कोमल भावना त्याच्या शब्दांतून व्यक्त होणें, हें कठीण होतें.

तीं दोघें सावकाशपणें पुढें चालत होतीं. विरागच कांहीं वेळानें म्हणाला, " सोन्याच्या खाणींतून मातींत मिसळलेले बारीक बारीक सोन्याचे कण मोठ्या मुष्किलीनें काढावे लागतात. तसाच सगळ्या आयुष्यांत सुवर्णकण गोळा करण्यासाठीं माणुस धडपडत असतो. "

" तुम्हांला ते मिळाले आहेत, नाहीं ? "

" पण ते सुवर्णकणच वाटत नाहींत मला. "

" कारण तुम्ही महत्त्वाकांक्षी आहांत. "

" छे. छे. 'महत्त्व' म्हणजे काय ? शॉनें म्हटलं आहे कीं Greatness is only a sensation of Littleness.' "

" मग कां तुमची धडपड ? "

" मला आत्मीयताच कशांत वाटत नाहीं. तुम्ही म्हणतां, पण लग्नांतही तीच भीति मला वाटते. कोणत्याही गोष्टीवर आसक्ति ठेवायची तर त्या गोष्टीची निःसारता आधींच मला कळायला लागते. "

" तुम्ही फार विचार करतां विराग. "

" आसक्तीनें सुख मिळतं का सांगा पाहूं ? "

" कां ? अंतिम सुख नसेल कदाचित्. पण म्हणून रुक्ष वठलेल्या बागेंत हिंडायचं ? त्यानें मनुष्य अधिक उदासीन होतो. त्यापेक्षां फुललेल्या बागेंतील क्षणभंगुर फुलं पाहून तीं तोडून हातांत घेऊन जो क्षणिक आनंद होतो त्यालाच आयुष्यांत फार किंमत आहे. त्या क्षणाक्षणाच्या सुखानेंच आयुष्याची वीण विणली जाते. "

" पण तें सुख अनुभवितांनाच तें क्षणिक आहे, असें ज्याला वाटेल, त्याचा निम्मा आनंद कमी झाला म्हणून समजावें. मला कोणत्याही गोष्टीनें मान हरपण्यासारखा आनंदही होत नाहीं आणि दुःखही होत नाहीं. "

" मग तुम्हांला असे कटु अनुभव आले असले पाहिजेत. "

तो कांहींच बोलला नाहीं.

" कां ? जास्त चवकसपणा दाखवला का मी ? "

" तें पहा गांव जवळ आलं. "

" किती लवकर आलों आपण. "

विराग व अचला घरोघर गेलीं—दूर गेलीं. पण कां कोण जाणे ! सात आठ महिन्यांत कधींच उत्पन्न न झालेली जवळपणाची भावना आज दोघांच्याही मनांत आली होती. एवढेंच नव्हे, तर त्या भावनेनें आज दोघांनाही आनंद झाला होता. तो प्रसंग मुद्दाम साधूनही साधला नसता. विरागला स्वतःबद्दल इतकेंही बोलायला लावणें कांहीं सोपें नव्हतें.

## ११

" मनुष्याचा मोठेपणा ! किती सापेक्ष शब्द आहे हा ! अवाढव्य जगाच्या मानानें त्या मोठेपणाचें स्वरूप किती संकुचित असतें ? एकादा प्रख्यात डॉक्टर मोठेपणा मिळवून असतो. त्याला वाटत असतें, आपण मोठे; पण एकाद्या छोट्याशा समूहांतच त्याचें नांव व त्याचा मोठेपणा. इतरांना विचारा. त्याचें नांवही त्यांना ऐकून माहीत नसतें. सगळ्या मोठमोठ्या लोकांची स्थिति हीच असते. मोठा वकील घ्या, मोठा सावकार घ्या, गिरणीवाला घ्या, सट्टेबाज घ्या, वाङ्मयसेवक घ्या, सर्वांचा मोठेपणा असाच. जो तो आपल्या चिमुकल्या जगांत मोठा ! तेवढ्यावर यःकश्चित मानवप्राणी संतुष्ट असतो. शेअरबाजारांतही लाखों रुपयांची उलाढाल करणाऱ्या एकाद्या

सट्टेबाजाला विचारा, कीं मराठी वाङ्मयांत ज्यांचें नांव दुमदुमून राहिलें आहे, असं हरी नारायण आपटे—छेः तो हंसेल. त्याच्या कानावर उभ्या आयुष्यांत त्यांचें नांव आलें नसेल. व्यासपीठावरून जगाचें कल्याण करण्याच्या मिषानें, कंठशोष करणाऱ्या एकाद्या प्रख्यात पुढाऱ्याचें नांव घ्या. कोट्यवधि जनता म्हणेल "कोण हा? आम्हांला नाहीं माहीत." असाच सगळ्यांचा सगळा मोठेपणा आहे. त्याला मर्यादा आहे. मग मला माझें जग निर्माण करतां येणार नाहीं का? त्या जगांत मी मोठा नाहीं का होऊं शकणार? अर्थात् होईन." त्याला एकाएकीं आठवण झाली. तो कायसा इंग्रजी पहिलींत होता. त्याच्या शिक्षकानें बोधवाक्यांनीं त्याचा सर्व वर्ग शृंगारला होता. "सत्यं वद, धर्मं चर." "विद्या एव धनम्." "सत्यापरता नाहीं धर्म." "विद्या विनयेन शोभते." इत्यादि अनेक बोधवाक्यांनीं वर्गाच्या भिंती नुसत्या दाटून गेल्या होत्या. शिक्षकही त्याच्या कर्तव्याप्रमाणें नीतीचे धडे मुलांच्या कानींकपाळीं सदैव ऐकवीत असे. पुढें तो शिक्षक शिक्षकाचा धंदा सोडून बराच बढतीला चढला. शाळेच्या संमेलनप्रसंगीं तो अध्यक्ष झाला. त्यानें मुलांना उपदेश केला. "मुलांनो, सहा वर्षांपूर्वीं या शाळेंत असतां, मी हीं वाक्यें अशींच येथें लावलीं होतीं. पण तुम्हांला मी सांगतों, कीं यांची किंमत या वर्गापुरतीच आहे. तुम्ही या आंवाराबाहेर जगाच्या आखाड्यांत या, सर्व नीतीतत्त्वें आचरणांत बदललेलीं तुम्हांला दिसतील. एवढेंच नव्हे, तर तीं बदलल्यानेंच व्यवहार यशस्वि होतो असें तुम्हांला आढळेल."

विरागला त्याचा अनुभव आला होता. त्या शिक्षकानें प्रांजळपणें व्यवहाराच्या यशस्वितेची गुरुकिल्ली मुलांना दाखविली होती. गरीबीमुळें मातीमोल गुण होत असणाऱ्या विरागनें एक खुणगांठ मनाशीं बांधली. त्यानें धीर सोडला नाहीं. त्याची वृत्तीच ही होती, कीं 'अमुक करीन' म्हणायला त्याला उशीर लागला तरी 'करीन' म्हटल्यावर तो केल्याशिवाय रहात नसे.

मोठेपणावर त्याचा विश्वास नव्हता, तरी त्यानें व्यवहारांत यशस्विता मिळविण्याचा निश्चय केला. स्वतःचें विश्व व त्या विश्वांत स्वतःचा मोठेपणा मिळविण्याचा त्यानें निश्चय केला. त्या निश्चयापासून त्याला कोणतेंही संकट परावृत्त करूं शकलें नसतें. त्यानें त्यासाठीं स्वतःची मातब्बरी बाळगली नाहीं.

व्यवहाराची यशस्विता, पुष्कळशा सुखांची व मानसन्मानाची गुरुकिल्ली धनांत दडलेली असते. सुवर्णाची प्रभाच अशी आहे, कीं त्या प्रभावलयांत कुरूपही सुरूप समजला जावा, नीचही गुणवान् समजला जावा, अक्षरशत्रु व्यवहारशून्याच्या मतालाही बहुमान चढावा. व्यवहाराची यशस्विता म्हणजे तरी दुसरें काय आहे? ती सत्य, उद्योग, उत्साह यांवर उभी असल्याचें समाजशिष्टांनीं कितीही ओरडून सांगितलें, तरी असत्याच्या भरभक्कम पायावरच व्यवहार यशस्वि होतांना त्याला दिसत होता.

ज्या समाजानें त्याच्या गरीबीचा वारंवार उपहास केला होता किंवा त्याला अव्हेरिलें होतें, त्याच समाजाचीं शिरें त्याच्या पुढें नमावयाला त्याला एकच गोष्ट पाहिजे होती—पैसा.

त्यासाठीं त्यानें आपल्या सर्व आशा, इच्छा दाबून टाकल्या. पैसा, पैसाही मिळेल तो, तो सांठवूं लागला. अडाणी माणसाचें पत्र लिहून देण्याबद्दल मिळणारा पैसाही तो घेई, एका जेवणाचे पैसे शिल्लक पडण्यासाठीं खाणावळींतील उष्टींही गुपचुप काढून येई. "जादू" "जादू" म्हणून मुलांच्या थव्यांची नजरबंदी करून जादुगिरीची बिदागीही घेई. एकाद्या संशोधक मंडळांतील मोडी अक्षरें तास न् तास लावीत बसून मिळणारे दहा रुपयेही घेई. एकाद्या कॉन्ट्रॅक्टरच्या हाताखालीं गड्याप्रमाणें राबे. सिनेमानाटकांचीं तिकिटें हौशी कॉलेजियन्सच्या गळ्यांत बांधून दलाली करी. त्यांचे टेनिसचे उडालेले चेंडू देण्याबद्दल चार आणे घेई. मर्तिकाच्या मोक्षासाठीं गोंवऱ्याही द्यायला तो तयार असे. क्षणाक्षणाला त्याच्या बुद्धीला जे जे पैशाचे मार्ग दिसतील तेथून तेथून तो पैसा काढीत असे. योग्य ठिकाणीं तोंड वेंगाडायला त्यानें कमी केलें नाहीं.

हे सर्व उद्योग करून त्यानें आपला अभ्यास चालू ठेवला. मोठेपणाला पदवीचें शेंपूट असलेलें फार चांगलें! कधीं कधीं त्याला फक्त एकादा दुसरा तास झोंप मिळे. चुरचुरत्या डोळ्यांनीं तो तसाच राबे आणि अभ्यासही करी. तीक्ष्ण बुद्धीच्या विरागला पास होणें कठीण गेलें नाहीं.

सारा दिवस चाललेल्या त्याच्या या राक्षसी उलाढालीचें स्वरूप त्याच्या सहाध्यायांच्या नजरेला येत नसे. तो भयंकर उद्योगी आहे, एवढें त्यांना कळे. त्याच्या उद्योगामुळें त्यांच्या मनांत विरागबद्दल

आदर उत्पन्न झालेला होता. तें त्याला कळतही असे. पण तेवढ्यावर लगेच स्तुतिपाठकांचें मित्रमंडळ आपल्या भोंवतीं नाचवायचा मोह त्याला झाला नाहीं. तो त्यांच्यापासून दूर राही, कारण जवळ जायची वेळ अजून आली नव्हती. आपल्याबद्दल कोणाच्या मनांत कींव उत्पन्न करावी याचें विरागला पुरें ज्ञान होतें. कोणा वाटेल त्या व्यक्तीच्या मनांत कोरडी कींव उत्पन्न करून स्वतःचा दुबळेपणा त्यानें कधींच दाखवला नाहीं. ज्यांनीं केलेली कींव विरागला पुढें ढकलण्यास उपयोगी पडेल, अशांच्या मनांतच तो स्वतःबद्दल कींव उत्पन्न करी. त्यामुळेंच एका कंजुष मारवाड्यानें सुद्धां त्याला दरमहा पांच रुपयांची मदत करण्याचें ठरविलें; प्रिन्सिपॉलनें फ्रीशिप दिली, प्रोफेसरांनीं फुकट पुस्तकें दिलीं—नव्हे त्याची बुद्धिमत्ता पाहून त्याला हरतऱ्हेनें उत्तेजन दिलें.

तो काय करतो, किती तऱ्हांचे उद्योग करतो, हें कोणाही सहाध्यायाशीं तो बोलत नसे. स्वतःला सोसावे लागणारे घाव स्वतःच्या मनांत ठेवण्याइतकें त्याचें अंतःकरण कणखर होतें. त्याच्या मनांतील गांठ कोणालाच उलगडली नाहीं. हरतऱ्हेचे उद्योग करीत असतांना, येणाऱ्या विचित्र अनुभवांना मीठ मसाला घालून तो कथाही लिही.

विराग जी ढाल हातीं घेऊन प्रतिकूल परिस्थितीशीं झुंजत होता, तिचा दर्शनी भाग मोहकपणें तळपूं लागला. तिची दुसरी–काळी कुट्ट काबाडकष्टांची बाजू लोक विसरूं लागले. विराग जोरानें झुंजत पुढें चालला. बुद्धीच्या तल्लखपणानें त्याचे सहाध्यायी त्याच्याकडे प्रेमादरानें पहात; अध्यापक आशेनें व प्रेमानें पहात. तो स्वतःत

रंगून पुढें चालला. बी. ए. झाला, एल्. एल्. बी. झाला. त्यानें पैसा गांठीशीं ठेवला. त्याच्या या अनेकविध उद्योगांतील अनुभवांची श्रीमंती-ही कांहीं थोडीथोडकी नव्हती. नाना दर्जाचे, नाना धंद्याचे लोक त्यानें पाहिले–अगदीं जवळून पाहिले. त्यानें जगाचें स्वरूप ओळखलें. अस्सल ढोंगीपणा. तोच पाहिजे आहे. नीट नांदायला जगांत दोन मुखवटे घालून वावरावें लागतें. विरागनें जगासाठीं निराळा मुखवटा धारण केला, तरी त्याच्या अंतःकरणांतील सौजन्य रतिमात्र कमी झालें नव्हतें. दुःखितांचे अश्रू कठोरपणें पहात असतां, त्याचें कणखर अंतःकरण दयार्द्र झालेलें असे.

रंगभूमीवर नटून, थटून प्रवेश करणाऱ्या पात्रांना पडद्यामागच्या, सजावटीच्या खोलींतील कोणतेंहि दृश्य प्रेक्षकांपासून लपविण्याची काळजी घ्यावी लागते. विरागचें कॉलेजचें आयुष्य संपलें. आयुष्याला सुरुवात करण्याइतका पैसा त्यानें जवळ केला. या सजावटीच्या काळांतील दृश्य नजरेआड होऊन नव्या भूमिकेची सुरुवात करण्यासाठीं विरागनें स्थानत्याग केला. त्यानें मुंबई सोडली. युरोपीयन प्रिन्सि-पॉलच्या शिफारसीचा उपयोग होऊन त्याला पब्लिक प्रॉसिक्यूटरची जागा मिळाली.

आयुष्यांत नाना तऱ्हांनीं झगडून त्याला आतां तिसाव्या वर्षी कुठें स्थैर्य आलें होतें. चांगल्या जाम्यानिम्यानिशीं तो नागपुरास राहूं लागला. त्या बाह्य देखाव्यानें त्याचा दर्जा मोठा आहे, असें मोठ्या लोकांस वाटे. त्याच्या भोंवतालीं मोठ्या दर्जाच्या लोकांचें कडें तयार होऊं लागलें. त्याच्या आर्थिक दर्जाबरोबरच त्याच्या तल्लख बुद्धिमत्ते-

मुळें ते सर्व आकर्षिले जात होते. पण विरागच्या सान्निध्यांत राहणारांनाही विराग कसा आहे, त्याचें अंतरंग कसें आहे, तें कळलें नव्हतें.

## १२

विरागला स्त्रीजगताचें जवळून ज्ञान व्हायला, त्याची आई व आईसारख्याच कांहीं स्त्रिया यांखेरीज त्याचा इतर कोणाशीं परिचय झाला नव्हता. मात्र अडीअडचणींतून पुढें येण्यासाठीं अविरत श्रम करणाऱ्या विरागनें स्त्रियांनीं बनलेली विश्वाची अर्धी बाजू अगदींच उपेक्षिली होती, असें नाहीं. तोही या स्त्रीजगताकडे पहात होता. त्याचा ग्रह कांहीं विशेषसा अनुकूल नव्हता. त्याला त्या अक्षरशः खेळणीं वाटत. चैन ज्याला करायची आहे, त्यानें त्यांच्याकडे लक्ष द्यावें एवढें त्याला कळत होतें. तें स्त्रियांचें विश्व, सगळें कांहीं तरी मऊ मऊपणाचें केलेलें...त्या ठिकाणीं बसलेल्या त्या वल्लरींना पुरुषांचा वारा म्हणजे अपमान वाटतो! स्वतःस गुरफटलेल्या व संकुचित मनोवृत्तीनें, संकुचित जगांत फिरणाऱ्या या कोमल वल्लरींशीं ओळख करून घेणें, ही पुरुषाची एक चैन आहे असें त्याला वाटे.

त्याला कुठें सवड होती ही चैन करायला? स्त्रीदाक्षिण्य त्याच्या ठिकाणीं होतें. तो स्त्रियांची कींव करी पण अबला म्हणून. त्याला अत्यंत आदरणीय, एकमेव चीज "स्त्री" असें कधींच वाटलें नाहीं. घराच्या सांवलींत वाढून, खुरटलेल्या या फुलवेलींची शोभा सतत

पहात बसण्याची त्याला इच्छा नव्हती. त्यानें जगाच्या सौंदर्याचीं, कोमलतेचीं, मनाशीं खांडें खांडें करून पाहिलेलीं होतीं. एकाद्या सुंदर स्त्रीकडे पाहिल्यावर क्षणभर त्याचें मन ओढलें जाई. लगेच तो म्हणे, "सुंदर वस्तु मिळाली, ती वर्षानुवर्षे जवळ ठेविली कीं ती शिळी होईल. हें सौंदर्य मला सतत वेधून ठेवणार नाहीं. सौंदर्याशिवाय आहे काय त्यांत?" स्त्रीत्वाची मोहिनी कोणाही पुरुषावर पडायचीच. त्याच्यावरही ती पडे; पण त्या संसाराच्या शिळेपणानें मनाची केविलवाणी अवस्था करून घेण्यापेक्षां त्यापासून दूर असलेलें बरें असेंच त्याला किती दिवस वाटत होतें.

तो या स्त्रीजगाकडे पाही, कुतुहलानें, उत्सुकतेनें पाही. त्याच्या साहसी स्वभावाला अनुसरून, त्यानें हेंही साहस करून पाहिलें असतें. पण परिश्रमानें मिळविल्याशिवाय त्याचें समाधान झालें नसतें. ज्यांनीं त्याच्या गरिबीचा उपहास एके काळीं केला होता, त्यांनींच आपल्या मुली "करण्याबद्दल" त्याला अनेकदां गळ घातली होती. पण ज्या मुली त्यानें पाहिल्या त्या त्याला "बाहुल्या" वाटत. या बाहुल्यां-बरोबर अक्षरशः चैन करितांना, त्याच्या बुद्धीचा कस लागण्याचें कारण नव्हतें व त्या त्याच्या आयुष्यांत जड जोखड होऊन बसल्या असत्या. कोणतीही गोष्ट मिळविण्यासाठीं धडपड करूं इच्छिणारी त्याची बुद्धि सहजासहजीं प्राप्त झालेल्या सुखाला सुख मानूं शकली नसती.

राधिकेच्या घरीं तिच्या भावाच्या ओळखीमुळें त्याचें वारंवार येणें जाणें होई. राधिका ही सर्वसामान्य मुलींचें प्रतीक होती. राधिकेचे

गोडवे हावभाव, बोलणें, यांनीं त्याचें मनोरंजन झालें, तरी तें कांहीं वेळ. अचलेची त्याला त्याच वेळीं माहिती झाली. तिला प्रत्यक्ष पहाण्यापूर्वी, तिच्याबद्दल त्याची कल्पना काय होती कोण जाणे! पण तिचा तो दुहेरी मुखवटा—तिच्या अंतःकरणांत तेवत असलेली ती ज्वाला, त्याला स्पष्ट दिसत होती. बुद्धिभावनांनीं सारखेंच वर्चस्व गाजवलेली स्त्री त्याच्या पहाण्यांत आली नव्हती. अचलेमध्यें कांहीं तरी निराळें होतें. साऱ्या आयुष्यभर झगडूनही धीरानें तोल सांवरून राहणारी व्यक्ति, विशेषतः स्त्री—तिच्यांत व त्याच्यांत कांहींसें साम्य त्याला दिसलें. आयुष्याच्या लढ्याला असहायपणें नव्हे, तर सहेतुकपणें व बलानें तयार झालेल्या अचलेनें, त्याचें चित्त वेधून घेतलें, यांत शंका नाहीं.

## १३

मधल्या सुटींत चहासाठीं म्हणून सगळ्या शिक्षकिणी एकत्र जमल्या होत्या. त्या अकरा शिक्षकिणींत दोन विधवा, लग्न ठरलेली राधिका, अचला व बाकी सातही कुमारिकाच होत्या. तेवीस पासून तीस पर्यंत वयाच्या त्या स्त्रियांत नानातऱ्हांची थट्टामस्करी चाले. त्यांच्यांत किती तरी मतभेद होते. ते तीव्र होते; पण चहाच्या वेळीं वरपांगी सर्वजणी एकदिलानें थट्टामस्करी करीत. थट्टेला सुद्धां तरतम भाव असतो. थट्टा निरुपद्रवी असूं शकते. तशीच थट्टा थट्टा म्हणून दुसऱ्याचा मर्मभेद करणारीही थट्टा असते. जिच्या तिच्या स्वभावाआवडीप्रमाणें, जिनें तिनें बोथट किंवा तीक्ष्ण शस्त्र हातीं घेतलेलें असे. ट्रेनिंग कॉलेजमधील शिक्षण पुरें झालेल्या जुन्या मताच्या, विधवा शिक्षकिणी अतिशय

गंभीर असत व मधून मधून गंभीरपणें थट्टा केली, तरी कुणाच्या तरी लग्नाबद्दलचीच करीत. अचलेच्या अंतःकरणांतले कढ त्यांच्याहूनही जाळणारे असले तरी तिच्या दुर्दम्यवृत्तीनें ती निरुपद्रवी थट्टामस्करी करी. राधिकेचें लग्न आठवड्यानेंच होणार असल्यानें, ती सर्वांच्या थट्टेचा विषय होई. अशाच वरून बोलणें चाललें होतें.

" काय ग. चहा उपडा केलास ? लक्ष कुठें आहे ? आं ? "

" अग बाऽई. अस्सं कां ? आम्हांला नव्हतं माहीत. "

" बायांनो, आतां या म्हातारीला कोण विचारतो ! No chance for me. तुमचं तुम्ही पहा. "

" अगबाई, इतकं का वाईट वाटतं आहे ? सांगूं का स्थळ एकादं ? " एक विधवा अर्धवट थट्टेनें व गंभीरपणानें म्हणाली.

" झालं बाई. गंगाताई अगदीं लगेच स्थळांची यादी घेऊन तयार. "

" जणुं नकोच असेल ना अगदीं ? "

" खरंच नको आहे. जेव्हां तेव्हां कांहीं लग्नाचेच विचार करीत असतों कीं काय आम्हीं ? "

" जेव्हां तेव्हां नाहीं. पण कधीं कधीं अगदीं डोकें फिरेपर्यंत करतां ना ? " अचला हंसत म्हणाली.

" माझ्या मनांत तरी कधींसुद्धां लग्नाचा विचार आला नाहीं बाई. " तीस वर्षांची एक कुमारिका म्हणाली.

" खरं ? "

" अगदीं खरं " अगदीं सत्यपणाचा आव आणीत ती म्हणाली.

" अगबाई, मग Something must be wrong with you. "

" What do you mean ? "

" माझं म्हणणं तुमची वाढ नॉर्मल स्त्रीची दिसत नाहीं. "

" नॉर्मल स्त्रीची म्हणजे ? सगळ्यांच्या डोक्यांत असले विचार असलेच पाहिजेत असं शास्त्र आहे कीं काय ? "

" हो. असंच मानसशास्त्र आहे. असं न वाटणाऱ्या मेंदूंत कांहींतरी विकृति असली पाहिजे. "

" अरे वा, तुम्ही बऱ्याच मनकवड्या दिसतां कीं हो, आमच्या मनांतलं सांगायला पहातां तें ? "

" काय बाई तरी, या सगळ्या विवाहितांना वाटत असतं, कीं बस्स, लग्न, लग्न—" दुसरी म्हणाली.

" कशाला ग फसवतां अशा ? म्हटलंत स्पष्टपणें 'आम्हीं विचार करतों' तर काय बिघडलं ? "

" पण कधीं करीतच नाहीं आम्ही. " सातांपैकीं सहा गर्जून म्हणाल्या.

" You are fools ! " उरलेली सातवी धैर्यानें म्हणाली. " माझ्या मनांत येतात गऽबाई असले विचार. "

" पण त्यांत गैर नाहींच कांहीं. तें स्वाभाविक आहे. " अचला म्हणाली.

" हट्, आम्हांला मुळींच असं वाटत नाहीं. लग्न ही विषय-पिपासा भागविण्यासाठीं कांहीं तरी संस्था आहे झालं. ज्यांचं लग्नावांचून होईल, त्यांच्या मनोधैर्याची उलट तारीफच केली पाहिजे. "

" कशाला शाब्दिक वादानें ढोंगीपणा करतां? " अचला म्हणाली.

" पुरे झालं बाई, नुसते वाद कसले ग करतां? पाहूं. आम्हीं आहों नि तुम्हीही आहांत. " गंगाताई म्हणाली.

इतक्यांत एका कपाच्या डिझाईन्‌कडे पहात, एक जण मोठ्यानें म्हणाली, " Love me. "

" No one is going to love you " दुसरी म्हणाली.

सगळ्या हंसूं लागल्या.

" पहा, पहा, थट्टामस्करी म्हणून शेवटीं तुम्ही सुद्धां दबलेल्या विचारांना वाव देत असतां. मग कबूल कां नाहीं करीत? "

" अरे पण, या कपावर लिहिलं आहे तें वाचलं. "

" मग या शेजारच्या वर्तमानपत्राच्या तुकड्यावरचं हेडिंग नाहीं तें कुठें वाचलं? " love me " असें मोठ्यानें वाचून जो एक गुदगुदल्या करणारा आनंद होतो, तो थट्टेच्या पांघरुणाखालीं उपभोगायला पाहिजे असतो नाहीं? " अचला म्हणाली.

" हो, पण त्याची किंमत तेवढीच. "

" नाहीं. त्याचीच किंमत अधिक आहे. मन भरून जें ओसंडत असतं ना ? आणि जें तुम्हीं आंतल्या आंत दडवीत असतां ना ? तें अस्सं बाहेर पडत असतं ! " सर्वांनाच बाजू अंगावर आलेली दिसत होती. शेवटीं एकजण म्हणाली.

" मग विधवांच्या मनांत सुद्धां नसतील का असले विचार खेळत ? "

गंगाताईंना जरा अपमान झाल्यासारखेंच वाटलें. त्या म्हणाल्या, " मुळींच नाहीं. त्यांचं ठरलेलं असतं नशीब. "

" कां ? आतां आहे कीं पुनर्विवाहाची मोकळीक. "

" पण तें निराळं. तो म्हणजे अगदीं शेवटचा मार्ग. "

" हो. मग आम्हीं आमच्या बाबतींत तेंच म्हणतों. "

" पण साधारणपणें विधवांच्या मनांत यायचंच नाहीं. " गंगाताई विधवांची बाजू सांवरीत म्हणाल्या.

" काय हो अचलाताई, आतां हा नाहीं कां वाटत ढोंगीपणा ? "

इतक्यांत घंटा झाली. वर्गावर जाण्यासाठीं सगळ्या जणी उठल्या. जातां जातां अचला म्हणाली, " नाहीं कोण म्हणतं ? असाच सगळा ढोंगीपणा आहे. " घंटा झाल्यामुळें निरनिराळ्या वर्गाकडे त्या निघून गेल्या. अचलाही वर्गाकडे जायला निघाली. जातां जातां ती स्वतःशींच म्हणाली, " सगळाच ढोंगीपणा खरा. मानवी संकेत पाळ-

णारा थोडा ना फार ढोंगी असतोच. मी सुद्धां ढोंगीपणानेंच नाहीं का वागत ? ”

मधल्या सुटींतलें गंमतीचें बोलणें संपलें. वर्ग सुरू झाले. एक दोन तास झाले. शाळा सुटली. राधिका व अचला नित्याप्रमाणें बरोबर घरीं जाण्यासाठीं निघाल्या.

“ काय वाद केले आज मधल्या सुटींत नाहीं उगाच ? ”

“ उगीच नाहीं, राधिके. असलंच बोलणं मला वाटतं विचार करायला लावतं. ”

“ पण कित्येक वेळां कीं नाहीं, वादांतून भलतंच कांहीं निर्माण होतं. ”

“ कां ? आज कांहीं झालं कीं काय ? ”

“ नाहीं. तसं नाहीं. आपला उद्देश असतो निराळा आणि लोक निराळ्याच दृष्टीनें पहातात. ”

“ काय ? पण झालं काय ? ”

“ तसं नाहीं अचलाताई, पण तुला चंपा माहीत आहे ना कशी आहे ती ? ती अगदीं तुझी पाठ फिरतांच तेवढ्यांतल्या तेवढ्यांत म्हणाली कीं विधवा, कुमारिकांच्यापेक्षां या टाकलेल्या सधवाच मोठ्या ढोंगी न् कुत्सित असतात. त्यांना कोणाचीं ना कोणाचीं तरी लग्नें लावण्याशिवाय सुचत नाहीं. आणि अगदीं जगाकडे पाहण्याची दृष्टी-सुद्धां अशीच घाणेरडी झालेली असते. ”

" पण मी काय कुणावर आरोप केला ? "

" तेंच तर. पण आजचा सगळा वाद तिलाच उद्देशून होता, असं तिला वाटलं. "

" काय म्हणून ? "

" अग, असं काय करतेस ? तुला माहीत नाहीं का तिचं दोघां तिघांशीं जमून मोडलं तें ? "

" अस्सं होय, मला माहीतसुद्धां नाहीं. "

" हो. मग कांहीं तरी बोलायचं, म्हणून सगळा सूड काढला तुझ्यावर. "

" तरी बरं, मी कधीं कुणाच्या अध्यामध्यांत नसतें. "

" पण तूं सगळ्यांना हवी हवीशी वाटतेस ना ? त्याचाच हेवा आहे सारा. मग तुझं सगळं असं विपरीत दिसतं तिला."

" काय बाई, मी तरी काय करणार ? "

" बाकी कमाल आहे हं तिची. ती किती घाणेरडं बोलते याची मला तरी आजच कल्पना आली बाई. "

" काय म्हणत होती ती आणखी ? "

" जाऊन् दे ग. "

" हें पहा राधिके, कट्यार अर्धीच भोंसकून कधीं सोडूं नये. "

" असं काय करतेस अचलाताई. तुलाच उगीच वाईट वाटेल."

" मग अर्धवट कशाला बोललीस ? सांगून टाक सारं आतांच. "

" ती म्हणत होती, कीं अचलेला नवऱ्यानें टाकली, ती तिच्या कांहीं अनीतीच्या वागणुकीमुळें; आणि तुझ्या न् विरागच्याबद्दल सुद्धां कांहीं तरी असंच ती बोलली. "

अचलेच्या अंगांतून चमक निघून गेली. " हं. सुरुवात झाली एकूण. " पण ती बाह्यतः शांतपणें म्हणाली, " चालायचंच, जग आहे हें. " बोलतां बोलतां राधिकेचें घर आलें. तिनें आंत येण्या-बद्दल अचलेला खूप आग्रह केला, पण तिनें आपली सोडवणूक करून घेतली. मनाला लागलेले भाले तिला असह्य झाले होते.

अचला घरीं आली. सकारण झालेल्या निंदेनें सुद्धां मनुष्य संतापतो. मग विनाकारण झालेल्या निंदेनें संताप आल्यास नवल काय ? आतांपर्यंत या सहशिक्षकिणींशीं आपण कशा रीतीनें वागत आलों, याचा आढावा अचला घेऊं लागली. सौजन्याचें फळही नेहमीं चांगलेंच मिळतें असें नाहीं. तिनें तें सभोंवतालचें जग पाहिलें होतें. त्या प्रौढ कुमारिकांकडे पाहूनच एकदां तिला वाटलें होतें, ' मीच सांसारिक जीवनासाठीं एवढी भुकेलेली आहें. माझ्यांत कांहीं तरी मानसिक दौर्बल्य असलें पाहिजे. या मुलींना सहजपणें जें मिळण्यासारखं आहे, तें त्या घेत नाहींत. त्यापासून त्या दूर पळतात, उदासीन राहतात; आणि मींच कां अशी अधु मनाची ? " ती त्या मुलींकडे कौतुकानें पहात होती. त्यांच्याकडे पाहून आपल्या उतावीळ व धांवत्या मनाला लगाम बसेल असें तिला वाटलें. ती त्यांचें बारकाईनें परीक्षण करूं

लागली तसतशी तिची निराशा झाली. त्या लग्नाला भीत होत्या. आपल्या स्वातंत्र्याला मुरड पडेल, अशी त्यांना भीति वाटत होती. अविवाहित राहून समाजानें ठरविलेली नीति राखण्यासाठीं त्यांची धडपड होती; पण ती राखीत असतां त्या मनानें भित्र्या होतांना तिला दिसत होत्या. खुल्या विचारांना भिऊन त्या मनें कुजवीत होत्या, आणि त्या कुजलेल्या मनानें भीत भीत सभोंवार नजर टाकीत असतां, त्यांच्यांत अजाणपणें शिरलेल्या मत्सरानें त्यांना न मिळालेलें सुख ज्यांना ज्यांना मिळालें, त्यांवर त्या खुशाल तोंडसुख घेत होत्या; साध्या, सरळ गोष्टींचा उपहास करीत होत्या. 'मनाची ही विपरीत अवस्था, ही चळलेली दृष्टि म्हणजेच नीति काय? अशा तऱ्हेची नीति मनुष्यत्वाची वाढ करणें शक्य आहे का?' तिचा विश्वास अशा नीतीवर बसेना! 'यांची ही नीति! आणि माझी कोणती अनीति त्यांनीं पाहिली?...'

हलुहलु संध्याकाळच्या मंद प्रकाशावर अंधार मात करीत होता. दुःखद विचार अचलेच्या अंतःकरणांतील आनंद मालवीत होते. तिनें एकदम चपापून पाहिलें.

"कोण विराग? तुम्हीं आतां कसे आलां?"

"To lighten the darkness" हंसत हंसत विराग म्हणाला.

"अस्सं?" ती खिडकीपासून झटकन् दूर झाली. तिनें डोळे पुसले. दिवा लावण्यासाठीं ती खोलीच्या दुसऱ्या बाजूला गेली. एकलेपणानें अंधारांत चांचपडणाऱ्या अचलेकडे विराग पहात होता. त्याच्या

तीक्ष्ण नजरेंतून अचलेनें झटकन् पुसलेले अश्रू सुटले नाहींत. आणि अश्रूच कशाला? त्या उदास वातावरणांत इतका वेळ दिव्यावांचून थांबणाऱ्या अचलेच्या मनाची अवस्था, कोणाही विचारी माणसाला सहज उमगली असती. विराग अचलेला पुरी ओळखीत होता. त्यानें तिला सरळपणें ' काय झालं ' म्हणून विचारलें असतें, तर तिनें हटकून भलतेंच नाटक करून, खोटें हंसून, फसवायचा प्रयत्न केला असता. ' तिनें आपण होऊन बोललें पाहिजे. तिला न कळतां बोलायला लावलें पाहिजे. ' त्यानें आज निश्चयच केला होता.

" हें काय? Conquest of happiness? " तिनें खुर्चीवर टाकलेलें पुस्तक हातीं घेत तो म्हणाला.

" हं. "

" सुखी आहांत बुवा. "

" आणि तुम्हांला काय कमी आहे? "

" कोण म्हणतं? मला तर कांहीं कमी नाहीं. मला तर वाटतं सगळ्यांत सुखी मी आहें. "

" मला हेवा वाटतो तुमचा. "

" तुम्हांला? कां बुवा? आतां तर तुम्हीं सुखाचा मार्ग मिळवला. Conquest of happiness! " गंमतीनें वर वर सहजासहजीं बोलत अचलेच्या मनांतील गांठ उकलायला त्यानें आरंभ केला.

" अहो, अशीं पुस्तकं वाचून सुख मिळतं, मग कशाला हवं होतं? "

"मला कळत नाहीं, तुम्हीं दुःखी कां तें." अगदीं अजाण-पणाचा आव आणून विराग बोलूं लागला.

"मला कळत नाहीं तुम्हीं सुखी कां समजतां मला तें."

"तुम्हांला दुःख करायचं कारण नाहीं म्हणून."

"तुम्हींच त्या दिवशीं म्हणालां नाहीं ?"

"काय ?"

"जीवनांत जर चैतन्य नेहमीं टिकत नसेल, तर तो नसल्याचं दुःख वाटण्याचं कांहीं कारण नाहीं., आणि मला दुःख वाटत नाहीं. असंच कांहींसं म्हणालां होतांत नाहीं ?"

"हो, तेंही खरं आहे."

"मग झालं तर. तुम्हांला संसार नसल्याचं दुःख भासायचं पण तें नाहीं, असं तुम्हीच कधीं कधीं म्हणतां. तुम्हांला स्वावलंबी स्वतंत्र जिण्याचं सुख वाटतं, तें तुम्हीं लुटतां आहां नाहीं का ?"

"विराग, तुम्हांला कळायचं नाहीं तें." आज तिच्या मनाचा संयम नाहींसा झाला होता. तिची इच्छा नसतां तिचे डोळे पुनः भरून आले. विराग गंभीर झाला.

"अचलाबाई, तुम्हांला त्रास व्हावा अशी माझी इच्छा नव्हती हं." कांहीं वेळ दोघेंही कांहींच बोललीं नाहींत. नंतर अचला म्हणाली, "तुम्हांला काय, कुणालाच कांहीं कळायचं नाहीं. कुणीं कळ-वून घेणार नाहीं." अचलेच्या दुःखाला वाचा आजच फुटणार हें

विरागला कळून चुकलें. तो कांहीं न बोलतां तिच्याकडे पहात राहिला. मधून मधून थांबून अश्रू पुशीत तीच बोलूं लागली.

" विराग, मी दुःखी आहें, असं मी वाटेल त्याला सांगण्यांत मला त्याच्याकडून काय समाधान मिळेल सांगा पाहूं ? जेव्हां संधि सांपडेल, व जें कोणी भेटेल, त्याजवळ जर दुःखी मनुष्य दुःखाचा पाढा वाचूं लागेल, तर सहानुभूति राहोच, पण उलट तिरस्कार येतो अशा माणसाचा; नाहीं तर लोकांना करमणुकीला आपण विषय होतों एवढेंच. रस्त्यांत भिकारी काय थोडे हिंडतात ? थोड्यांना का ते ओळखतात ? 'सारखीं केविलवाणीं तोंडें वेंगाडीत असतात. किती जण त्यांना खरा कळवळा दाखवतात ? भरींव सहानुभूतीची भीक मागून मिळत नसते. तुमच्या मुक्या दुःखांनींच आयुष्याचा लढा लढत असाल तरच तुमच्याबद्दल प्रेम, आदर, कळवळा रहात असतो. तुम्हीं असहाय व्हा, तसं बोला, सर्वांच्या कनवाळूपणाच्या आशेवर जगायचं ठरवा, तुमचं जग तुम्हांला अधिक निस्सहाय करतं.' विरागला तिच्या बोलण्यांत खंड पाडण्याची इच्छा नव्हती. पण सहानुभूति दाखविण्याचे त्याचे मार्गही निराळे होते. ते मार्ग तितकेंच जाणणाराला कळले असते. तो म्हणाला, " ठीक आहे. भावनांवर कठोरतेचें कवच घालून हिंडतां आहांत ना तुम्हीं मग ? "

" अर्थात्. माझ्या मनाचा दुबळेपणा नाहीं मी कोणाला दाखविणार. तुम्ही–तुम्ही मात्र–"

तिला काय तें बोलतां येईना. ती बोलली नाहीं, बोलूं शकली

नाहीं–तो तिचा स्वभाव नव्हता. त्यालाही शब्दस्वरूपांत कांहीं ऐकायला नको होतें. पण त्याला सर्व कळलें. विराग तिला इतर स्त्रियांपेक्षां निराळी समजत होता का? 'पुरुषांच्या सहानुभूतीची कधींही अपेक्षा करायची नाहीं' या प्रतिज्ञेला तिनें विरागला अपवाद केलें होतें का? अचलेच्या चेहऱ्यावर तिच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब केवळ त्याच्याच देखत पडलें, हें त्याला कळलें. नाहीं तरी असंच नाहीं का? अंतःकरणांत उचंबळलेल्या भावना मूक स्वरूपांत चेहऱ्यावर उमटलेल्या पहाण्यांत जी जादू आहे, ती शब्दानें व्यक्त करण्यांत नाहीं. "प्रेम" "प्रेम" म्हणून जें म्हणतात, त्याची टवटवी होती का ती तिच्या चेहऱ्यावर? नाहीं. मग काय होतें? साध्या मैत्रीविरुद्ध बंड होतें तें. किनाऱ्यावर लाट जोरानें आदळून तितकीच माघार घेते.

तिला आपल्या मनाच्या दुर्बलतेची एकदम जाणीव झाली. ती लगेच म्हणाली, "नाहीं. तुम्हांलासुद्धां मी दुबळेपणा नाहीं दाखविणार."

विराग तिच्या अश्रूंनीं न्हालेल्या चेहऱ्याकडे पाहूं लागला. विरागला तिच्या मनाचा झगडा कळून चुकला. थंडीच्या दिवसांत जसें सूर्याचें ऊन फार वेळ सहन होत नाहीं व तें सोडूनही जावयत नाहीं; अशीच कांहींशी स्थिति तिची झाली होती. विरागला दूरही लोटावेंसें तिला वाटेना; त्याला जवळ येऊं द्यावें, असेंही तिला वाटेना; भावना तिला त्याच्याकडे खेंचीत होती, पण बुद्धि तिला मागें ओढी. "मी करतें हें बरोबर आहे का? विरागशीं परिचय ठेवणं, वाढवणं..."

विरागला हें तिच्या वागणुकीवरून स्पष्ट कळत होतें. हिंदोळा जितक्या वेगानें पुढें येतो, तितक्याच जोरानें मागें जातो. अचला एकादे दिवशीं त्याच्याजवळ पुष्कळ बोले. दुसऱ्या वेळीं तितकीच माघार घेई. पण लाटा किनाऱ्यावर आदळल्या, तरी किनारा कधीं लाटेकडे धांव घेत नाहीं.

अचला अश्रू पुशीत असतां विरागला वाईट वाटलें नाहीं, असें नाहीं. पण तें दाखविण्याची त्याची वृत्ति नव्हती. ती म्हणाली, "नाहीं, मी तुम्हांलासुद्धां माझ्या मनाचा दुबळेपणा दाखविणार नाहीं." तिच्याकडे निस्तब्धपणें पाहून तो म्हणाला, "मला अश्रू गाळणाऱ्या बाईचं दृश्य मोठं दर्शनीय आहेसं वाटत नाहीं." आणि खरोखरच त्यानें प्रश्न विचारून, सांत्वन करून, तिचें मन उघडून पहाण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं. पण त्याची ही जी तुटक वृत्ति, तीच अचलेला त्याच्याकडे ओढून आणी.

## १४

सिंधू वहिनीच्या आग्रहाच्या निमंत्रणाखालीं दुहेरी रेखा मारून महत्व पटवलेलें स्वतःचें निमंत्रणही अचलेला माणिकनें दिलें होतें. अचलेला अकोल्यास गेल्याशिवाय रहावेना. बाबा व भाऊसाहेबांचीं निकडीचीं पत्रें आलीं होतीं. जलाशयावरून उडणाऱ्या पक्षांचें प्रतिबिंब जसें तात्पुरतेंच त्यांत राहतें, पुन्हां तो जलाशय निर्विकार होतो, तसेंच अकोल्याहून नागपुरास जातांना अचलेच्या मनांत उठलेले विकल्प केव्हांच

नाहींसे झाले होते. पुन्हां शाम, कुंदा हे तिचे छोटे खेळगडी, बाबा, माणिक सगळीं सगळीं तिला दिसूं लागलीं. तिला त्यांच्यांत जाऊन पुन्हां आत्मीयतेनें हंसण्या बोलण्याची भूक लागली. ती दिवाळीची सुटी होती. आगगाडीच्या चार तासांच्या प्रवासांत तिच्या विचारांना पायबंद घालायला कोणी कोणी नव्हतें.

नुकत्याच सोडलेल्या नागपुरांतील व्यक्ति तिच्या अंतश्चक्षू पुढून जाऊं लागल्या. नागपुरांत तिनें पाऊल ठेवल्यापासून तिचें म्हणून एक जग निर्माण झालें होतें. त्यांत तिच्यावर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या कांहीं व्यक्ति होत्या, तर कांहीं द्वेषाग्नीनें जळत होत्या. चंपावती त्यांतील अग्रगण्य होती. अचलेची प्रत्येक गोष्ट तिला विकृत दिसे. तिचें सौजन्य तिला ढोंगीपणाचें वाटे, तिची सात्विकता लबाडीची वाटे, तिच्या लोकप्रियतेला कारण ती निंदक असली पाहिजे, अशीही तिची कल्पना होती. एकदां गैरसमजाचा भुंगा दुबळें मन पोखरूं लागला, कीं तो मन पुरें पुरें कोरल्याशिवाय रहात नाहीं. गैरसमज झालेले विसरायलासुद्धां मन स्नेहार्द्र लागतें. विदारलेलें मन त्या स्नेहानेंच निकोप होत असतें. आत्मप्रतिष्ठेची आवड सर्वांनाच असते. पण दुबळे लोक दुसऱ्यांचीं व्यंगें काढून आत्मप्रतिष्ठा वाढवूं पहातात. त्यानें त्यांची आत्मप्रतिष्ठा वाढतेच असें नसलें, तरी दुसऱ्यांना खालीं ओढायला त्यांचे प्रयत्न कारणीभूत होतात, यांत शंका नाहीं.

चंपावतीच्या मैत्रिणींत अचलेबद्दल विशेष प्रेमभाव नव्हता. नवऱ्यानें टाकलेली स्त्री इतक्या आनंदी वृत्तीनें राहते, यांतच कांहींतरी

पाणी मुरत असलें पाहिजे, अशी त्यांची कल्पना होती. त्याप्रमाणें त्या नव्या नव्या बातम्या काढण्यास व पसरविण्यास टपून बसलेल्या असत.

अचलेची राधिकेशीं मैत्री ही त्यांच्या डोळ्यांत खुपत असे. राधिकेच्या भावाशीं अचलेला बोलतांना पाहून या मैत्रिणींनीं कुत्सितपणें एकमेकींकडे अर्थपूर्ण दृष्टीनं कितीवेळां तरी पाहिलें होतें. अचलेच्या कानावर जाईल अशा तऱ्हेनें एकादें वाक्य बोलण्यालाही त्यांनीं कमी केलें नाहीं. शाळेंत हेडमिस्ट्रेसच्या तिच्यावरील मर्जीचा अर्थही त्यांनीं असाच कांहींसा लावला होता. त्यांच्या मताप्रमाणें हेडमिस्ट्रेसचा "वहकलेला भाऊ" व "बहकलेली अचला" असा कांहींसा मेळ बसत होता. ज्यांना जळत्या बातम्यांचा भडका उडवून द्यायचा असतो, त्यांच्या पद्धतीही तशाच असतात. मुलींतच एकादी बातमी सांगितली, कीं ती शंभर मुलींत सैरावैरा पसरते. अशीच एक बातमी अलीकडे मूळ धरूं लागली होती.

अचलेच्या डोळ्यांपुढून या गोष्टी झरझर गेल्या. तिचें अंतःकरण व्यथित झालें. राधिकेसारख्या एकाद्या प्रेमळ मैत्रिणीची आठवण होऊन तिला समाधानही वाटलें. मनाचा वारू कुठेंही, कितीही हिंडला, तरी शेवटीं विश्रांतीच्या ठिकाणीं येऊनच त्याला चैन पडतें. अचलेच्या डोळ्यांपुढून अनेक व्यक्ती गेल्या. पण ती पुष्कळ वेळ—नव्हे प्रवासांतील सारा वेळ थबकली ती एका व्यक्तीच्या आठवणीभोंवतीं—विराग !

तिनें मनाला खेळविलें नाहीं. खोटी फसवणूक केली नाहीं.

सत्याची ग्वाही देऊन विरागच्या सान्निध्याची तिला वाटत असलेली आवश्यकता तिनें कबूल केली. त्या सान्निध्याचें स्वरूप तिला कोणतें पाहिजे होतें, हेंही तिनें पूर्ण ओळखलें होतें. समविचारांनीं निर्माण केलेली आत्यंतिक सहानुभूति होती ती. प्रथम विरागबद्दल तिच्या मनांत निर्माण झालेल्या विरोधी भावनेंतही कुतूहलाचा भाग विशेष होता. कुतूहलानेंच ती त्याचें अवलोकन करीत होती. पुढें त्याच्या काठिण्यांतील सहानुभूति तिला दिसूं लागली.........त्याच्यांत अशी कांहीं ज्योत तेवत होती कीं तिनें त्याच्या बुद्धीचा कोणताही भाग अंधारांत ठेवला नव्हता. "क्ष" किरणांनीं नाड्या, शिरा, धमन्या, मांस या सर्वांच्या थरांतूनही स्वच्छ पहावें, त्याप्रमाणें मानवी संकेत, बंधनें, यांतून स्वच्छ पहाणारी विरागची दृष्टि होती. त्यामुळेंच अचला त्याच्याकडे ओढली जात होती.

अचलेच्या पद्धतीप्रमाणें, ती स्वतःचें कठोरपणें परीक्षण करूं लागली. "हा सारा माझा वेडेपणा आहे. त्यांची वागणूक तुटक होती. मीच माझें अस्तित्व त्यांच्यावर लादीत आलें. त्यांनीं सौजन्यानें मला वागविलें; कारण त्यांना दुसरा मार्ग नव्हता." ती स्वतःची निर्भर्त्सना करूं लागली. तिला या सर्वांचा शेवट स्पष्टपणें दिसूं लागला. "स्त्रीनें पुरुषाच्या सहानुभूतीची अपेक्षा करणें, हें अग्नीशीं खेळण्याप्रमाणें आहे." पुन्हां तिला आठवण झाली. 'चुकलेंच माझें. यापुढें मनाचें लाड करतां उपयोगी नाहींत. मनाची हुलकावणी वेळींच ओळखली पाहिजे' तिनें विरागपासून दूर जाण्याचें ठरविलें. पण मग काय? तेंच तें आयुष्य...

# हिंदोळ्यावर

साऱ्या जगांत ‘बदल’ ही किती महत्वाची गोष्ट आहे. त्या ‘बदला’ मुळेंच जगांत रम्यता राहिली आहे. झाडें हिरव्यागार पानांनीं डंवरून येतात, त्यांवर फुलें येतात, फळें येतात, पालवी सुकून जाते, फळें गळून पडतात, झाडें रुक्ष होतात. पुन्हां आपली पालवी. नेहमीं बदल. साऱ्या निसर्गानेंच या बदलानें रम्यता राखिली आहे. मनुष्याच्या आयुष्यांत जर उणीव कसली असेल, तर ती रम्यतेची. आणि रम्यता कां नाहीं तर त्यांत बदल नाहीं ! शंभर धंदे करणारा मनुष्य लोकांच्या उपहासाला पात्र झाला, तरी त्याचें आयुष्य त्याच्या दृष्टीनें रम्य असतें. जीवनाचें नाविन्य तो हर तऱ्हांनीं कायम ठेवीत असतो.

आपल्या बरोबरीच्या शिक्षिकांचे ते सुकलेले चेहरे पाहून अचलेला नेहमीं असेंच वाटे. ‘बदल’ नाहीं. अकरा वाजले. घंटा झाली. शाळा सुरू झाली. मुली पढवल्या. घरीं गेल्या. आपण घरीं जायचें, जेवायचें, निजायचें, पुन्हां दुसरा दिवस उजाडतो. तेंच, तेंच, तेंच ! कांहीं कांहीं बदल नाहीं. मुली पहिलींतून दुसरींत, दुसरींतून तिसरींत सरकत सातवींत जातात—सातवींतून दृष्टीआड होतात. कोण कुठें फेंकल्या जातात त्या लग्नघाईंत आणि नशिबाच्या लाटेंत ! ह्या शिक्षकिणी मात्र तेथेंच, त्याच खुर्चीवर बसून औदासिन्यानें वर्षानुवर्षें शिकवीत असतात. सामान्य माणसांच्या पुष्कळशा उद्योगांचें हें असेंच असतें. त्याच त्या एकाकीपणाला मनुष्य कंटाळून जातो. त्याला बदल हवा असतो. एकाद्या गोष्टीची निःसारता जितक्या लवकर पटते, तितक्या लवकर त्या गोष्टींत बदल व्हावासें वाटत असतें. कित्येकांना ही

निःसारता पटूनही, रडतखडत त्याच गोष्टीला चिकटून रहावेंसें वाटतें; कारण नाइलाज असतो.

अचलेला आपल्या डोळ्यांपुढून मुली जातांना दिसत. 'मी या लता, वेली वाढविण्याचा उदात्त उद्योग करतें.' या नेहमींच्या तिच्या भावनेंतील नाविन्य प्रत्यक्ष आयुष्यांत ओहोटीला लागलें. तें शिक्षण आणि ती शिक्षणपद्धति सगळ्या गोष्टींची अपूर्णताच नव्हे, तर फोल-पणाही तिला डिंवचून विचारी, "जें उदात्त उदात्त म्हणून म्हणतेस, तें खरें उदात्त आहे काय?"

शिक्षणाचा हेतु आत्मविकास, Realization of self—आत्म-प्रतीति. तो हेतु खरोखर कितपत साधतो? तिचा विश्वास उडूं लागला. तिला तरी आत्मज्ञान कोठें झालें होतें? शरीरावर, कुटुंबावर, मित्रांवर, धनावर, बौद्धिक व पारलौकिक गोष्टींवर समतोल प्रेम करा-यला शिकणें, हेंच आत्मविकसन! शिक्षणानें हेंच शिकायचें. तिला तें कोणी शिकवूं शकलें नाहीं. ती कोणाला शिकवूं शकत नव्हती. पुन्हां असमाधान! तिनें आवडीनें आयुष्याला जें निराळें वळण दिलें होतें, तेथेंही असमाधानाचे वारे वाहूं लागले.

अचलेला सारा दिवस शाळेचें काम पुरत असे. त्यांतही खऱ्या विकासापेक्षां संकेतांची जाचणूकच अधिक; किंबहुना संकेतांच्या जाचणु-कीनें विकासाला वावच नाहीं—मुलींच्याही नाहीं, शिक्षकिणींच्याही नाहीं, हें तिला उघड उघड दिसत होतें. शिकवायचें तें आयुष्याशीं फारसें सुसंगत नसलेलें किंवा आयुष्याला बरेंचसें निरुपयोगी असलेलें. मग त्या

शिक्षकिणींबद्दल विचारी मुलींच्या मनांत आदर कां उत्पन्न व्हावा ! शाळेंत अक्षरओळखीबरोबर कशाची खात्री पटत जात असेल, तर त्या शिक्षणाच्या क्षरतेची—वैफल्याची. म्हणूनच त्या शाळेबद्दल, शिक्षकांबद्दल आणि शिक्षणाबद्दल यथातथाच आदर वाटत असतो.

अचलेला हे सर्व विचार त्रास देत. ती काम करी; पण तें काम आतां निर्जीव असे. लष्करी कवाइतीची संवय असलेला माणूस सहजासहजींही त्याच तालांत चालायचा. तसेंच चांगलें काम करण्याची संवय असल्यानें ती चांगलें काम करी. पण त्यांत मन नसल्यानें ती शरीरानें व मनानें थकून जाई. घरीं आल्यावर "काय कांहींतरी करतों आहों आपण !" या विचारानें सबंध दिवस केलेल्या कष्टांवर पाणी पडे.

समुद्रांत रिकामी सोडलेली नाव लाटांच्या तांडवांत अस्थिरपणें जणूं बावरल्यासारखी फिरत असते. पश्चिमेकडून वारा आला कीं चालली जोरानें पूर्वेकडे; पुन्हां वारा पडला तरी तिचा अस्थिर थयथयाट चालायचाच. तिच्या जाण्याला दिशा नाहीं. अचलेच्या आयुष्याची नाव अशीच हेलकावे खात होती. तिनें खूप विचार केला. शेवटीं आशेचीं वल्हीं हातांत घेऊन "धर्म" जेव्हां आयुष्याची नाव वल्हवील, तेव्हांच त्या आयुष्याला दिशा लागेल व विश्रांति-स्थान लाभेल, अशी तिची समजूत होऊं लागली.

आयुष्यांतील अनुभवाची अपूर्णता व अयोग्यता मनाला पटल्यावर मनुष्याच्या नैतिक व बौद्धिक वाढीला आसरा काय तो धर्माचाच. अचलेनें त्याचाही आसरा घेऊन पाहिला.

## १५

वर्ष दीड वर्षांत अचला अकोल्याला आली नव्हती. स्टेशनवर गाडी थांबतांच, सारी मंडळी तिला घेण्याकरितां स्टेशनवर हजर होती. छोटी कुंदा दुड दुड धांवत होती. शाम कांहींसा मोठेपणाचा आव आणून भाऊसाहेबांचें बोट धरून गंभीरपणें उभा होता. अचलेनें गाडींतून उतरतांच कुंदेच्या धडपडीला न जुमानतां तिचे मनमुराद पापे घेऊन तिला खालीं ठेवलें. ती रागानेंच अचलेकडे पाहूं लागली. शामच्या गालावर हळूच चापटी देऊन "गृहस्था, केवढा झालास रे दीड वर्षांत!" असें म्हणत आधींच बावरलेल्या शामचें डोकें तिनें हलविलें. गांवाहून पुष्कळ दिवसानें येणारें मनुष्य घरच्या सगळ्या माणसांचें कुतूहलस्थान होऊन बसतें. भाऊसाहेब, माणिक, बाबा, वहिनी सगळीं तिच्याकडे हंसऱ्या चेहऱ्यानें, कुतुहलानें व आनंदानें पहात होतीं. "ताई, आलीस?" असें म्हणत आपल्या फार जुन्या पद्धतीनें बाबानें हातांतील हॅट् तिच्या पाठीवर मारली. त्या दोन शब्दांत त्याचें प्रेम व दुमदुमलेला आनंद अचलेला कळला. माणिकही म्हणाली, "ताई, वाळलीस कीं ग!" गांवाहून आलेलें माणूस प्रेमाच्या माणसांना नेहमींच कृश झालेलें दिसतें. "वन्सं, दीड वर्षांनीं आलांत ना?" या प्रश्नांत वहिनीची तिच्या येण्याबद्दलची उत्कंठा दिसली.

त्या साऱ्या सुट्टींत बाबा व माणिकच्या पूर्वींच्या अकृत्रिम प्रेमांत कांहींच फरक झालेला अचलेला दिसला नाहीं. मुलांनीं खेळ

म्हणून घातलेले बंधारे वहात्या गंगेंत जसे वाहून जातात, तसेच माणिक-अचलेमधील गैरसमजाचे बंधारे परस्पर प्रेमानें केव्हांच वाहून गेले होते. माणिक स्वतःशींच त्या आठवणीनें ओशाळी होई. अचलेनेंही आपला तोल जाऊं दिला नाहीं.

खेळण्यांत, फिरण्यांत व गप्पांत सुट्टी केव्हां सरत आली, तें कोणालाच कळलें नाहीं. भाऊसाहेब व बाबा यांना मात्र अचलेंत मोठा फरक झालेला दिसून आला. शाळेचें, मैत्रिणींचें व नागपूरच्या अनेक गोष्टींचें वर्णन करतांना ती मनमोकळेपणानें बोले; पण तिच्या अंतःकरणांतील क्षुब्धता ती कधीं कोणाजवळही बोलली नाहीं. हीच अचला बाबाजवळ कित्येक वेळां रडली होती. भाऊसाहेबांच्याजवळ अर्धवट बोललेलेंही सांवरून मनाचा धीरपणा दाखवीत होती. आतां मात्र जणुं काय तिला स्वतःचें दुःख कांहींच नव्हतें. नव्या आयुष्यक्रमानें तिला धीर व जोम आला आहे अशी त्यांची खात्री झाली. त्यांना समाधान वाटलें, व त्यांनींही वाळत्या जखमेवरील खपली काढण्याचा प्रयत्न केला नाहीं. तिच्या धर्मग्रंथांचें वाचन मात्र वहिनी व माणिकच्या सुद्धां थट्टेचा विषय होई. अचला ही सारी थट्टा थट्टेवरच नेई. भाऊसाहेब व बाबा यांना या धार्मिक वाचनांतील गूढार्थ कळत होता. व त्यामुळें अचलेला एक प्रकारें सुख लागेल, अशीच त्यांची भावना होती.

अचला चार दिवस भावाकडे, चार दिवस बहिणीकडे राहून, दोन्हीं घरच्या माणसांत सुटी घालवीत होती. दीड वर्षांत शामची

"माछी"ची ओळख पुसट झाली होती. आतां तो पुन्हां मावशीच्या मागें मागें राही. त्याच्या जोडीला कुंदा "माछी"ला भंडावून सोडी. वहिनीचेंही "हवं नको"चे दिवस आलेले होते. तिला या बहिणी चिडवून चिडवून पुरेवाट करीत. अचला जाण्याच्या आंत चांदण्यांतलें, झोंपाळ्यावरचें, डोहाळजेवण वहिनीला द्यायचें माणिकनें ठरविलें. त्या दिवशीं त्यांचा उत्साह अगदीं उतू जात होता. जाईजुईच्या फुलांच्या वेण्या व झोंपाळ्याच्या कड्यांना बांधायला पांढऱ्या शेवंतीच्या माळा स्वतःच करतां करतां, आणि वहिनीला चिडवितां चिडवितां, संध्याकाळ केव्हां झाली, तें कळलें सुद्धां नाहीं. अंगणांत झाडाच्या फांदीला मुद्दाम झोंपाळा टांगला होता. चांदण्याची शुभ्रता व वहिनीसाठीं केलेला शुभ्र श्रृंगार यांची रंगसंगति मोठी खुलून दिसत होती. वहिनीला माळण्यांत त्यांचे एक दोन तास सहज गेले असतील. शाम, कुंदेच्या उडवाउडवीला त्या दिवशीं अगदीं मोकळें मैदान. त्यांनीं अगदीं मनमुराद उडवाउडवी केली. मनमुराद मावशीच्या चापट्या खाल्ल्या. सारा गोंधळ चालला होता. पण त्यांतहि वहिनीच्या कौतुकाची कोमलता उठून दिसत होती. बऱ्याच बायकांना जेवणाचें निमंत्रण दिलें होतें. पंक्ती पडल्या. अचला माणिक उत्साहाच्या पुतळ्याच त्या. कुठें कांहीं उणें पडलें नाहीं. जेवणाच्या वेळीं आग्रहाआग्रहानें डोहाळे म्हणायला सुरुवात झाली....

आनंद ओसंडून चालला होता. वहिनीचा नाजुकसाजुक जीवही आनंदानें उलून आला होता. तिच्या मनांत आल्हाद

कोंदाटून जावा, आनंदाचें साम्राज्य पसरून जावें म्हणून तर दोन्ही वन्संनीं सारा खटाटोप केला होता. किंचित् धूसर चांदण्यांत कांहींशी फिकट दिसूं लागलेली सिंधू! तें दृश्य मनाला हळुवार करणारें होतें यांत शंका नाहीं. सिंधू डोहाळे किती मन लावून ऐकत होती! "बाळ ऐक बरं? असं गुणाचं बाळ होईल ना माझं?" असें ती जणुं आपल्या देहकोशांतील जीवाला विचारीत होती. तें सारें दृश्य अचला हळुवार अंतःकरणानें पहात होती. कौतुकानें तिचे डोळे भरून आले. ती वहिनीजवळ जाऊन म्हणाली, "वहिनी, माझी दृष्ट लागेल बाई तुला आज!"

"वन्सं, तुमची? असें म्हणून सिंधूनें अत्यंत प्रेमभरानें तिच्याकडे पाहिलें. "अशा वन्सं मिळायला तरी भाग्य लागतें." असेंच जणुं ती म्हणत होती.

बरीच रात्र झाली. सगळीं माणसें झोंपीं गेलीं. पण सबंध दिवसाच्या सतत उद्योगामुळें अंतःकरणांत दडून बसलेल्या दिवाभीतासारख्या विचारांना थैमान घालायला रात्रीसारखी सुंदर वेळ कोणती असणार? त्यांनींच अचलेच्या मनावर झालेली ती प्रतिक्रिया! तिचें स्वरूप किती विचित्र होतें! चांदण्यांतील डोहाळजेवण! विचारांना उन्माद आणायला तें पुरेसें होतें. त्या उन्मादानेंच धर्मग्रंथांनीं तिच्या अंतःकरणांत तेवत ठेवलेल्या शांत ज्योतीला काजळी आणली. 'अचले, तुझ्या डोळ्यांदेखत सारी सजीव, निर्जीव सृष्टीसुद्धां आत्मस्वरूपाचा आविष्कार करते आहे! आणि तूं जागच्याजागीं खुरटलेल्या वेलीसारखी जगशील,

आणि एक दिवस मरून जाशील. तुझं असं कांहीं सुद्धां मागें शिल्लक राहणार नाहीं...' गडद अंधकारांत एकाकी असहायपणें गाळलेले तिचे ते अश्रू कोण पहाणार ? कोण पुसणार ? तिच्या जवळच स्वस्थपणें झोंपीं गेलेल्या शामच्या अंगावर हात टाकून ती स्फुंदून रडूं लागली. " बाळ, माझं प्रतीक म्हणून खुरटलेल्या कण्हेरीचं फूल तूंच दाखविलं होतंस नाहीं ? " कितीवेळां ती या कुशीची त्या कुशीवर वळली असेल. घनदाट अंधकारांत ताठरलेल्या दृष्टीनें ती किती वेळ पहात होती ! कांहीं नाहीं. सारा अंधार ! मात्र डोळे मिटले तरी त्या अंधारांत तांबड्या रंगाचे कण इतस्ततः तिच्या डोळ्यांपुढें फिरूं लागत, आणि त्या अंधाराची भयानकता वाढवीत. आयुष्यांत डोळे उघडले तरी अंधार; मिटले तरी अंधार ! तिला कसली तरी हुरहूर, भीती वाटूं लागली ! ' आयुष्य झरझर सरत आहे. अचल, आयुष्याचा क्षण न् क्षण महत्वाचा आहे. एकेक क्षण तुझ्यांतील जीवन शोषतो आहे. आणखी फार तर दहा वर्षें ! कीं तुझ्यांतील जीवन गेलें ! मग काय उपयोग तुझा ? ' तें जीवन निकामी सरण्याची तिला भीति वाटत होती. बाबा, माणिक, भाऊसाहेब, सिंधू तिला सगळ्यांचा हेवा वाटला. ' सगळ्यांना सुखी होण्याचा हक्क आहे. सगळीं सुखी आहेत. आणि मी ? मी कां तळमळत राह्यचं ? पण मग काय करूं ? विनायकरावांशीं नसतं लग्न झालं आणि... ' तिनें मनाचा घोडा भरधांव फेंकण्यास सुरुवात केली. 'तर—तर—मी किती सुखी झालें असतें. आणि अजूनही—' तो भरधांव घोडा तिला आंवरेना. ती दौडत पुढें चालली. वाटेंत

कांटेकुटे नाहींत, धोंडे दगड नाहींत, डोंगर दऱ्या नाहींत—कशाचें विघ्न आलें नाहीं! चौखुरीं घोडा उधळला होता!...

किती रम्य स्वप्न तें! एक वृक्ष आंतूनच कुजत चालला. कुजला, कुजला, पडला, मेला! त्याला क्षणभरच लपेटलेली वेल तशीच सरपटत पुढें गेली. दुसऱ्या वृक्षावर चढली. आनंदानें मोहरून गेली. फुलांफळांनीं बहरून आली...पण......

*　　　*　　　*

## १६

दुसऱ्या दिवशीं भांड्यांचा रगाडा पडला होता. धुणें केवढें थोरलें पडलें होतें. राजाईची वाट पाहून पाहून सगळ्या थकल्या. शेवटीं तिच्यावर तोंडसुख घेत, दोघी बहिणींनीं तीं कामें स्वतःच उरकलीं. धनी आणि चाकर म्हणायचें खरें, पण चाकर हाच खरा धनी असतो. धन्याचें सुख त्याच्या आधीन असतें. वहिनींचें डोहाळ-जेवण होतें; पण राजाईला त्याहीपेक्षां महत्वाचें काम होतें. ती तीनचार दिवस न सांगतां संवरतां गेली. आणि सकाळ, संध्याकाळ, रक्तसंबंधाच्या नातेवाईकांबद्दल कोणी जपमाळ घेणार नाहीं इतकी त्या राजाईची जपमाळ सगळ्यांनीं घेतली होती.

शेवटीं एकदांची राजाई गुप्त गंगेसारखी अचानक आली. अचल, माणिक व सिंधू यांनीं तिच्यावर मनसोक्त ताशेरा झोडला. राजाईनें असे कितीकांचे राग पाहिले होते. ती अतिशय लाघवी होती.

“ताईसाब, आज सा वर्षांपासून इथं काम करते. कधीं एक

दीस बी खाडा केला नाय्. आतां बी भईनीला सांगूनशानी गेलें पन् ती न्हाय आली, त्येला मी काय करनार ? बोला. ”

“ हें बघ. तुझी बहीण बिहीण कांहीं नको. जायचं झालं, कीं आधीं सांगत जा आम्हांला. आम्हीं करूं काय सोय करायची ती. हा काय मेला त्रास ! ” माणिक रागानें म्हणाली.

“ तसं नव्हं ताईसाब. आतां मला वाटलं, मी म्हाघारी फिरन् म्हून. दोन दिसासाठीं पाट लावाया ग्येले व्हते. ”

सगळ्यांचा राग बाजूलाच राहिला.

“ पाट ? कुणाचा पाट लावलास ? ”

“ म्हाजाच नव्हं का. ”

सगळ्या हंसूं लागल्या.

“ तुझा पहिला नवरा ? ”

“ त्यो तर हाय हो. अन् म्येलां म्हून मला काय करायचंय् ?

“ का ग ? ” राजाईला मालकिणींची मर्जी संभाळायची संधि सांपडली.

“ ह्यो बघा, माझा नोरा त्या हडळीच्या मागं लागला. घराकड बी बघना, माझ्याकड बी बघना. प्वार तान्हं. त्याकड बी बघना. त्या हडळीनं जसं अगदीं भान् हरपलं बघा त्याचं. मी ग्वाड बोलून-शानी सांगितलं, रुसल्यें, फुगल्यें, रागावूनशानी बी पाहिलं. प्वाराकड बघ म्हून पोर बी आपटलं त्याच्या पुढ्यां. पन नाहीं बाय्. दोन वर्सं त्या बयानं नुसता भारून टाकलाय् अक्षी. ”

"आणि तुझ्या त्या नवऱ्याला कळलं का, तूं पाट लावलास हें?"

"मरं ना तिकड. मला काय त्याचं? त्या भार्गव वकिलाकड भांडीं घासाया जात्यें. त्याला सांगितलं, तंवा तो म्हंगाला. "नोटिस का काय त्ये येवा." मी म्हंगालें, "मला काय त्यें कळत नाय्." तंवा त्यानंच लिवलं. भला मानुस हाय अं! 'मी राजाई, आज पोटा-पान्याविना दोन वरीस राह्यले हाय. तूं माझ्या पोटापान्याची सोय लावली न्हाय तर मी पाट लावनार' असं दिलं त्या मोठ्या पत्रातनं."

"चांगलं केलंस बाई!" माणिक हंसत म्हणाली.

"मग यांत गैरवाजवी काय हो? जो मानूस दोन वरीस बाय-कोकड पहात बी नाय; त्या अवदसेलाच लुगडं घेईल, चोळी नेसवील, पुतल्याची माल करील, त्येची बायको म्हून मी कां व्हावं सांगा!" राजाई अंतःकरणांतील तळमळीला वाट देत म्हणाली.

"दुसरा नवरा आवडला ना तुला?"

"नव घरधनी अक्षी लई चांगलं हां! त्यांची आवा त्यांना सोडूनशानी गेली. मग पुरुसमानसानं तसं कसं ऱ्हावं? अन् बघा आवा सोडूनशान् गेली ना? ती पन् लई नाचण मोगरी व्हती अं! पन् घरधनी अक्षी धुतल्या तांदळावानी ऱ्हात न्हाई. नाहीं तर बायका असूनशानी बी चावट असत्याती ना? पन तसं नव्हत हं माझं घरधनी. ही राजाई जशी धुतल्या कनीवानी, तसंच अक्षी घरधनी हां!"

"आणि त्या पोराचं काय व्हायचं ग?

" अव त्यो मेला कशाला नेतो माझं प्वार. अन् ताईसाब, राजाई जंवर जिवत हाय्, त्योवर प्वाराचं पोट कसबी भागवील. ह्यो बी नवरा नको न् त्यो बी नको. अव कष्ट करनाराला काय कमती व्हं ? "

राजाई चार दिवस न आल्याचा राग या नव्या विषयानें कोठल्या कोठें विरून गेला. घरांत त्याचीच चर्चा सुरू झाली.

" कांहीं मेलीला लाज आहे का ? " माणिक म्हणाली.

" लाज काय बुवा असायची त्यांत ? " भाऊसाहेबांना नेहमीं अशा तऱ्हेच्या नोटिसा देण्याचा प्रसंग येई. त्यांना त्याचें कांहींच वाटलें नाहीं.

" कांहीं नाहीं ना यांत लाज वाटण्यासारखं ? एक नवरा जिवंत आहे नि खुशाल दुसऱ्याशीं लग्न करून मोकळी. "

" त्यांना कसला आला आहे धरबंध नि ताळतंत्र ! " वहिनी मध्येंच म्हणाली.

" ताळतंत्र कुणाला आहे सांगा पाहूं ? " बाबा म्हणाला.

" इश्श म्हणजे काय ? असंच का सगळीकडे चाललं आहे ? "

" तसं नव्हे. जी ताळतंत्र आणि नीति म्हणतों आपण ती कितपत खरी नीति असते कोण जाणे ! " बाबा म्हणाला. भाऊसाहेबही लगेच म्हणाले, " मला तर वाटतं, राजाईचा हिशेब सरळ आहे. दोन न् दोन चार. कांहीं लोक मात्र दोन न् किती चार हा प्रश्न अडमुठ्या-सारखे विचारीत राहतात, न् कांहीं दोन न् एक चार म्हणून ठांसून

सांगतात. नवरा वाईट आहे, लक्ष देत नाहीं, दुसरी बायको करून आहे, नोटिस द्यायची, उत्तर आलें नाहीं, दुसरं लग्न करून टाकायचं तूं मोकळा. मी मोकळी. सरळ आहे राजाईचं सगळं ''

'' इश्श, पुरे झालं. तुमचं आपलं कांहीं तरीच. '' माणिक कांहींशा रागानें म्हणाली. अचला नुसतीच ऐकत होती.

सगळें सहजासहजीं झालें. वाऱ्याची झुळुक सहजच येते. ती दगडाला स्पर्श करते. तो निर्विकार, निस्तब्ध राहतो. वेली, वृक्ष आपल्या सहस्र जिव्हांनीं सळसळ आवाज करून तिच्या स्वागतासाठीं माना डोलवतात. आणि वीणा ? सर्व तारा पिळवटून आघातासाठीं उत्सुक असलेली वीणा, वाऱ्याची झुळुक लागतांच गोड संगीत उठवून देते. त्या संगीतांत आनंदाची मधुर लकेर असेल नाहीं तर शोकाचे आर्त स्वर असतील.

## १७

राजाईनें अचलेच्या मनाचा गोंधळ उडवून दिला. राजाईचें काय चुकलें ? कांहीं नाहीं. तिलाही त्यांत कांहीं चूक वाटेना. राजाई बोलत होती. अचला लक्ष देऊन ऐकत होती. ती दृष्टीनें राजाईच्या अंतरंगाचा शोध घेत होती. तिला तें निकोप आढळलें. त्यांत रुखरुख नाहीं, तळमळ नाहीं, दाबून दडपून कुजवलेल्या विचारांची दुर्गंधि नाहीं. तिला त्यांत चैतन्य आढळलें. राजाईचा मार्ग खरा आणि धोपट आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत कष्ट करणारी राजाई स्वावलंबी होती. तिनें पोटाकरितां कोणापुढें तोंड वेंगाडलें नव्हतें.

तिच्या समाजाची नीति धोपट होती. ‘जशास तसें’ हा तेथें न्याय होता. त्यांत कृत्रिम संकेतांचे बागुलबुवा जागोजागीं उभे करून माणसाला भीतीनें निश्चेतन करून टाकण्याचा अमानुषपणा नव्हता. ती स्वतः भोंवतीं पाहूं लागली. सारें जग मोकळें असून, मणा-मणाच्या शृंखला घातलेल्या कैद्याप्रमाणें ती जागच्या जागीं उभी राहून सभोंवतीं पाहूं लागली. घोर निराशा! नाहीं ही बेडी तुटणार!

पण कां ही निराशा? दैहिक सुखासाठीं? माझ्या भोंवतीं स्वार्थ-त्याग करून दैहिक सुखाची आपल्या हातानें होळी करून हिंडणारीं माणसें आहेत. तीं राजाईपेक्षां शतपटीनें श्रेष्ठ आहेत. इंदिराताई नाहींत का अवघ्या तीस वर्षांच्या? वैधव्य आणि नातेवाईकांनीं केलेला धनापहार, ही काय त्यांच्यावर थोडी आपत्ति आहे? तरी त्यांच्यांत धडाडी आहे. त्यांचें सारें जीवन समाजासाठीं. सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत समाजकार्य! त्यासाठीं त्या स्वतःचा जणुं यज्ञ करीत होत्या. अचलेला त्यांच्याबद्दल आदर वाटूं लागला. स्वतःला उद्योगांत बुडवून टाका कीं मानवी क्षुद्र भावनांना डोकें उचलायला सवड मिळत नाहीं. तिची खात्री पटली. आपल्या समाजाच्या उन्नतीसाठीं त्या सेविकेची तळमळ पाहून तिला वाटे, ही खरी स्वार्थ–निवृत्ति. हा खरा त्याग. मी कां नाहीं असा त्याग करूं शकणार? त्या सेविकेचें सारें मन समाजहितानें भरून गेलें आहे. मला का नाहीं माझें मन भारून टाकतां येणार? स्वतःच्या देहाचा विसर तिला पाडतां येतो. ती नाहीं का मनुष्य? तिला नाहींत का भावना आणि उपाधि? ती जर त्या सर्वांना दडपून त्यांच्यावर विजयानें नाचूं शकते, तर मी कां नाहीं

तसें करूं शकणार ? ती जणुं इंदिराताईची भक्त बनली. त्यांचें निःस्वार्थी जीवन अचला निरखूं लागली.

तिला निराळेंच दृश्य दिसलें. ज्या भावनेनें समाजाच्या हितासाठीं ती समाजसेविका झिजत होती, त्यांत ती स्वतःच्या एकलेपणाची तेवती ज्योत विझवून टाकीत होती. निस्वार्थीपणानें ती जें जें करीत होती, त्यामागें तिला कोणाच्या तरी मायेची भूक लागलेली स्पष्ट दिसत होती. अचलेनें तिच्या समाजकार्याचा थर बाजूला सारून पाहिला. आंत अंधार ! गडद अंधार होता ! शून्यता ! भयंकर शून्यतेविरुद्ध चाललेला तो झगडा होता ! त्या अंधारांत, त्या शून्यतेंत कांहीं तरी भरायचें म्हणून तें समाजकार्य चाललें होतें. स्वतःचें कुणी नाहीं. म्हणून आपल्या प्रेमाची उधळमाप तिनें समाजावर चालविलेली होती ! त्याचा "समाजाची कळकळ" असा अर्थ लोक करीत होते ! समाजसंकेतानीं लादलेल्या एकटेपणाखालीं स्वतः तळमळत असतां तिची ती तळमळ निराळ्या रूपानें बाहेर पडत होती. तिच्या मतामागें, तिच्या घोषणेमागें, स्वतःचीं सुख-दुःखें दबा धरून बसलेलीं अचलेला दिसलीं ! एकूण निस्वार्थांतही स्वार्थ आहेच तर !

पण स्वतःचीं सुखदुःखें लक्षांत घेऊन, समाजांतील तसल्याच दुःखांचें निवारण करण्यासाठीं धडपडत असलेल्या इंदिराबाईचें अचलेला कौतुक वाटलें. तिनेंही उद्योगाच्या कोंडवाड्यांत पुन्हां आपलें बागडणारें मन कोंडलें.

## १८

सुटी संपली. अचला पुन्हां नागपुरास गेली. तिनें शाळेच्या

कामाला पुन्हां सुरुवात केली. तिनें कसें वागायचें हें मनाशीं निश्चित ठरविलें. काम, खूप काम केलें पाहिजे. तिनें स्वतःचें सर्व काम स्वतःच करायचें ठरविलें. सकाळपासून संध्याकाळपर्यंत स्वतःचा विसर पडला पाहिजे. तिचा निश्चय झाला. शाळेंत मनही यंत्रासारखें काम करतें; करावेंच लागतें. शाळेबाहेरही तिनें स्वतःचें मन यंत्रासारखें करण्याचा प्रयत्न केला. तिला यश आलें. एक–दोन–तीन–तीस दिवस गेले. ती स्वतःशींच म्हणाली, " मनाचे लाड करतां उपयोगी नाहीं. केले कीं तें बहकलेंच." आणखी पंधरा दिवस गेले.

अचला मनाशींच हंसली " काय दडपण पडल्यासारखं वाटे नेहमीं ! उगीचच हुरहुर लागे. उगीचच हृदयाला पीळ पडल्यासारखं होई. आतां माझं मन मोकळं आहे, सुदृढ आहे. त्यानें या ऐहिक गोष्टींची किंमत पारखलेली आहे. आहे काय त्या संसारांत ? वासनांचे चोजले ! ते किती पुरवले तरी पुरे व्हावयाचे नाहींत." तिनें मोकळेपणानें श्वास टाकला. तिला हलकेंसें वाटूं लागलें.

आणखी पंधरा दिवस गेले. ती नैमित्तिकें करीत होती त्याच त्या मुली. तीच ती अपुरी शिकवण. त्याच त्यां चरकांतून पिळून काढलेल्या निस्तेज सहाध्यापिका. " मी काय करतें आहें ? माझ्या आयुष्याचं ध्येय काय ? जें करतें त्यांत अर्थ नाहीं; मग निरर्थक कांहीं तरी करीत राहणं, हेंच जीवनाचं अंतिम साध्य कीं काय ? " ती सभोंवार पहात होती. 'अंतःकरणें करपत असलेल्या प्रौढ कुमारिका, विधवा ! असलें करपलेलें आयुष्य कां ? त्यांना जीवन

कोठें मिळेल तें कळतं, पण कळवून घेण्याचं धाडस नाहीं. अशा जगण्याचा स्वतःलाही उपयोग नाहीं, दुसऱ्यालाही नाहीं. त्यापेक्षां काय हवं तें ओळखून, तें मिळविण्याचा प्रयत्न कां नाहीं करायचा ?' मन हळूच बोलूं लागलें.

त्याच दिवशीं संध्याकाळीं अचला राधिकेच्या घरीं निघाली होती. गेल्या दीड महिन्यांत त्या घराचें दर्शनही तिनें घेतलें नाहीं. तिला माहित होतें. शत्रूचा वाराही तिला नको होता. हा मनानें मानलेला शत्रू कोण ? सिंधूवहिनीच्या डोहाळजेवणापासून या शत्रूची तिला दहशत बसली होती.

ती घराकडे चालली होती. तिचें मन तिला मागें खेंचीत होतें. "नको जाऊं. फिर मागें." पाय तिला पुढें नेत होते. ती घराजवळ आली. शत्रू आंतच होता. ती घरांत न शिरतां पुढें गेली. विजय मिळाला, पण डोक्यांत काहूर उठलें. "दोन न् दोन् चार असतां तीन कां म्हणायचं ? दोन न् किती चार या प्रश्नावर कां चांचपडत राह्यचं ?"………

राजाईनें अचलेच्या बुद्धीला नुसतें हादरून सोडलें. राजाईनें आपल्या बुद्धीनें झटपट सुखाचा मार्ग शोधला. आणि मी ? नुसता विचार ! नुसता विचार करून असमाधानाच्या भोंवऱ्यांत सांपडून आहें. पण राजाईचा समाज ? तिचा दर्जा ? त्याचें माप मी मला कसें लावून चालेल ? माझ्या मनावर इतका वासनांचा जबरदस्त पगडा बसला आहे का ? कीं माझें सुख मी राजाईच्या दर्जाला जाऊन शोधून

पहावें ? अचलेला आपल्या मनाची दुर्बलता तिरस्करणीय वाटली. पण वहातें पाणी मोठमोठाले खडकही फोडून मार्ग काढतें. लहान कुंडींत जरी नारळाचें झाड लावलें तरी तें कुंडी मोठी होण्याची वाट पाहात नाहीं. आपल्या मुळ्यांनीं कुंडी फोडून आपल्या वाढीला तें अवसर देतें. तसेंच जिवंत आणि जोमदार मन कितीही अडवलें तरी आपला मार्ग काढीत असतें. राजाईचा आधार त्यानें सोडला आणि तें तिच्या स्वतःच्या समाजाकडे वळलें.

पोथी, पुराणें आणि देवधर्म यांनीं वासनांवर जय मिळवूं पहाणाऱ्या बालविधवा योगिनींप्रमाणें राहातांना तिनें पाहिल्या, तेव्हां तिला स्वतःची लाज वाटली. 'काय माझी ही तडफड, तळमळ ! आणि ही सगळी कशाकरितां ? वहात्या प्रवाहाबरोबर नाव वल्हविणें सोपें आहे. त्याच्या उलट जाणाराच खरा कर्तबगार. त्याला खरें धैर्य, खरें कौशल्य पाहिजे. ती कौतुकानें, आदरानें त्या योगिनींकडे पाहूं लागली. तिची श्रद्धा विचलित होऊं लागली. त्यांच्यांतील जीवन सुकून गेलेलें तिला दिसलें. केवळ जड माती उरलेली. साऱ्या इच्छा असून अर्धांगवायूनें पछाडलेला मनुष्य भुकेल्या नजरेनें सर्वांकडे पहातो, तशीच त्यांची अवस्था. चालायला हवें पण पाय उचलत नाहीं, बोलायला हवें पण जीभ लुली पडलेली, वस्तु घ्यावीशी वाटते, पण हातांत त्राण नाहीं. समाजाच्या भीतीनें व्याकूळ होऊन दबलेलें, गुदमरलेलें जिणें कंठणाऱ्या त्या तपस्विनींनीं मनावर जय मिळविला असें तिला वाटेना. तें जिवंतपणाचें जगणें नव्हतें. फुगून आलेल्या तलावाबाहेर फटींफटींतून पाणी बाहेर जाऊं नये, म्हणून वेळोवेळीं बांध घालतात तशी

त्यांची अवस्था होती. मन सदैव भुकेलेलें, सदैव असमाधानी. त्याच्या समाधानासाठीं तात्पुरते बंध घालण्यांतच त्यांची सर्व शक्ति खर्च होत होती. डोळे असून पहायचें नाहीं, जीभ असून रुचि घ्यायची नाहीं, मनुष्यत्व असून जडासारखें रहावयाचें. यांच्यापासून कोणता आणि कोणाला फायदा होणार ? त्यांना स्वतःला तरी ? छेः तसा फायदा, तशी वाढ व्हायला मन निराळें पाहिजे. मी नाहीं मारणार माझें मन. अति जीवनानें रोप कुजून जातें. अति उन्हानें वाळून जातें. नेहमीं सांवलींत राहून खुरटून जातें. कोणतेंही अवास्तव नको; पण मर्यादित तर हवें ? रोपाची पुरी वाढ व्हायला उन, सांवली, जीवन, सारें कांहीं प्रमाणांत पाहिजे. कमी नको. अधिक नको. पण मग माझ्या मनुष्यत्वाच्या वाढीला काय ? सारेंच उन ? नेहमींचाच रखरखाट ? तो कां ?

## १९

" सवड असल्यास संध्याकाळीं येऊन जा. " म्हणून अचलेनें मोलकरणीच्या हातीं विरागला चिठ्ठी पाठविली. त्याप्रमाणें संध्याकाळीं विराग आला. आज चार महिन्यांनीं तीं दोघें पुन्हां भेटलीं होतीं. त्या चार महिन्यांत अचला त्याला टाळण्याचा प्रयत्न करीत होती, हें विरागच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. त्यानें त्या गोष्टीचें कारणही शोधण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. शेवटीं " हें बंधन तुटलें. संपलें. त्यावर आतां विचार करावयाचा नाहीं. " असेंही त्यानें ठरविलें. अचला त्याला टाळते, ही गोष्ट त्याच्या लक्षांत येतांच, तोच तिच्यापासून दूर राहूं लागला. त्यानें तिला कोणत्याही रीतीनें कधींच

स्पष्टीकरण विचारलें नाहीं. तरीपण तिच्या चिठ्ठीसरसा तो आल्याशिवाय राहिला नाहीं. तो आला तरीही अगदीं परकेपणानें; केवळ तिच्यांतील आंदोलनें पहाण्यासाठीं.

हवापाण्याच्या गोष्टीच किती वेळ चालल्या होत्या. अत्यंत निकटपणाची भावना दडपून टाकण्यासाठीं तर हा खेळ नसेल ? अचला औपचारिकपणें बोलत होती; त्याही पेक्षां अधिक औपचारिकपणें विराग बोलत होता. पण किती धुकें उठलें तरी सूर्याची दृष्टादृष्ट होतांच तें विरूं लागतें. अचला न कळतां मोकळेपणानें बोलूं लागली. सुटींत घडलेल्या छोट्या मोठ्या गोष्टी तिनें त्याला सांगितल्या. शाम, कुंदा, बाबा, माणिक सगळ्यांबद्दल ती कितीतरी बोलली. पण तिच्या मनावरचें दडपण आपण होऊन दूर फेंकल्याशिवाय तिला राहवेना. शेवटीं तीच म्हणाली.

" मी अगदीं तुम्हांला भेटायचं नाहीं असं ठरवलं होतं. "

" मग मी नाहीं ना तुमच्या निश्चयाच्या आड आलों ? "

" तुम्हीं ना ? तुम्हांला आठवण तरी झाली असेल कीं नाहीं कोण जाणे ! "

" जसं तुम्हांला सोईचें वाटेल तसें समजा. "

" विराग, तुम्ही लबाड आहांत. "

" हा तुमचा नेहमींचाच आरोप आहे. "

" आणि तुमचाही माझ्यावर तोच आहे. "

" तो खरा असेल किंवा कदाचित् आपण दोघेंही लबाड असूं नाहीं ? " दोघेंही हंसलीं.

" बाकी तसं असावंच लागतं. " अचला म्हणाली.

" हो. कधीं स्वतःच्या व कधीं जगाच्या भीतीनें. "

" खरंच आहे. पण विराग, मला आश्चर्य वाटतं, कीं कांहीं साध्या गोष्टींबद्दल आपलं मन इतका बाऊ करतं आणि त्याच गोष्टींचा दुसरीं माणसं कसा झटपट निकाल लावून मोकळीं होतात. "

" त्याचं कारण आहे. प्रवाहांत जागच्या जागीं पडून राहिलेल्या दगडाभोंवतीं जसं शेवाळं जमतं, तसं अपंग मनाच्या भोंवतींही भीतीचं बसलेलं असतं. "

" हो. आणि कित्येक वेळां मन पांखराप्रमाणें भरारी घेत असलं, तरी साध्या समाजसंकेतांच्या बुजगावण्याला भिऊन, पिकल्या विचारांचीं कणसंही डावलून पळतं. असंच ना तुम्हांला म्हणायचं आहे ? "

" होय. "

" खरंच, मला यावरून आठवण झाली आमच्या राजाईची. तिनें पहा एक नवरा जिवंत असतांना पाट लावला. आणि आम्हीं तिला विचारलं, तर इतकं सहजासहजीं तिनं सगळं सांगितलं ! मला मोठी गंमत वाटली. मनाची टोंचणी नाहीं, समाजाचें भय नाहीं. बाकी त्यांना भय वाटायला, त्यांच्या समाजांत नीति आहे कुठें म्हणा."

" असं मात्र म्हणतां नाहीं यायचं. नवरा बायको एकत्र नांदत असतांना, कोणी त्यांच्या बायकांना हात लावा पाहूं? वाघासारखे धांवून येतील. केवळ याच बाबतींत त्यांचं असं नाहीं; साऱ्याच बाबतींत असं आहे. एकादी गोष्ट अन्यायाची आहे, असें त्यांना पटायला मात्र पाहिजे कीं मग तेथें आंत बाहेर नाहीं. सारी दाबादडपी, औदासीन्य, आंत बाहेर, मित्रेपणा काय तो मात्र आपल्या वर्गांत. "

" कांहीं नाहीं. त्यांच्यांत जे गोंधळ चालतात तें पाहूं नये हेंच बरें. "

" गोंधळ? म्हणजे काय? ते उघडपणें गोष्टी करतात म्हणून त्यांना गोंधळ म्हणावयाचें? आणि तुम्ही लोक चोरून करतां ती मात्र नीति. "

" म्हणजे? सगळा मध्यमवर्ग सरसहा अनीतिमान् आहे असं म्हणावयाचं आहे कीं काय तुम्हांला? "

" छे. मी कोणालाच तसं म्हणत नाहीं. प्रत्येक वर्गाची नीतीची व्याख्या निराळी आहे. त्यांत तुलना होऊंच शकत नाहीं, एवढंच मला म्हणावयाचं आहे. पण हें मात्र कांहीं खोटं नाहीं, कीं श्रीमंत, मध्यमवर्ग व कामकरी या प्रत्येकांचीं नीतितत्त्वें निराळीं असलीं तरी सगळ्यांत स्वतःची मुस्कटदाबी करून राहण्यांत आनंद मानणारा जर सध्यां कोणता वर्ग असेल तर तो मात्र मध्यम वर्ग. त्यांच्यांत श्रीमंतीचा बेरडपणा नाहीं, आणि गरीबांचा बेडरपणाही नाहीं. "

" सुवर्णमध्य साधणारा आहे तो. "

" होय. आणि कित्येक वेळां तो जितका चांगला, तितका घातक आहे. श्रीमंत म्हणून गणल्या जाणाऱ्या लोकांचीं नीतितत्वें निराळींच असतात. पैशांची कमाई, मग ती कोणत्याही वाकड्या तिकड्या मार्गानें करण्यांत त्यांना कांहीं वाटत नाहीं. आणि इतर कोणतीहि जी आपण अनीति समजतों, ती त्यांच्या सोन्याच्या धूरानें उजळलेली असते. त्यांना पैशांकरितां कोणाचे सरळ गळे कापतांना शहारे यायचे नाहींत. दोन बायका घरीं राजरोस आणण्याचाही विधिनिषेध नाहीं. त्यांना माहीत असतं, कीं पैशांच्या प्रकाशानें या अंधारालाही उजळा येतो. '

" मध्यमवर्ग आपला बरा. सरळमार्गी, पापभीरू. "

" तसं कांहीं नाहीं. ' दुसऱ्याला कळणार नाहीं तें पाप नाहीं. ' अशी त्यांची समजूत असते. मनुष्यानें जीविताबद्दल जे संकेत अगर जीं बंधनें ठरवलीं आहेत, त्यांची दरकार अधिक बाळगणारा वर्ग कोणचा असेल तर तो आपला. "

" तुम्हांला या वर्गाची चीड दिसते ! "

" तसं नव्हे. त्या वर्गाची स्थितिस्थापकता किंवा सुवर्णमध्य राखण्याचें धोरण हें इष्ट आहे का ? कित्येक वेळां संकेताच्या अति-रेकामुळें ह्या समाजांतील गुप्त सुप्त शक्ति निकामी बनतात. याबद्दल मला वाईट वाटतं. "

" खरं विचाराल, तर हे संकेत आणि ही नीति काय आहे, याचा मला अर्थच कळत नाहीं. "

" त्यांना निश्चित अर्थ आहे थोडाच! नदीचें पात्र जसें हळू हळू बदलत असतें, तसेच हे संकेतही हळूहळू बदलत असतात; आणि ते बदलत असतांना पुष्कळ लोकांची मजा अशी असते, कीं स्वतः घसरत असतांही दुसऱ्या सर्वांची वागणूक जुन्या संकेतांना अनुरूप असली पाहिजे असा त्यांचा अट्टाहास असतो. खरं म्हणजे मला असं वाटतं कीं अनंत आकाशांत पसरलेल्या ग्रहमंडलांत, प्रत्येक ग्रह आपल्यापरी स्वतंत्र असला, तरी सर्व ग्रहांत एक प्रकारचा विशिष्ट संबंध असतोच. प्रत्येक मनुष्याचेंही एक नैतिक जग म्हणून असतें. त्यांत तो वावरत असतो. तरीही त्या नैतिक जगाची अखिल मानवजातीशीं–समाजाच्या नैतिक जगाशीं सांगड बसलेली असते. "

" पण हें नैतिक जग म्हणजे तरी काय? मला तर त्यांत किती तरी तऱ्हा दिसतात. समाजानें नीतीच्या सामान्यतः ठरवलेल्या कल्पना, या आदर्श म्हणून प्रत्येक व्यक्ति आपल्या जगांत ठेवीत असतेच. तरी नित्य म्हणून समजल्या जाणाऱ्या राष्ट्र, धर्मसंस्था, कुटुंब, इत्यादि सामाजिक संस्थाही त्याच्यावर परिणाम करीत असतात. शिवाय अजाणतां आदर्श कल्पनांचें अर्धवट अनुकरण मनुष्य करीत असतो. "

" या आदर्श कल्पना, या समाजसंस्था, आणि ही अर्धवट वागणूक यांनींच माणसाची भ्रमल्यासारखी अवस्था होते. "

" सामान्य माणूस तसा भ्रमून जात असेल. पण नैतिक उन्नति या तिहींचा मेळ घालण्यानेंच होते. त्यांत कल्पनांचा शिळेपणा टाकावा लागतो. आदर्श कल्पनांचा खरा अर्थ पडताळावा लागतो.

समाजसंस्थांवर चढलेली धूळ झटकावी लागते; वेळीं त्यांना नवें वळणही द्यावें लागतें."

"म्हणजे? मग समाजसंस्था या त्याच स्वरूपांत कायम टिकणार नाहींत."

"अर्थातच. मनुष्याच्या आचरणाशीं ज्या संस्थांचा मेळ बसूं शकत नाहीं, त्यांबद्दल साहजिक असमाधान निर्माण होतें व अशा संस्था नाहींशा कराव्याच लागतात."

"पण विराग, मला नेहमीं प्रश्न पडतो, कीं प्रत्येक पिढी असल्या गोष्टींवर चडफडत असते, नव्या कल्पना प्रसृत करते, असं असतांना समाधान–सर्वस्वीं समाधान लाभेल, अशी समाजरचना तरी कोणती आणि केव्हां यायची?"

"वर्तुळाच्या परिघाचा आदि आणि अन्त सांगतां येणार नाहीं, तसाच या असमाधानाचा प्रकार आहे. तें कधींच संपायचें नाहीं. कुणीसं म्हटलं आहे ना–तांब्यांनींच मला वाटतं. 'मरणांत खरोखर जग जगतें." मी म्हणतों, "या असमाधानांतच जग जगतें."

"पण मग शेवट कुठें?"

"अरे बापरे, मी कांहीं बुवा जाडा फिलॉसफर नाहीं, या प्रश्नाचं उत्तर द्यायला. जाऊं दे. फारच बोललों हो इतका वेळ. पण अचलाबाई, एवढं मात्र खरं हं, कीं गोफ असतो ना तो? विणायचा नि उलगडायचा. तसंच माणूस हा प्राणी करतो आहे, असं मला वाटतं."

" म्हणजे काय ? "

" म्हणजे पहा. माणूस अनिर्बंध होता, तेव्हां त्याचे ठिकाणीं असमाधान उत्पन्न होऊन समाधानासाठीं त्यानें बंधनें निर्माण केलीं. त्यानें बंधनांचा गोफ गुंफला तो गुंफून झाला तरीही समाधान मिळेना, म्हणून उलगडायला सुरवात केली. किती छान उपमा दिली नाहीं ? " विराग चेष्टेनें म्हणाला.

" कांहीं नाहीं हं. फारशी कौतुक करण्याजोगी नाहीं. "

" पण मी म्हणतों, हें तर खरं कीं नाहीं ? कीं समाजसुधारणा म्हणजे एक गोफ विणण्याचा आणि उलगडण्याचा खेळ आहे. "

" काय जणं बाई. "

" जाऊं दे. तुम्हांला कंटाळा आला आहे. किंवा माझं म्हणणं पटत तरी नाहीं. "

" असं नाहीं हो, मी विचार करीत होतें, कीं अत्यंत असमाधानी माणसानें काय करावं अशा वेळीं ? "

" वाः तुम्हांला सांगूं ? असमाधानी सगळींच असतात. पण कित्येकांना संवयीनेंच असमाधान फारसें बोचत नाहीं. आणि कित्येकांच्या म्हणजे फारच थोड्यांच्या मनांत त्याचें सारखें शल्य असतें आणि तेच सुधारक होतात. तेच बंधनांची विफलता दाखवितात; किंवा नव्या बंधनांची आवश्यकता दाखवतात. तुम्हाला व्हायचं आहे कीं काय समाजसुधारक ? "

विराग सहजच बोलला. पण त्यानें अगदीं अंतरंगांत दडवलेल्या तिच्या विचारांना हात घातल्यानें अचला दचकली.

" झालं ! मी कसली हो ! अशीच सामान्य माणसासारखी संवयीनें असमाधानांत कुजायची आणि एक दिवस जगाला रामराम म्हणायची. "

विरागला तिच्या बोलण्याचा झोंक कळला. आतांपर्यंत चाललेलें बोलणें, ती स्वतःच्या परिस्थितीशीं ताडून पहात होती, हें त्याला कळून चुकलें. एकीकडे ती हातांतील कागदाच्या कपट्याचे तुकडे करीत असतां अंतर्मुख होऊन पहात होती. तो तिचें अंतःकरण शोधीत होता.

" अचलाबाई, तुम्हांला तें कार्लाइल्चें वाक्य माहीत आहे ना ? "

" काय ? "

Man's unhappiness comes of his greatness. It is because there is an infinite in him which with all his cunning he cannot quite bury under the finite.

( मनुष्याच्या मोठेपणामुळें त्याला असमाधान वाटूं लागतें. त्याच्या ठिकाणीं असलेलें अनंतत्व कोणत्याही सबबीवर सान्तांत विश्रांति पावूं शकत नाहीं. )

" विराग, जगांतील कोणतींही नैतिक बंधनें सदैव चांगलीं ठरत नाहींत. कालमानानें, परिस्थितीनें, तीं चांगलीं वाईट ठरत असतात. मग आपल्या स्वतःच्या असमाधानाला मूठमाती देण्याकरितां पाऊल उचलायचं म्हटलं, तरी प्रश्न पडतो कुठें पाऊल ठेवावं हा. "

" असमाधानाला कायमची मूठमाती कधींच मिळणें शक्य नाहीं. हरळीचं कुरण कुरतडून खाल्लं तरी पुनः हरळ उगवायचीच. तसंच

विचारानें असमाधान छेदून टाकलं तरी त्याची नित्य नवी उगवण ही असायचीच. आणि त्यांतूनही पाऊल टाकायचं तर कमी असमाधान लाभेल तें केलं पाहिजे."

"पण तें सुद्धां शोधून काढायला Reasoning power पाहिजे. आणि खरं सांगायचं तर Reason म्हणजे काय हेंच मला कळत नाहीं. कारण सारासार विवेक खरा; पण विवेक करणाराची पात्रता नसली तर त्याचा सारासार विवेक अविवेकच ठरेल नाहीं?"

"होय. तुम्हांला गंमत म्हणून सांगतों. बर्नार्ड शॉनें म्हटलं आहे, 'The man who listens to reason is lost. Reason enslaves all whose minds are not strong enough to master her."

(सारासार विवेक करतांना अपूर्त इच्छांची छाया त्यांवर पडल्या-शिवाय राहणार नाहीं. भावनाविरहित स्वतःची इच्छा, आकांक्षा बाजूला ठेवून मनुष्य सारासार विवेक करूं शकणार नाहीं.)

"पण मग सारासार विवेक जर भावना, इच्छा आणि विकार यांनीं शेवाळ्ला असला तर?"

"विवेकावर जरी विकारांची छाया पडली, तरी सुदृढ मनाचा विवेक हा त्या विकारांना, भावनांना व इच्छांना मार्गदर्शकच होतो.

"पण हा मार्ग तरी कोणता? कुठें जायचा? आयुष्याचं ध्येय काय?"

" तत्वज्ञानी सांगतात, कीं आत्मप्रतीति हें ध्येय आहे म्हणून पूर्णता यायला हवी. "

अचलेला हंसूं आलें.

" कां हो ? "

" नाहीं. सारंच कोडं आहे, म्हणून मला हंसूं आलं. "

## २०

वरून कठीण दिसणाऱ्या जमिनींतील खोल खोल गुप्त जिवंत झरे, पानाड्या केवळ कान जमिनीला लावून ओळखूं शकतो. अचलेच्या कठोर वागणुकींत गुप्त असलेली भावनांची गंगा एकाच व्यक्तीला कळूं शकली.

स्वतःच्या जीविताशीं निगडित झालेल्या प्रत्येक व्यक्तीच्या सहानुभूतीचा बंध तोडून, स्वतःच्या हिंमतीवर जगूं पहाणारी अचला, बुद्धीच्या जोरावर हृदय तुडवून टाकीत होती. त्यांत ती यशस्वी झाल्याचा आसुरी आनंद तिच्या वागणुकींतही ती खेळवीत असली तरी तें चिवट हृदय अभंग होतें. एवढेंच नव्हे, तर त्यांतील रसरसलेल्या भावनांच्या उबेनें, तीक्ष्ण विचार करणारी तिची बुद्धीही अनेक वेळ झोंपेंत गुंग होई. त्यावेळीं डोळे उघडे असूनही अचला स्वप्नांत वावरे. कान उघडे असून तिला कांहीं ऐकूं येत नसे. केवळ एका अतींद्रिय वाणीला ती मोहून जात असे. ती अतींद्रिय वाणी तिला निस्तब्ध करी. " केलंस. सगळं केलंस. सर्वांसाठीं केलंस. तरीही सर्वस्वाचें दान

हें नाहीं. त्या खेरीज जीविताची सार्थकता नाहीं. " अचला दुसऱ्या-साठीं वाटेल ते कष्ट घेत होती. तिचा स्वभावच तो बनला होता. ज्याला जी मदत पाहिजे असेल, ती शक्य तों द्यायला ती तयार असे. पण तें आत्मदानाचें समाधान तिला लाभत नसे. ती कितीही दुर्लक्ष करीत असली तरी अंतरंगांतील तळमळ उष्ण अश्रूंच्या रूपानें बाहेर पडे. ते तिचे अश्रू कोणी पाहिले नव्हते. त्या अश्रूंनीं आपली दुर्बलता जगाला न दाखविण्या इतका अभिमान अचलेमध्यें होता.

तिच्याच सारख्या अनेक स्त्रियांचे अश्रू झरलेले पाहून जग कसें हळहळतें, हें तिनें पाहिलें होतें. तें सुख तिनें जगाला कधींही दिलें नसतें. अशा असहाय स्त्रियांबद्दल लोकांनीं दाखविलेली कळकळ जखमेवर पेरल्या जाणाऱ्या मिठाइतकीच चरचर झोंबत जात असते. अशा स्त्रियांचे अश्रू फत्तरांवर पडलेल्या जलबिंदूंप्रमाणें जनतेच्या हृदयाला तात्पुरता ओलावा आणून सुकून जातात. 'सहानुभूति' 'सहानुभूति' म्हणून म्हटलें, तरी बहुधा तिचें स्वरूप बेगडीच. पुरुषाची सहानुभूति अनेक वेळां स्वार्थी तर स्त्रियांची मत्सरी असते! खरी सहानुभूति दाखविणारीं किती माणसें सांपडतील? मानवी संकेताची व्यर्थता पटत असली, तरी त्या संकेतांच्या बंधनांत तुम्ही दुःखी आहांत, तोंपर्यंतच जगाची सहानुभूति. त्या बंधनांची व्यर्थता लक्षांत घेऊन, जगाच्या सहानुभूतीला पाठीशीं घेऊन बंधनें तोडूं पाहाल, तर नवख्या घोडेस्वाराला घोडा जसा दूर फेंकून देतो, तशीच माणसाची अवस्था समाज करील. अचलेला बंधनांतील कोरडी सहानुभूति

नको होती. "बंधनांत राहीन तर निराश्रयानें स्वतंत्रपणें जगेन. नाहीं तर बंधनें तोडून, दुबळ्या संकेतांना पायदळीं तुडवून, जगाचें शत्रुत्व पत्करूनही माझें सुख मी मिळवीन." ही तिची भूमिका होती. त्या भूमिकेवर असणाऱ्या अचलेला तिच्या छोट्या जगांत कोणीही ओळखलें नव्हतें. अचला कशी होती? लहान मुलांच्या चेहऱ्यावर दुःखाचा स्पर्शही न झाल्यानें जसें हंसूं खेळत असतें, तसें तिच्या चेहेऱ्यावर खेळे. तिनें स्वतःला तसें बनविलें होतें. थोरांपासून शक्य तों लांब राहून, लहान मुलांत अल्लड होऊन मिसळणाऱ्या अचलेच्या धगधगलेल्या मनोवृत्तींची कोणालाच जाणीव नव्हती. व्यक्तींचीं सुख-दुःखें एकमेकांना सांगण्याबोलण्यांत मैत्री जगून पुष्ट होत असते. अचला आपल्या मैत्रिणींबरोबर फिरायला गेल्यावर त्या आपलीं क्षुल्लक सुखदुःखें मोठीं करून सांगत. तिच्या ठिकाणीं त्यांना विश्वासाचा सांठा लाभल्यासारखें वाटे. पण अचला? जणुं तिला दुःखें नव्हतींच. ती कधीं कुणापाशीं आपलें हृदय मोकळें करीत नसे. मनांत अधिकाधिक आवेग येत, तेवढे सगळे ती आपल्या कृत्रिम आनंदी वागणुकीनें आंतल्या आंत दाबी. अशा वेळीं कधीं कधीं ती पोरकटपणा करी. कधीं उगीचच सृष्टीचीं लांबलचक वर्णनें करूं लागे. ऐकणाराला वाटावें कीं हिला दुःख म्हणजे काय तें माहीत आहे कीं नाहीं? तिच्या या संतुष्ट वृत्तीचा कोणालाही हेवा वाटावा असें ती वागे. कित्येक वेळीं मैत्रिणी तिला खोद खोदून प्रश्न विचारीत, "अचला, तुला अगदीं असह्य होत असेल नाहीं जगणं?" ती तितक्याच कठोरपणें, पण सहज उत्तर देई, "असह्य? काय म्हणून? संसार हा एकच

कांहीं सुखाचा राजमार्ग आहे थोडाच ? उलट तो तर अधिक जिकीरीचा. माझ्या संसारांत माझीं मुलें व माझे पति यांचीच सेवा मला करतां आली असती. आतां तुमच्या सारख्या प्रेमळ मैत्रिणी व शाळेंतील शेकडों गोडशा मुलींची सेवा मला करतां येते....''

पण सारा ढोंगीपणा. दाबलेल्या अंतःकरणाचा एकही निराशेचा सूर दुसऱ्याला ऐकूं न देण्यांत अचला तत्पर असे. पण उजाडलेला दिवस अस्ताला जाई. सारा वेळ विचार करून आणलेलें दिवसा उजेडीचें मनोधैर्य संध्याकाळीं कोठल्याकोठें वितळून जाई. शाळेचें काम संपवून जड पावलानें घरीं आल्यावर अगदीं एकटी अचला मनाचे लगाम स्वैर सोडी. त्यांत तिच्या रुक्ष आयुष्यपथावर सुंदर हिरवळ दिसे, वनराई दिसे. त्यांत इवलाले पक्षी किलबिलाट करतांना दिसत. तिचें अंतःकरण भरून येई. हेच, हेच तिच्या साऱ्या दिवसांतील कोणालाही न कळलेले दुर्बलतेचे क्षण असत.

## २१

त्याच त्या आयुष्याला कंटाळलेली अचला थकून दमून घरीं आली. ज्यांबद्दल उत्साह नाहीं, आस्था नाहीं, अशीं कामें करीत बसून, आयुष्याच्या जपमाळेंतील एकेक दिनमणि योगिनीप्रमाणें ओढीं पहाणारी अचला किती वेळ शून्यपणें घरांतच फेऱ्या घालीत होती. शेवटीं मन रिझविण्यासाठीं तिनें विरागकडून आणवलेलें पुस्तक उघडलें. त्यांत असलेल्या त्या चित्रानें आतांपर्यंतचा निरुत्साह कुठल्याकुठें दबून गेला. ती स्तिमितपणें त्या चित्राकडे पाहूं लागली. नेपोलियन आणि

त्याच्या मांडीवर विश्रब्धपणें निजलेलें तें इवलेंसें अर्भक! तें चित्र स्तिमित करणारें होतें यांत शंका नाहीं. ज्याचें हृदय रक्ताचे सडे शिंपूनही कधीं चरकलें नाहीं; हजारों मनुष्यांचे जीव क्षुद्र कीटकांप्रमाणें चिरडतांना ज्याचें मन कचरलें नाहीं, असा नेपोलियन! मूर्तिमंत काठिण्य! अभंग पाषाणाचें तें हृदय! त्याच्या मांडीवर असहाय कोमल मुग्ध बालिका विश्वस्तपणें झोंपीं गेलेली! सिंहाच्या मानेवर हरिणीचें पाडस मान टाकून झोंपलेलें! कुणाचीही दृष्टि त्या चित्रावर खिळल्याशिवाय राहिली नसती. जगाच्या डोळ्यांना न दिसलेली, नेपोलियनच्या फत्तरासारख्या हृदयामध्यें दडून राहिलेली ती गोड वत्सलता! त्या बालिकेच्या रूपानें कलावंतानें ती वत्सलता जगाच्या निदर्शनास आणली होती.

कलावंत! मग तो कवी, गायक, चित्रकार, शिल्पकार कोणीही घ्या. कोणी शब्दांशीं खेळेल, कोणी सुरांशीं, कोणी रंगकुंचलीशीं, कोणी दगड मातीशीं. पण त्यांच्या कलेचें अजाण कार्य एकच–हृदयाच्या तारा छेडणें. अचलेच्या हृदयाच्या तारा त्या कलेनें अशाच छेडल्या गेल्या होत्या. कलेंत ती जादू आहेच! कोमल मनाला अधिक हळुवार करणें, फत्तर हृदयाला पाझर फोडणें ही कलेचीच करामत आहे. सुखी जीवाबरोबर बागडणारी ही कला इतरांना जणुं हंसत सांगते,

शोक कशाचा? आयुष्याचा?
नका ऐकूं हीं रडगाणीं।
आयुष्य असे नंदनवन हें

कला ही हताश करण्यासाठीं नाहीं. साऱ्या दुःखी जगाबरोबर समदुःखी होऊन उसासे टाकणारी ही कला आपल्या प्रत्येक उसाश्याबरोबर दुःखी जिवाला सांगते, " उगी. बाळ, दुःख करूं नको. असा चल बरं." स्वतः त्याच्या दुःखाची वांटेकरी होऊन त्या दुःखी जीवाच्या मनाची कळी उमलवणारी जादू कलेंत आहे. ती नसती तर आयुष्यांतील सुखदुःखें भोगणारीं माणसें, सुखान्तच केवळ नव्हे तर शोकान्त नाटकें, शोकान्त कादंबरी, हृदयविदारक चित्रें, गाणीं अथवा कविता ऐकण्या पहाण्यासाठीं धडपडलीं नसतीं. त्या धडपडणाऱ्या मानवांना ही कलाच संजीवनी देते. विकृतीनें हजारों पुटें बसवून, कोंदाटून, गुदमरून टाकलेल्या हृदयांतील सात्विकपणाला जाग आणण्याचें काम कलाच करते. अपूर्ण मानवाला न कळणारी हृदयाची गुंतागुंत, आपल्या कोमल अंगुलीनें तीच उकलून दाखविते ! कलावंतानें सर्वस्व ओतलेला एकच कवितेचा चरण, गळ्यांतून एकादाच खेंचलेला कोमल सूर, कुंचलीच्या एकाद्याच स्पर्शानें उमटवून दाखविलेला भाव–कांहीं घ्या. त्यांत थयथय नाचणारी कला पहाणाऱ्या ऐकणाऱ्याच्या वृत्ती मोहरून टाकते. स्वतःचें भान हरपून दुसऱ्याचेंही हरपविणाऱ्या कलावंताचें अचलेला कौतुक वाटलें. " खरंच. हेंच समाधान. या नीरस आयुष्यांत तजेला ठेवायचा असला, तर वेडें बनायला पाहिजे. कसलें तरी वेड पाहिजे. तें नसेल तर आयुष्य हें नुसतें कंटकमय बाभुळबन वाटत राहील. तेंच कसलें तरी वेड असूं द्या. मार्गातील कांटेसुद्धां गुलाबाच्या फुलांसारखे वाटूं लागतात. पण असें अंगजात वेड असायला सुद्धां भाग्य लागतें. मुद्दाम वेडें व्हायचें

म्हटलें [illegible] होतां येत नाहीं. तें वेड फार थोड्यांना लाभतें. आणि असे वेडेच समाधानी असूं शकतात.

वेड्यांचा राजा निसर्ग ! दंवबिंदूंनीं निर्माण केलेल्या हिरकण्यांचा गालीचा किती दिवस—स्वतःचें समाधान होईपर्यंत घालीत राहतो. सूर्याचे हस्तक दररोज येऊन तो मोडून टाकतात. पण त्या वेड्याला त्याची पर्वा नाहीं. त्याची निराशा होत नाहीं. उत्तम कलावंतांची कला लोकांच्यासाठीं नाहींच. ती स्वतःच्याच समाधानासाठीं.

## २२

एका आरामखुर्चीवर पडून अचला समोरच्या नुकत्याच दिवा लावलेल्या घराकडे पहात होती. तिच्या मांडीवर अर्धवट उघडें पुस्तक पालथें घातलें होतें. अगदीं अंधार पडेपर्यंत, डोळ्याला अक्षर दिसेनासें होईपर्यंत ती वाचीत होती. तिनें पुस्तकावरील दृष्टि काढली. पण वाचलेल्या विचारांनीं तिच्या मनावर पूर्णपणें पगडा बसविलेला होता.

चांगल्या, ललित वाङ्मयाचा प्रभाव मोठा विलक्षण आहे. कोणतीही बुद्धिमान् स्त्री घ्या, अगर पुरुष घ्या, त्याच्या मनांत खळबळ उडवून देऊन "मी यांत कोठें आहें ? यांतलं मला काय न् किती लागू पडतं ?" हा विचार प्रज्वलित झाल्याशिवाय रहात नाहीं. आणि नाहीं तरी ज्ञान हें मनुष्याच्या प्रगतीसाठीं असेल, तर तें ज्ञान आत्मनिकषावर लावून घेतल्याखेरीज त्याचा उपयोग काय ? पिढ्यानुपिढ्यांचे बरे वाईट संस्कार मुरलेल्या या देहकोषांतील आत्मबीजाला अंकुर फुटायला त्या संस्कारांना ज्ञानाची आंच लागावी लागते.

आज रोमां रोलांच्या त्या वाक्याभोंवतीं तिचें मन घोटाळत होतें.

"A vigorous, healthy nature like Annette's must create, perpetually create, create with its whole being, body and spirit. Create or else brood over the creation that is to be. It is a necessity and happiness comes only through satisfying it. Every creative period has its own limited field, and its rising force follows a trajectory that descends again sharply."

तिला ह्याची सत्यता पटत होती. तिच्या आयुष्याच्या क्षणाक्षणाला महत्व होतें. क्षणाक्षणाला झरून चाललेल्या आयुष्याकडे पाहून तिला कसली तरी भीति वाटत होती. सुख हें त्या निर्मितींतच आहे. तिला हें केव्हांच कळून चुकलें होतें. पण तो निर्मितीचा आनंद उपभोगावयाचा कसा? तें एक दिव्य होतें. त्या साऱ्या दिव्यांतून जाणाऱ्या रोलांच्या ॲनेटनें अचलेला भारून टाकलें. ॲनेटच्या मनाला रॉजर्सबद्दल लागलेली ती जबरदस्त ओढ! त्या ओढींतूनच मातृत्वाची उत्पन्न झालेली जबर इच्छा. पण पुरुष जातीबद्दल मनांत वसत असलेला पिढीजात तिटकारा. विवाहावांचूनच अंगिकारलेलें मातृत्व! कुमारी माता! साऱ्या जगाच्या भालाइतीला न जुमानतां बेदरकारपणें स्वतःला पटलेलें करीत जाणारी ॲनेट! अचलेला ॲनेट आवडली. "लढा? ठीक आहे. प्रचंड वादळ आणि शांतता असलाच आयुष्याचा खेळ आहे. मी या खेळांत सामील व्हायला मागें घेणार नाहीं." असें म्हणून

निर्भयपणें आयुष्यभर वाऱ्यावादळांतून आलेल्या ॲनेटची जबरदस्त ताकद पाहून अचलेला अचंबा वाटला. जगाची फिकीर न करतां तिनें मार्कला जन्म दिला. ॲनेटच्या जिवाचा विसांवा " मार्क. " तिचा मार्क तिचें सर्वस्वच. एका पारड्यांत तिचा उपहास करणारें जग आणि दुसऱ्या पारड्यांत तिचा मार्क. मार्क तिला जगापेक्षां अधिक किंमतीचा वाटत होता. मार्क तिचा मुलगा. तिच्या मनोदेहाचा केलेला. तिचा. तिच्यापासून कधीं दूर जायचा नाहीं अशी तिची खात्री. ती त्याला कवटाळूं पहात होती. आणि तो तिच्याकडे उदासीनतेनें पहात तिच्यापासून दूर दूर जात होता. तिच्या मनाला डंख लागत. तिचें सारें आयुष्य झगडाच होता. पण ती भीतीनें खंगली नाहीं. झगडत होती. एकीकडे मातेच्या हृदयाची ओढ, एकीकडे पुरुषाच्या सान्निध्यासाठीं तळमळणाऱ्या स्त्री-प्रवृत्तीचें थैमान, एकीकडे दररोजच्या भाकरीसाठीं चाललेली धांवपळ, असा एकाच ॲनेटचा तिहेरी खेळ चालला होता. त्यांतूनही रणझुंज करून पुन्हां " I challenge God " म्हणणाऱ्या ॲनेटबद्दल अचलेला कौतुक वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. मनुष्याच्या भोंवतीं अशा विलक्षण निरनिराळ्या शक्ति नाच करीत असतात. त्या सर्वांशीं खंबीरपणें झुंजणें— स्वतःला ओळखून झुंजणें, हेंच खरें पराक्रमाचें आयुष्य. ॲनेटशीं लग्न करायला रॉजर्स केव्हांही तयारच होता. अशा स्थितींतही तिनें त्याला बाजूला फेंकलें ! रॉजर्सचा मुलगा म्हणून सरळपणें मार्कला मिळणारी पित्याची जोड तिनें डावलून टाकली, रॉजर्सचें दुसऱ्या मुलीशीं लग्न झालें. मार्कसाठीं, जगानें मार्कला मानावें म्हणून, तिची

धडपड सुरू झाली. पण एका मुलाच्या मातृत्वानें स्त्रीत्वाच्या सर्व भावना, सर्व विकार जळून खाक होतात थोडेच! ते पुन्हां डोकें वर काढीत. ज्यूलियन आयुष्यपथावर भेटला, तिला तोल जातोसें वाटलें. तिनें पुन्हां स्वतःला सांवरलें. फिलिप्स भेटला. तिचा स्वतःचा तोल गेला. तरीही ती सांवरली. काय ती झुंज! दुसऱ्याशींच नव्हे, त्याहूनही भयंकर. स्वतःची स्वतःशींच. तरी ती म्हणत होती, "War or peace! That's the game of life. I will have my own share, I challenge God!"

रोलांच्या ॲनेटचीं हीं वाक्यें तिच्या कानांत दुमदुमत राहिलीं. ती तशीच विचार करीत पडली.

## २३

दारावर टिचकी वाजली. तिनें दार उघडलें. "कोण, राधिका? इतक्या उशिरां? आणि आलीस तरी कधीं?"

"आजच संध्याकाळीं आणि उद्यां सकाळीं जाणार सुद्धां. पण गडे तुला भेटल्याशिवाय जाववेना."

"आणि हा कुणाचा? तुझाच का?" अरविंदाला घेत अचला म्हणाली.

"इश्श, मग नाहीं तर कुणाचा ग?"

किती दिवसांनीं तिला राधिका भेटली. राधिकेचें लग्न झाल्यावर ती जी सासरीं गेली, ती आज 'पुत्रवती'च अचलेच्या भेटीला आली.

" ए पण, अशी एक दिवसच आलीस काय नि लगेच चाललीस काय ? अशी धांवपळ कां ? "

" अग बदली झाली आहे ना यांची. कामावर हजर राहायला हवं परवां. "

" पण मग ते जातील. तूं राहा कीं. "

" छे ग. असं कसं. "

" अग बाई, खरंच. एक दिवस सुद्धां नाहींना चैन पडायचं ? " अरविंदाचे पापे घेऊन त्याला अचलेनें अगदीं गुदमरवून टाकलें.

" राधिके, गोड आहे बाई भारीच. कोणासारखा आहे ग हा ? "

" इश्श, मला नाहीं बाई माहीत ! "

" कमाल आहे तुझी. इतकी लाजतेस ! "

त्या मैत्रिणींची थट्टामस्करी झाली. मनमुराद बोलणें झालें. अरविंद कुरकुरूं लागला. राधिकेनें अचलेजवळून त्याला घेत म्हटलें, " आतां निजणार आहे स्वारी बहुधा. हें बघ मी निजवितें त्याला इथेंच तुझ्या बिछान्यावर, मग जाणार आहें मी आणखी एका घरीं. "

" कमाल आहे बाई तुझ्या धांवपळीची. "

" मग काय करूं ग ? " राधिका अरविंदाला थोपटीत म्हणाली. अरविंदाला पाळण्याची संवय होती. तो नुसता थोपटून थोडाच निजणार ? राधिका त्याला तशीच थोपटीत ओंव्या म्हणूं लागली.

माझ्या अंगणांत सांडिला दूधभात ।
जेविला रंगनाथ अरविंद बाळ ॥ १ ॥
माझ्या अंगणांत कशाचा केर झाला ।
जाई मोडून चुरडा केला अरुबाळानी ॥ २ ॥

हं उगीऽ बाळा. होऽ हो. गाणं म्हणतें बरं माझ्या बाळाला. आपल्या दोन्ही हातांच्या पाळण्यांत आंदोलीत राधिका पुढें म्हणूं लागली.

माडीवर माडी माडीखालीं झरा ।
तोंड धुतो हिरा अरू बाळ ॥ ३ ॥
पाहुणे घरीं आले काय पहातां रतनाला ।
मुलगी द्यावी रतनाला अरू बाळाला ॥ ४ ॥
फुलांमध्यें फूल फूल कोमल जाईचं ।
माझं सुमन प्रीतीचं अरु बाळ ॥ ५ ॥
अरुबाळ खेळे अंगण ओसरी ।
त्याला संगत दुसरी कमाताई ॥ ६ ॥
जावळ भुरुभुरू उडे अंगणीं खेळतां ।
थके जीव आवरतां, अरु बाळाला ॥ ७ ॥

तिनें किती गोड ओंव्या म्हटल्या. अगदीं सभोंवतालच्या सगळ्या माणसांना विसरून राधिका म्हणत होती. त्या साध्यासुध्या सुरांत अशी कांहीं गोड वत्सलता ओसंडत होती, कीं कोणाचेंही हृदय हळुवार व्हावें. अचलेच्या दृष्टींतून कांहीं सुटलें नाहीं. ती वरकरणी गच्चींतून

रस्त्याकडे पहात असली तरी राधिका ओंव्या गात असतां, अचलेची इच्छा नसतांनाही तिचे डोळे पाण्यानें भरून आले. अरुबाळ आईच्या त्या हातांच्या आंदोलनांत झोंपीं गेलें. तिनें त्याच्याकडे पाहिलें. "झोंप लागली वाटतं ?" हळूच ती म्हणाली. तिनें त्याच्याकडे प्रेमभरानें पाहिलें. त्याचा हळूच पापा घेतला. हळू अगदीं हळू–त्याला खालीं ठेवलें. "कसा माझा राजा शाहण्यासारखा निजला आहे पण."

राधिकेनें अचलेला म्हटलें, "अचलाताई, आतां चांगला तासभर निजेल हा. मी जाऊन येतें हं शेजारीं."

"जा जा. उठला तर येईन मी सांगायला हो."

राधिका गेली. अचला त्या इवल्याशा जीवाकडे टक लावून पहात होती. तिचे डोळे पुन्हां पाण्यानें भरून आले.

कुंदेला माणिक घेऊन बसे, तेव्हां तिच्या जीवाची अशीच कालवाकालव होई. मायलेकींच्या वात्सल्याचा कोणताही देखावा पाहिला, तरी हृदयावर कांहींतरी दडपण पडल्यासारखें अचलेला होई. चोरून, कुणाला ऐकूं जाणार नाहीं, असा निःश्वास ती टाकी. संध्याकाळीं येणारी उदासीनता, त्यावेळीं ऐकलेलीं हळुवार गाणीं व मातृप्रेमाचा तो देखावा—अचला स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. अरविंदानें एकदम चळवळ केली. तिला आपल्या रडण्यानें अपशकुन केल्यासारखें वाटलें. एकदम ती त्याच्याजवळ गेली. अरविंदानें कुरकुरायला सुरुवात केली. तिनें "उगी उगी" म्हटलें. छेः, त्याची समाधि भंगलीच. तो रडायला लागला.

अचलेनें सभोंवार पाहिलें. राधिकेला यायला अवकाश होता. तिनें झटकन् अरविंदाला आपल्या मांडीवर घेतलें. अरविंदानें " उहुं उहुं " केलें. खायला मिळालें कीं झालें. त्याला आईत व इतरांत फरक कळत नव्हता. खायला देते ती आई. त्या ओठांच्या स्पर्शानें अचलेच्या अंगावर रोमांच आले. सर्व अंगांतून कसल्या तरी लहरी एका ठिकाणीं केंद्रित झाल्या. तिनं डोळे घट्ट मिटले पण–पण छे:, अरविंदाचें समाधान झालें नाहीं. जोरानं शोषण करूनही त्याचें समाधान झालें नाहीं. तिचेंही समाधान झालें नाहीं. तिचें सर्वांग विचलित झालें. डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागले. ती हताश झाली. 'नाहीं. अचल, मातेचा पान्हा यायला, फार मोठी किंमत द्यावी लागते. आपल्याच देहात्म्याची ती एवढीशी दुसरी प्रतिमा अंगाला बिलगली असतां, निर्माण होणारी आत्मीयता–ममता–मातृत्व–अशा कृत्रिमतेनं जोडून उत्पन्न नाहीं होणार. मग काय करूं ? माझ्या चित्‌शक्तींचा गोळा— माझा मुलगा—माझ्या जीवनाचं सारसर्वस्व ओतलेला माझा अरविंद मला हवा आहे. " ती अगदीं परकेपणानें मांडीवरील मुलाकडे पहात होती. तो रडत होता. ती शून्य मनानें हळू हळू मांडी हलवीत होती. त्याच्या रडण्याचे सूर तिच्या कानांत घुमायला, तिच्या हृदयांत पीळ पडायला, तिची चेतना ठिकाणावर नव्हती.

राधिका आली. " अग बाई, उठला का ? " म्हणत तिनें त्याला घेतलं. त्या स्पर्शानेंही अरविंदाच्या रडण्यांत फरक झाला. राधिकेनें

क्षणार्धांत त्याला उगा केलें. अचला निराशेनें सर्व कांहीं पहात होती. " तुला अगदीं त्रास दिलान् ना ? " तिला राधिकेनें विचारलें. तिला अचलेच्या जखमेची अणुमात्रही कल्पना येणें शक्य नव्हतें.

## २४

अचलेनें मस्तक सुन्न होईपर्यंत विचार केला. " माझ्यावर वासनांचा इतका जबरदस्त पगडा बसला आहे का ? " पुन्हां तिनें विचार केला. वासनांच्या आहारीं जाऊन अमुक एक गोष्ट करायची ? छेः हा मनुष्यपणा नाहींच. याच विचारानें तिनें किती दिवस विरागला टाळलें होतें. रस्त्यानें जातांना तो तिला किती वेळां तरी दिसला असेल. पण ती त्याच्याकडे न पहातां, ओळख न दाखवतांच किती वेळां पुढें निघून गेली होती. विरागला हें कळत होतें. तिच्या अंतःकरणांत सुरू झालेला झगडा त्याला स्पष्ट दिसत होता. तोही दुरून ओळख न दाखवितां निघून जाई. पण कशी कोण जाणे ! पुन्हां त्यांची गांठ पडली. विरागनें तिच्याकडे एकदांच पाहिलें. तो कांहीं बोलला नाहीं आणि तिनें विझवलेली ज्योत पुन्हां पेटूं लागली. तिनें तिरस्कारानेंच तिला विझवायचा प्रयत्न केला.

" मूर्ख तर नाहींस. तूं सधवा आहेस. तुझा नवरा जिवंत आहे. " ती ज्योत विझली नाहीं. तिनें आपली जिव्हा परजून उत्तर दिलें, " असेन मी सधवा. पण विधवांत व माझ्यांत काय अंतर आहे ? "

" तुझा नवरा जिवंत आहे. "

" तो असून नसून सारखाच आहे. "

" तुझं विरागवरचं प्रेम वासनामय आहे. "

" मग ? वासनाविरहित प्रेम कुठें आहे ? "

" नसलं तरी तूं तसं करायला शिकलं पाहिजेस. तो तुझा पत्नीधर्म आहे. "

" मला पत्नी म्हणणारा पती आहे कुठें ? पती म्हणविणाऱ्या पतीच्या दृष्टीनें मी कधींच मेलेली आहें. त्यांच्याच दृष्टीनें ते मला नाहींसे झाले आहेत. "

" पण शील ? "

" त्या शीलाची व्याख्या काय ? अंतरंगाच्या कुविचारांनीं ठिकऱ्या उडवून, मेलेलें जिणें जगण्यापेक्षां स्वतःला ओळखणं व धैर्यानें तें कबूल करणें यांतच शीलाची सत्यता नाहीं का ? "

" सधवा स्त्रीनें दुसऱ्या पुरुषांवर प्रेम करणं ही शीलभ्रष्टता आहे. "

" त्यांचं दर्शनही मला कित्येक वर्षांत नाहीं. अशा शीलभ्रष्ट माणसाला पती मानून त्या कल्पनेनें सुख मानीत राहूं ? शक्य नाहीं. "

असें म्हणून ती ज्योत अधिकच भडकली. तिच्या धडधडाटा-पुढें दुसरी वाणी ऐकूंही येईना.

## २५

**विराग,**

तुम्ही माझें हें पत्र वाचून दचकाल. पण साऱ्या गोष्टींचा शेवट करायचें मी ठरविलें आहे. मनाच्या हिंदोळ्यावर राहून माझी मलाच भोंवंड आली आहे. त्यावरून कुठेंतरी फेंकलें जायचें; नाहीं तर स्वतःच धीरानें उडी घ्यायची ! मला पायाखालची जमीन किती कांटेरी आहे हें कळतं आहे. फेंकलें गेलें तर, असहायपणें डोकें फुटून मरणार; धीरानें उतरलें तरी कांटे बोंचतील. पण विराग, मला असहायपणें मरायचें नाहीं. जीवंतपणें जगायचा माझा निश्चय आहे.

विराग, एकदां अशी मी अंधारांत बसलें होतें. तुम्हीं आलांत नि मी म्हटलें, " हें काय ? आतां आलां ? " आणि तुम्हीं काय म्हटलंत ? " To lighten the darkness " आठवतं तुम्हाला ? माझ्या आयुष्याचा अंधेर तुम्हीं उजळाल का ? विराग, कशाला खोटं बोलूं ? मला–मला तुम्हीं पाहिजे. आणि–आणि मला आई व्हायला पाहिजे.

विराग, तुम्हीं मला पापी म्हणाल ? " वासनावर जय मिळवून रहा. " सारीं सांगतात हें. पण वासना उपभोगल्याशिवाय पूर्णताही नाहीं. पूर्णता नसतांच कशी वासना मरेल ? विराग, इतकी प्रजा निर्माण करूनही ईश्वरालासुद्धां नाहीं वासनांवर जय मिळवितां आला.

तें महाभारत ! तें भागवत ! असेल माझी विकृत दृष्टि; पण त्या भारत भागवतांनीं मला हेंच सांगितलं, कीं जीवन जगणं, हेंच भूषणाचं; जिवंत मरण उपभोगणं, हेंच अधोगतीचं आहे.

# हिंदोळ्यावर

मला नाहीं लोकांची भीति वाटत. लोक परके आहेत. त्यांनीं केवळ माझ्या दुःखाकडे बघून दुःखांवर अधिक डागण्या द्याव्यात. माझ्या सुखाकडे बघून, वैषम्यानें नाक मुरडावें. आणि विराग, कोणता मनुष्यप्राणी दुसऱ्या प्राण्याकडे निर्मत्सर पहात असतो? तुम्हीं म्हणाल, आपल्या सुखाच्या आड आल्याबद्दल, व्यक्ति "जनता" या अव्यक्ता-वर खुशाल दांत खाते. पण कोणत्या व्यक्तीनें तसं केलं नाहीं? आईच्या कुशींतून येणारा प्रत्येक जीव जन्मल्यापासून पृथ्वीवर सुखाचे शिंपले शोधायला निघतो. त्याच्या हातीं रिकामे शिंपले आले तर गुप्तरीतीनें, छपवाछपवीनें, तो दुसरे हस्तगत करतो. असं करतांना लोकांना उमगलें तें पाप; अन् न कळतां, बेरडपणानें केलेल्या गोष्टी तें पुण्य; हीच ना मानवी व्यवहाराच्या पापपुण्याची कसोटी?—मी नाहीं भीत लोकांना. मी सरळ लोकांदेखत म्हणतें, "हो, मला संसाराची इच्छा कां नसावी? मी तुमच्या अडमुठ्या बंधनांना नाहीं जुमानणार! मला तुमच्या ढोंगी नीतीची बिलकूल गरज नाहीं. तुमच्यासाठीं बहिरंगी निराळं आचरण ठेवून, अंतरंग कुविचारांनीं नासवून, मी सदाचारी, सुशील आहें, असं भासविण्याचा माझा मुळींच अट्टाहास नाहीं. आतांपर्यंत तुम्हीं उभारलेलं हें मानवी संकेतांचं नीतिमंदिर मीं पाहिलं. जागजागीं तें उकरलं आहे. जागजागीं त्याची दुरुस्ती चालली आहे. तें यावच्चंद्रदिवाकरौ टिकेल अशी कशाला घमेंड करतां? तुम्हींच त्याला किती भगदाडें पाडलीं आहेत? आंतलं सत्य पहाण्यासाठीं तुम्हीही ही भिंत कित्येक ठिकाणीं उकरली आहे. मी पण ती उकरणार.

विराग, निसर्गानें मनुष्यप्राणी हा एकटा रहाण्यासाठीं निर्माण केला नाहीं, असं मला वाटतं. कृत्रिम बंधनें मनुष्याला एकटं सोडतील, तर भयाण एकटेपणा त्याला खायला उठल्याशिवाय राहणार नाहीं. मनानें व देहानें एकलेपणाची भयानकता, दुसऱ्याची सोबत घेऊन शमविली नाहीं तर तो मनुष्य जगावर द्वेषाचे फूत्कारच टाकीत राहील. आपल्या सारखं दुसऱ्यांनीं तळमळावं, अशी निष्ठुर भावना त्याच्यांत उगवण घेतल्याशिवाय राहणार नाहीं. समाजाकडे सहानुभूतीनें पहाण्यासाठीं, स्वार्थपरार्थ साधण्यासाठीं, विकारांचाही मर्यादित उपशम व्हायला पाहिजे.

आईचे अंगावर पितें मूल पाहिलें, कीं मला हेवा वाटतो. पति-पत्नींना आनंदानें हंसतांना पाहून मला उदास वाटतें. मला भीति वाटते, कीं साऱ्या जगाच्या सौख्याला तर माझी दृष्ट नाहीं ना लागणार ?

विराग, माझी खात्री झाली आहे, कीं व्यक्तित्वांत व्यक्तित्वाचा शेवट होत नाहीं. व्यक्तित्व ही अशीच कांहीं गोष्ट आहे, कीं तिचा जगाशीं संबंध आलाच पाहिजे. भिन्नत्व निमवून टाकलें पाहिजे. प्रेम, अपत्यें, आणि उद्योग या तिन्हींपैकीं कोणतेंही एक व्यक्तित्व विरवून टाकण्यास पुरेसें नाहीं. हीं तिन्ही पाहिजेत. या तिहींनींच जगाशीं येणारा संबंध व्यक्तित्व निमून जाण्यास उपयोगी पडतो; नाहीं तर तो एकलेपणा स्वतःचा स्वतःलाच खुपत राहतो.

सगळ्या, सगळ्या वस्तूंत नि प्राणिमात्रांत, कोणी कोणी एकटं नाहीं. जणुं प्रत्येकाला मागें मुरडून पाहायला गोडसा पाश आहे. आणि मी ? मीच कां एकटी ? भयाण आयुष्याच्या मार्गावर एकेक जड

पाऊल टाकीत जात असतां, सगळीं सगळीं कशीं माझ्यापासून लांब पळतात ? विराग, तुम्हीं काय म्हणाल ? मग शिजून उफाळणारे हे बोल ? काय करूं ? ते हृदयांत मावत नाहींत. हृदय अगदीं कोंदाटून गेलं आहे. बाहेर बोलायची चोरी. सगळीं म्हणतील, मी पापी आहें, व्यभिचारिणी आहें, वेश्या आहें. कुमारिका असतें तर डौलानें जगांत हिंडलें असतें. विधवा असतें, तर—तरी विराग, तुमच्याकडे उघड्या डोळ्यानें आलें असतें. आतां ? पुसूं का हें ? काय हें मी बोलतें ? कुंकूं पुसून टाकायचें ? मला वेड तर नाहीं लागलं ? लोक काय म्हणतील ? बाबा, माणिक, भाऊसाहेब ? पण विराग, खरं सांगूं का ? दररोज सकाळीं हें कुंकूं लावतांना, कपाळाला चरका बसतो. किती विसरायचं म्हटलं, तरी निर्जीव सौभाग्याची आठवण सकाळपासून मला अस्वस्थ करते. मी काय केलं नाहीं हें मन ठार मारण्याकरितां ? सारं केलं. जगापासून तें तोडलं तरी तें मरेना. ‘धर्म’ ‘धर्म’ म्हणतात त्यांत बुडवून पाहिलं; त्यानें तर माझ्या मनाला अधिकच प्रदीप्त केलं. मनुष्याच्या आयुष्याचें ध्येय दुहेरी आहे ना ? त्यानें स्वतःला जाणायचें आणि जगाला जाणायचें. दोघांकरितां जगायचें. ‘जीवनपुष्प पुरें उमलल्याशिवाय तें खुरटवून टाका’ असं धर्म मला सांगत नाहीं. पण आतां ? जीवन जगायचं सोडून त्याला भिऊन नाहीं का मी पळत आहें ? मला धर्म पळायला नाहीं सांगत. तो स्त्रीपुरुष सारखेच समजतो. धर्माला पक्षपात माहीत नाहीं. साऱ्यांनाच त्यानें ‘आत्मरक्षण आणि जातिरक्षण करा’ म्हणून सांगितलें आहे. माझं मन धर्मानें मरत नाहीं. तें जगायला शिकलं आहे.

मी काय पाप केलं आहे? मला नाहीं का आई व्हावंसं वाटत? मी माझ्या आवतींभोंवतीं बघतें, सजीव, निर्जीव वस्तूमात्र मला सांगतात, "तूं पूर्ण नाहींस." पन्नास मुलींना आईप्रमाणें वागवलें, तरी त्या घरीं जातात, "आई आई" म्हणून दुसऱ्यांना हांक मारतात. मी घरीं येतें. अगदीं एकटी. संध्याकाळीं घरट्यांतील पिलांच्या चोंचींत चोंच घालून पक्षी किलबिलाट करतात. वेलीवरचीं फुलं डोलतात, वासरं गाईमागें हंबरत जातात, सारी चिमणी सृष्टि दुडदुड धांवतांना, बोबडे बोल बोलतांना मला दिसते. आणि मी? एकटी. अंधारांत एकटी बसून राहतें. विराग, मी कधीं कधीं विचार करतें, मला आंतलं-अगदीं आंतलं मन सांगतं कीं...पण खरं आहे का मला वाटतं तें?-तसं नसलं तर? तर-तर-पण तुम्ही "नाहीं" म्हटल्यानें काय होईल याचं वर्णन कशाला करीत बसूं?

पण, तुम्हीं होय म्हटल्यानें काय होणार आहे, हें मात्र हवं तर सांगतें. बुडतं माणूस स्वतःचा जीव वांचविण्यासाठीं पोहणाऱ्या माणसाला विळखा घालतं आणि त्याचाही अंत ओढवून आणतं. विराग, माझी ही ओढ जीवघेणी आहे! मला कळतं. पण....विराग, तुमची रीत मला माहित आहे. तुम्हीं तो विळखा तोडून टाकाल. पण तो केवळ स्वतःचा जीव वांचविण्यासाठीं नाहीं, दोघांनींही तीराला लागण्यासाठीं. विराग, तुम्हीं अविवाहित आहांत. समाजाला न डिवचतां सुखाचें भरलें ताट तुमच्यापुढें येऊं शकेल; नव्हे, सहजासहजीं येईल. असं असतां मी-लोकांच्या दृष्टीनें सधवा, पापी स्त्री, समाजाच्या

दूषणांची तांत, माझ्यासाठीं तुमच्या मानेला लावायला तयार झालें आहें. विराग, किती लिहायचें आहे मला! पण काय लिहूं?

तुमच्या आयुष्याची माती करूं पहाणारी,

**अचला**

तिनें पत्र लिहून पुरें केलें.

मनाचा आवेग पुरा ओसरला. तिला एकप्रकारचें समाधान वाटलें. त्या समाधानानें तिला शांत झोंप लागली. सकाळीं अचला उठली. तिनें तें पत्र पुन्हां एकदां वाचलें. "मी मूर्ख तर नाहीं? एवढं लांबलचक पत्र? असला कबुलीजबाब? आणि त्यानें 'नाहीं' म्हटलं तर? एवढं अंतःकरण खुलं केलेलं पत्र? छेः नकोच. कानोसा घेऊं दे मला. माझ्या अंतःकरणांतले स्वर त्याच्या अंतःकरणांत उठलेले मला स्पष्ट ऐकूं दे." तिनें त्या पत्राचे तुकडे तुकडे केले. पुन्हां तिला स्वतःच्या भित्रेपणाची कींव आली. साऱ्या समाजाचा हलकल्लोळ सहन करायला तयार झालेली तूं! आणि नुसता स्पष्ट कबुलीजबाब विरागजवळ द्यायला तूं तयार नाहींस!

तिनें स्वतःचा धिक्कार केला. सारा दिवस मनाचीं आंदोलनें चाललीं होतीं. संध्याकाळ झाली. अंधाराचें दडपण पडून पुन्हां तीव्र असमाधानाचे सूर वाहूं लागले.

## २६

विरागला आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. अचला त्याच्या घरीं कधींच आली नव्हती. एकाकी पुरुषाच्या घरीं, म्हणून सावध-

गिरीनें न येणाऱ्या अचलेला तेथें आणण्यांत फार मोठ्या शक्तीची ओढ असली पाहिजे. तो चटकन् उठून म्हणाला, " या. "

" विराग, दार लावूं का हें ? "

" तुमचाच प्रश्न आहे तो. माझी हरकत नाहीं. " तिनें दार लावून घेतलें.

ती लपंडाव खेळली नाहीं. खेळायला तिला वेळ नव्हता.

" विराग, मला तुमच्याशीं पुष्कळ बोलायचं आहे. " ती त्याचा चेहरा निरखीत म्हणाली. त्याला कल्पना आली. तो निर्विकारपणें पहात होता. तिला राग आला.

" तुम्ही ढोंगी आहांत. "

" एवढंच सांगायचं होतें ? "

" मला तुमची भीति वाटते ! "

" आतां मात्र तुम्हीं मघांशीं माझ्यावर केलेला आरोप मला तुमच्यावर करावासा वाटतो. "

" होय. मी नाकबूल नाहीं करीत. आणि त्या ढोंगीपणाचं कवच फेंकून देण्यासाठींच मी येथें आलें आहें. "

" हरकत नाहीं. मग मीही लपंडाव खेळणार नाहीं. "

" विराग, मी विवाहित आहें. माझे नादान पती तुरुंगांत जिवंत आहेत. "

" हो. आणि ते सुटून तुमच्या दृष्टीपुढें वावरूं लागल्यावर तुमचं मन पुन्हां हेलकावे खाऊं लागेल. "

" विराग, तुम्हीं मला ओळखलं नाहीं. ते तुरुंगाबाहेर होते तेव्हांही—"

" पण त्यावेळीं ते नादान असले, तरी तुरुंगाबाहेर येतांना पश्चात्तापानें शुद्ध होऊन येतील. "

" पण त्यांच्यांत माणुसकी शिल्लक राहिलेली नसेल. ती त्यांना केव्हांच सोडून गेलेली होती. आणि इतक्या तिरस्कारानंतर मला त्यांच्याबरोबर राहण्याची कल्पनाही असह्य होते. आज दहा वर्षें जो संबंध तुटला आहे, आणि ज्या तऱ्हेनें तो तुटला आहे, त्यानंतर त्यांचे बाबतींत माझ्याकडून कोणी पत्नीधर्माची अपेक्षा करील तर ती चुकीची ठरेल. विराग, कल्पनेनेंच पत्नीत्वाचें नातें स्मरत रहावयाचें असेल, तर विधुरांनाही पुन्हां लग्न करायची गरज नाहीं. माझा भोंदू कल्पनांवर विश्वास नाहीं. "

" अचलाबाई, पण तुम्हीं दुसऱ्या पुरुषाशीं लग्न करूं शकणार नाहीं. तुम्हीं कितीही नको म्हटलंत, तरी लोक तुम्हांला विनायकरावांच्या पत्नी दुसऱ्याकडे रखेलीसारख्या राहतात, असंच म्हणणार. "

आपण तरवारीचा घाव घालीत आहों, ही कल्पना त्याला होती. पण सत्य लपवून, असत्याचें गोंडस स्वरूप तिला दाखविण्यांत अर्थ राहिला नव्हता. सत्य आहे तितकें, किंबहुना अधिक भडक

दाखवून, तिच्या मनाची शहानिशा करणें त्याला भाग होतें. अचला क्षणमात्र त्या शब्दाला दचकली. पण तिलाही तें कळलेलें होतें.

" एवढ्या समाजांत कोणा कोणाला सुद्धां माझ्या सारख्यांचीं दुःखं कळणार नाहींत का? अंतरंगांतही कोणी 'ही पापी नाहीं' असं म्हणणार नाहीं का?"

" असं कसं होईल? समाजाची घडी बायकांच्या अशा आचरणानें विस्कटेल, असं वाटून कित्येक अशा स्त्रीविरुद्ध काहूर करून सोडतील, तर कित्येक तें सत्य आपल्याशीं बोलायला धजावणार नाहींत. पण कांहींना मात्र उघडपणेंही तसें बोलायला हरकत वाटणार नाहीं."

" विराग, असाच कोणी माझें अंतरंग ओळखणारा भेटेल, त्याच्याकडे विश्वस्तपणें मी पाहीन."

" पण विश्वासाचे अंतिम परिणाम? त्याला तयार आहांत तुम्हीं?"

" साऱ्याला तयार आहें. विराग, एका दिवसांत क्षणभर उत्पन्न झालेल्या विकारांच्या भरांत हा निश्चय मी बोलत नाहीं. आज दहा वर्षे मनाशीं झगडा करूनही मला त्यांत कांहीं गैर दिसत नाहीं."

" मग काय? तुम्हाला पाऊल टाकायला हरकत नाहीं."

" पण कसें टाकणार?"

" तुम्हाला तुमच्या बरोबर जो माणुस येऊं शकेलसें वाटतें, त्याला तुम्हीं स्पष्ट विचारा."

तो तिच्याकडे भेदकपणें पाहूं लागला. ती जमिनीकडे पाहूं लागली. कांहीं वेळानें ती उठली.

" बरं जातें मी. "

" झालं बोलायचं इतक्यांत ? "

" मला बोलतां येत नाहीं. "

तो हंसून म्हणाला, " भित्र्या आहांत अजून. "

तिला कळलें, तरी ती निघून गेली.

## २७

फुलें परडींत झांकलीं, तरी त्यांचा सुगंध दरवळायचा थोडाच राहाणार ! पण याची अचलेला कल्पना नव्हती. गनीमी कावा काय तो जणूं तिलाच माहीत होता. विरागपासून तिनें स्वतःचें अंतरंग लपवूं पाहाणें, हें एकाद्या वस्त्रांत पाणी बांधून ठेवण्यासारखेंच होतें. विरागला तिचें मन उघड उघड कळत होतें, तिच्या मनाची धडपड पाहून त्याला वाईट वाटत होतें, तरीही तो कुतूहलानें पहात होता.

विराग वकील होता. कपटी अंतःकरणाचा कोनाकोपरा निर्दय-पणें उघडून दाखविण्याची तीव्र धार त्याच्यांत होती. तितकीच हळुवार जिवाला रक्षण देण्यांत स्वतःची पर्वा न करण्याइतकी असीम मृदु-ताही त्याच्या ठिकाणीं होती. ती मात्र हळुवार जीवांच्याच प्रत्ययाला येत असे.

विरागच्या आतांपर्यंतच्या आयुष्याचा पाढा त्यानें कुणापुढें वाचलाच नव्हता. कुणाकडून कींव करून घेणें ही त्याला मानहानि

वाटे. त्याचप्रमाणें आपल्या आयुष्याच्या लढ्याचा इतिहास आपणच सांगून शाबासकी मिळविण्याचीही त्याला हांव नव्हती. पण त्याच्या मैत्रीची ज्यांनीं अपेक्षा केली व ज्यांच्या मैत्रीची त्याला इच्छा झाली, त्यांना सहज शिताफीनें आपल्या अंतरंगाचा ठाव तो घेऊं देत असे. अचलेला आपलें अंतःकरण दाखवून देऊन तिचें कळवून घेण्याची त्याला इच्छा होती. बाहेरून ओलें लपेटलेलें वस्त्र आंतील जलाला स्पर्श न करतां त्याला थंडावा आणीत असतें. विराग अचलेच्या तप्त अंतःकरणाला असाच शांत करीत होता.

त्याला तिची मैत्री पाहिजे होती. ती आहे तशी त्याला पाहिजे होती. त्यांत तिला अथवा त्याला काय किंमत द्यावी लागेल हें त्याला कळत होतें. त्याच्यापेक्षां तिलाच किंमत अधिक द्यावी लागणार होती. म्हणून तिची मनाची पूर्ण तयारी झाल्याशिवाय तो पाऊलही पुढें जायला तयार नव्हता. आतांपर्यंतच्या आयुष्याच्या झगड्यांतच त्याची क्षात्रवृत्ति समाधान मानीत होती. त्याला त्या झगड्यांतच शेवटपर्यंत समाधान वाटलें असतें. त्यानें जगाची पर्वा केली नव्हती. तो स्वतःबद्दलही निष्ठुर असे.

लग्नसंस्था ही स्वार्थ आणि परार्थ यांसाठीं आहे. मर्यादितपणें दैहिक सुख भोगून वंशवर्धनानें समाजाची जोपासना करणें यांत स्वार्थ व परार्थ दोन्हींही आहेत. विवाहाचा हेतु तडीस न जातां उपचार विधींनींच विवाहसंस्था पोखरली असेल तर भुंग्यांनीं कोरलेल्या तुळईचे थोड्या वजनानें काडकन् तुटून तुकडे होतात, त्याप्रमाणेंच या संस्थेचे तुकडे झाल्याशिवाय राहणार नाहींत, ही त्याची खात्री होती.

लग्न झालें असून जीवन्मृत पतीच्या बंधनानें अचला तळमळत आहे, स्त्रीत्वाचें सार्थक करण्याची तिची उत्सुकता पराकोटीला गेली असून, ती समाजाच्या कृत्रिम फोल संकेतांविरुद्ध झगडत आहे, हें त्याला स्पष्ट दिसत होतें. अचला ही वृक्षाच्या आधारावरच जगणारी वेल नव्हती. तिच्यांत परावलंबिता मुळींच नव्हती. ती स्वतःच्या पायावर उभी होती. पतीनें टाकलेल्या नातेवाइकांच्या घरीं अन्नवस्त्रासाठीं केविलवाणें जिणें कंठणाऱ्या स्त्रियांतील अचला नव्हती. त्याचप्रमाणें स्वतःचें पोट स्वतःच्या बळावर भरणाऱ्या, पण मन मारून मेलें जिणें कंठणाऱ्या स्त्रियांपैकींही ती नव्हती. कृत्रिम मानवी संकेतांच्या अन्यायाविरुद्ध लपून छपून बंड न करितां तो अन्याय वेशीवर टांगून, उघडपणें न्यायासाठीं, स्वतःचें मोल देऊन, ती बंड करूं पहाते आहे हें त्याला कळत होतें. म्हणूनच ती त्याला आवडत होती. पिंजारी कापूस पिंजून त्यांतील सरकी व केर काढीत असतो. त्याप्रमाणें ती आपले विचार पुनः पुन्हां पिंजून पाही. ते निर्मळ होईपर्यंत ती वाट पहात होती. दारू पिऊन दारुड्याची तृप्ति न झाल्यानें तो धुंद मनानें वाटेल तितकी दारू पोटांत ढकलीत असतो, तशी न शमणाऱ्या वासनांची धुंद लाचार अवस्था तिची नव्हती, हें त्याला कळत होतें. रोपाला स्वतःच्या वाढीसाठीं जमिनींतून पाणी शोषण्याची जितकी न्याय्य आकांक्षा असते, तशीच तिच्या स्त्रीत्वाच्या पूर्ण विकासासाठीं तिला वैवाहिक आयुष्याची न्याय्य गरज होती, असेंच त्याला वाटत होतें.

## २८

**विराग,**

मी भित्री नाहीं. समाजाला भीत नाहीं. तुमच्या ढोंगीपणाला भितें. तुमच्या अंतरंगांत उठणारे उमाळे मला दिसतात, पण तुमचा तो वरपांगी निर्विकारपणा मला साशंक करतो.

‘ जो माणूस माझ्या बरोबर येईलसें वाटेल त्याला स्पष्ट विचारा. ’ तुम्हींच असें म्हणालांत ना ? विराग, मी तुम्हांलाच विचारतें. लिहितां लिहितां ती थांबली. “ पुरे झालं. भावनांचं कमींत कमी प्रदर्शन करणंच बरं. ” तिनें पत्राखालीं “ अचला ” म्हणून सही केली. पत्र पोस्टांत टाकलें. तिला समाधान वाटलें. “ भावनांना विवेकाचें लोखंडी कवच घालावें लागतें. भावनांचा क्षोभ दिसूं देण्यांत अर्थ नाहीं. ” तरीही तिला घाई झाली होती. तें पत्र म्हणजे समोरासमोर घाव होता. उलट तितक्याच तीव्र घावालाही ती तयार होती.

विरागच्या हातीं तें पत्र पडलें. अपरात्रीं अकल्पितपणें कोणी दारावर टिचकी मारावी. दार उघडायला जाणारा मनुष्य बाहेरच्या माणसाची कल्पना असली, तरी कांहींसा सावधगिरीनेंच दार उघडतो. विरागला तें पत्र वाचून आश्चर्य वाटलें नाहीं. तें केव्हांतरी होणार होतेंच. पण ती वेळ आतांच आली आहे, अशी त्याची खात्री नव्हती; म्हणून तो सावधगिरीनें पाऊल टाकूं लागला.

त्यानें पत्र एकदां–दोनदां–तिनदां वाचलें. केवळ आपल्यावरील प्रेमाचें पुनःपुन्हां पारायण करण्यासाठीं नव्हे तर तिच्या शब्दाशब्दांतून तिची शक्ति अजमाविण्यासाठीं. " नाहीं. अजून मनाची पूर्ण तयारी दिसत नाहीं. " विवाहित स्त्रीनें उघडपणें दुसऱ्याला पती म्हणून अंगिकारणें हें समाजावर उपसलेलें अस्त्रच होतें. त्याला भीति वाटत होती, पण ती स्वतःची नव्हे अचलेची. तिनें समाजावर सोडलेलें अस्त्र उरफाटून तिच्याच मनावर त्याचा घाव बसण्याचा संभव त्याला दिसत होता.

अचलेचा पती बंधमुक्त होऊन तिच्या छळणुकीसाठीं तिच्या जवळपासच वावरूं लागला तर तिच्या मनाची मजजवळ राहण्याची खंबीरता कितपत राहील ? अचला समाजाला कांहीं काळ धुडकावून देईल पण तिच्यावर " पापी " म्हणून शिक्का मारल्यानंतर समाजानें टाकलेला कायमचा बहिष्कार तिच्या मनाला कितपत सहन करतां येईल ? त्याला तिची भीति वाटत होती. आज ती सांसारिक जीवना-करितां तळमळेल, उद्यां तिला सामाजिक जीवनाकरितां, तिची इच्छा नसतांना तळमळ उत्पन्न झाली तर ? तिच्या या धाडसानें तिच्या अपत्यालाही समाजाचा बहिष्कार सोसावा लागेल. तिच्यासाठीं नाहीं, तरी मुलांसाठीं तिला केल्या गोष्टींचा पश्चात्ताप वाटला तर ?

त्याला समाजाची भीति वाटत नव्हती. पुरुषाला दर्जा, मान-मरातब असल्यावर उघडपणें वेश्या घरीं ठेऊनही कांहीं बाध येऊं शकत नाहीं. पण विवाहित स्त्रीवर खरा खुरा अन्याय होत असूनही तिला जवळ करणारा पुरुष समाजाच्या दृष्टीनें अधिक दोषी ठरेल, हें त्याला कळत होतें. त्याच्या विवेकाला जें पटलें, त्या बाबतींत त्यानें

समाजाची पर्वा केलीच नसती. त्या समाजांत तो मैत्रीची गांठ मारण्यासाठीं कधींच कोणाकडे गेला नाहीं. दुसऱ्यांनीं त्याच्याकडे येऊन स्वतःच त्याच्या मैत्रीचें बंधन लादून घेतलें. त्याच्या व्यवहाराला कोठें बाध आला नसता. त्याची वकीली जशी चालावयाची तशीच चालली असती. कारण तेथें लोक तुमचें खाजगी जीवन न पहातां बुद्धीचा उपयोग पहात असतात. त्याला ती "बाररूम", तेथील नीतिमान म्हटले जाणारे अनेक लोक, त्यांच्या नीतीच्या कल्पना, सारें माहीत होतें. त्या लोकांनीं न्याय्य गोष्टींना निंद्य ठरविल्यास त्यानें कां पर्वा करावी. त्याच्या मनाची तयारी होती. तो सावधगिरीनें पाऊल टाकीत होता, तें अचलेसाठीं.

एक-दोन-तीन-चार दिवस गेले. आठ दिवस गेले. तो तिला भेटला नाहीं. तिच्या पत्राचें उत्तर त्यानें पाठविलें नाहीं. अचलेला अस्वस्थ करून टाकणारी संध्याकाळ आली. ती तडक विरागकडे गेली. पण त्याला पहातांच सारें धैर्य मालवलें. तिला त्याच्याकडे बघवेना. आठ दिवसांतील सारा कोलाहल अश्रुरूपानें ओघळूं लागणार अशी तिला भीति वाटली. "नाहीं. हें शक्य नाहीं. सांगून टाकतें मी त्यांना."

"अचल!" त्याचा एकच शब्द! त्यानें अचलेच्या हृदयाचा बंधारा फुटला. तीच जाग्यावरून उठली. तिनें विरागचे दोन्ही हात घट्ट धरून म्हटलें, "विराग, काय? बोलून टाका. मी पापी आहें,

असेंच म्हणावयाचें आहे ना तुम्हांला?" त्या बोलामागें आठ दिवसांच्या दुःखाचे कढ त्याला दिसत होते.

"मी असंच बोलणार, अशीच तुझी खात्री आहे? तर मग माणूस पारखूनही पत्र पाठविण्याचा वेडेपणा करायला नको होता, नाहीं का?" तीच ती त्याची मृदुभावही कठीण शब्दांत बोलण्याची पद्धत.

"विराग, मला नाहीं तसं वाटत."

"अचल!" कधींही न पाहिलेली मृदुता त्याच्या डोळ्यांत तिला दिसली. त्यानें तिला जवळ ओढून घेतली. शब्द निमून गेले. अंतःकरणाला अंतःकरणाची साक्ष पटली. ती हळूच म्हणाली,

"माझ्या स्वार्थासाठीं तुमच्या आकांक्षांची होळी करतें आहें मी."

"हा माझा निःस्वार्थ आहे? वेडे, स्वार्थ कोणाला सुटला नाहीं. मी सुद्धां याच दिवसाची वाट पहात होतों."

## २९

मनुष्यस्वभाव हा अतर्क्य आहे खरा! ज्या अन्यायी जगाकडे पाठ फिरवून अचला बसली होती. त्या जगाचे प्रलाप ऐकण्यासाठीं तिचे कान तीक्ष्ण होऊन राहिले होते. नित्य नवी पालवी फुटत असलेल्या लोकापवादानें जगांतील प्रत्येक व्यक्तीला तिचें न्यायाधीश बनविलें होतें–अगदीं लहान पोरापासून थोरापर्यंत. खरें म्हणजे हा अनाहूत निर्णय देण्याचा त्यांना काय अधिकार? पण मनुष्याला वाचा व जिव्हा देण्यांत, विश्वनिर्मात्यानें राक्षसी सामर्थ्याची ठेव मनुष्याला

दिली आहे. जिव्हेला, मऊ मासाच्या त्या एवढ्याशा गोळ्याला, तीक्ष्ण धारेच्या तलवारीहूनही अधिक तीक्ष्णता आहे. लहानपणीं बोबड्या बोलांच्या रूपानें हळुवार अडाणी घाव करीत असणारी ती जीभ पुढें सराइतासारखे मर्मी घाव घालूं लागते. ती आपलें भक्षच शोधीत असते. तिच्या आटोक्यांत येणाऱ्या, प्रत्येक बऱ्या वाईट गोष्टीवर, तिचा प्रभाव उमटलेला असतोच. मग अचला बोलून चालून जगाहून वेगळी होऊं पहाणारी. जगाहून वेगळ्या मार्गाची सत्यता पटवणारी, व उघड बोलून दाखविणारी अचला, तिच्यावर सहस्र जिव्हांनीं भडीमार केल्यास नवल कोणतें ? पण महापुरानें गंगा दुथडी वाहूं लागल्यावर त्या पात्रांत खांचखळगेच काय पण मोठमोठ्या दऱ्याही अदृश्य होतात. एकच एक धीर गंभीर प्रशांत प्रवाह काय तो दिसत असतो. अचलेच्या हृदयांतील तुफान भावनांच्या पुरांत सर्व कांहीं अदृश्य होत होतें.

## ३०

विराग आणि अचला ! आयुष्याचा खडतर मार्ग चालून आलेले, थकले भागलेले दोन जीव, प्रेमळ जीवनाच्या पाणपोईशीं श्रमपरिहार करूं लागले. साऱ्या सचेतन सृष्टीला कांहीं तरी ‘ ओढ ’ लागलेली आहे. त्या ओढीलाच कोणी ‘ प्रेम ’ म्हणतील. पण कोणत्याही अर्थाचें, कोणत्याही स्वरूपाचें प्रेम जगांतून काढून टाका, मनुष्याची कर्तृत्वशक्ति अर्धांगवायूनें पछाडल्यासारखी लुळी होऊन पडेल. प्रेमच नाहीं, तेथें करण्याजोगें तरी काय ? आणि करावयाचें तरी कोणासाठीं ?

आबालवृद्धांना एकमेकांजवळ आणून हातांत हात घालायला लावणारी, अखिल सृष्टींतील विलग असणाऱ्या चलाचलांना एकत्र गुंफूं पहाणारी ही प्रेमरज्जू काढून घ्या, सारें वस्तुजात विस्कटलेल्या एकसराप्रमाणें विशोभित, निष्प्रभ होऊन पडेल. प्रेम ही अशीच भावना आहे, कीं ती कोमल खरी, पण मनुष्याच्या साऱ्या शक्तींची शक्ति आहे. ती भावना दडपूं पहाल, तर इतर साऱ्या शक्ति दबून नाहींशा होतील. ती भावना जसजशी अंकुरित होऊन बहरेल, तशा साऱ्या शक्तीही खडबडून जाग्या होतील. मनुष्याच्या सगळ्या कर्तृत्वशक्तींचें उन्मीलन अगर मरण या भावनेच्या उन्मीलनावर अगर मृत्यूवर अवलंबून आहे. ही दिव्य ज्योत अंतःकरणांत तेजाळत असतां ज्यांनीं ज्यांनीं ती अकालीं विझवायचा प्रयत्न केला आहे, त्यांचीं शरीरें आणि मनें या धुमसणाऱ्या ज्योतीनें पोखरून दुर्बल केल्याविना सोडलीं नाहींत. त्यांचें मनुष्यत्व करपून खुरटून गेलेलें आहे.

तरूण तरुणींचें प्रेम! तो तारुण्यांतील एक उन्माद आहे असें कोणी म्हणेल! पण त्यांत केवढी अद्‌भूत शक्ति भरलेली आहे. अखिल मानवजातीचें अनंत चक्र अव्याहत चालविण्याचें सामर्थ्य त्या प्रेमांत आहे. समाजाची धारणा याच अव्यक्त, दिव्य, नाजुक व बळकट पाशामध्यें आहे.

अत्यंत कठोर वज्रदेही मनुष्यसुद्धां त्या शक्तीनें ओढला जाऊन स्तिमित होऊन रहातो. पुष्पकेसराहून कोवळ्या अशा प्रेमरज्जूनें बद्ध झालेले जीव एकमेकांकडे ओढले जात असतांना सारें जग क्षणमात्र

विसरतात. सर्व आत्मत्याग त्या दुसऱ्या मूर्तीच्या पायाशीं करावासें वाटूं लागतें. अशी काय मोहनी त्या प्रेमांत आहे कोण जाणे, कीं सारें जग उसळून आलें, तरी त्या अबलेच्या प्रेमळ शब्दांत त्या पुरुषाला जगाशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य मिळावें आणि स्त्रीला सर्वस्व लाभल्याचा आनंद व्हावा !

जेथें प्रेमानें हळुवार झालेलें एक अंतःकरण दुसऱ्या हळुवार अंतःकरणाचा आसरा घेत असतें, तेथें कोण वृक्ष आणि कोण लता ? प्रेमानें भारलेल्या दोन व्यक्ति–त्यांत कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ठ ? प्रेम दोघांना भारतें, दोघें एकमेकांचीं धनी. दोघें एकमेकांचीं दास. अहंकाराच्या कोषांत गुरफटलेला जीवसुद्धां अंगाभोंवतींचा कोष फोडून स्वतःचा दुसऱ्यांत लय करूं पहातो.

जीवाभावाच्या व्यक्तीच्या सान्निध्यांत 'सूर्योदय अथवा सूर्यास्त ज्यांनीं पाहिला असेल, डोंगरमाथा नाहीं तर गिरीकंदरांत ज्यांनीं घटका घालविल्या असतील, पौर्णिमेच्या चंद्राकडे पाहून सागराला येणारें भरतें ज्यांनीं पाहिलें असेल, नितांत मधुर गाणें ज्यांनीं ऐकलें असेल, त्यांना अंतःकरणाची पाकळी न् पाकळी उमलवणाऱ्या या प्रेमाची जादू कळेल. अखिल जगाच्या कोलाहलांत कधीं न ऐकूं येणारें, पण प्रत्येक वस्तुजातांत निनादून राहिलेलें नितांत रम्य संगीत जर केव्हां ऐकूं येत असेल, तर गंभीर, शांत, कोमल, दिव्य अशा प्रेमानें भारलेल्या वातावरणांतच.

लुकलुकणाऱ्या ताऱ्यांत, डोलणाऱ्या वनराईत, झुळझुळणाऱ्या

निर्झरांतच नव्हे, तर निस्तब्ध खडकांतही दुमदुमणारें संगीत ऐकूं येतें, तें केवळ जिवाभावाच्या सान्निध्यांतच. कोणत्या तरी दैवी शक्तीनें निर्माण झालेल्या अखिल वस्तुजातांतील सत्, चित्, आणि आनंद पाहायला व उपभोगायला प्रेमानें भारलेला जीवच समर्थ ठरतो. सारीं इंद्रियें मोहरून जातात. हृदयाचा प्रत्येक ठोका, नसांनसांतून धांवणारा प्रत्येक रक्तबिंदु जणुं "त्याग" "त्याग" "त्याग" असें बोलूं लागतो.

विराग आणि अचला याच त्यागाला उत्सुक होतीं.

मधमाशांचें पोवळेंच त्यांनीं उठविलें होतें. त्या मधमाशा ज्या तेथून उठल्या, त्या दोघांच्याच नव्हे, तर जें जें कोणी त्यांना वाटेंत भेटेल त्यांना कडकडून डसूं लागल्या. स्त्रिया, स्त्री-शिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, इंग्रजी शिक्षण, पाश्चिमात्य संस्कृति, साऱ्यांना त्यांनीं डांस घेतले. सभा भरल्या, जाहीर निषेध झाले, वर्तमानपत्रांचे रकाने भरले. कित्येक कंपॉझिटर्स, कित्येक प्रुफें तपासणारे, कित्येक संपादक, कित्येक धर्म-पालक, संस्कृतिरक्षक, या सर्वांना कांहीं महिन्यांचें काम मिळालें !

परकीयांच्या सत्तेपुढें निस्तेजपणें नमतांना ज्यांचीं अंतःकरणें थरारलीं नाहींत, चमकलीं नाहींत ते अन्यायाविरुद्ध बंड करणाऱ्या अचला–विरागापुढें तेजाचे लोळ पसरवूं लागले.

पण सारा समाज नेहमीं असा असतो थोडाच. उदयोन्मुख नवी पिढी थोड्याफार प्रमाणांत बंडखोर असते. कित्येक तरुण तारुण्याच्या

उन्मादांत सहजासहजीं चेष्टेनें अचला–विरागबद्दल वाटेल तें बोलले, तरी त्या बोलण्यांत जीव नव्हता. कित्येक तर त्या दोघांच्या वागणुकीचें समर्थनही करूं लागले; पण केव्हां ? सारा आश्चर्याचा भर ओसरल्यावर. क्रिया–प्रतिक्रिया ही लढत नेहमींचीच चाललेली असते. एकमुखानें साऱ्यांनीं अचला—विरागची निंदा केली. आणि प्रतिक्रियेला सुरुवात होऊन कित्येक मोकळ्या मनाचीं माणसें त्या दोघांच्या धैर्याची तारीफही करूं लागलीं. पण अशीं माणसें फार थोडीं. नाहीं तरी शंकाकृति समाजाच्या निमुळत्या शिरांवर बसून, समाजाचें निरीक्षण करणारीं माणसें नेहमींच थोडीं असतात. आणि तें निमुळतें शीरच कधीं कधीं त्यांचा शूळ होतें. त्यांना कराव्या लागणाऱ्या आत्मत्यागानंतरच पायाखालचा मोठा समाज जागा होऊं पहातो.

अचलेनें विरागबरोबर रहाण्यापूर्वीच शाळेचा राजिनामा दिला. ती घराच्या सावलींत होती. विराग मात्र दृष्टींचे भाले आणि जिव्हांच्या परजलेल्या तलवारी, उघड्या मैदानांत अंगावर घेत होता. पण त्याची प्रकृतीच पोलादी कवच घातल्यासारखी होती. तो साऱ्या निंदेबाबत उदासीन होता.

भुंकणारीं कुत्रीं तुम्हीं भित्रेपणानें पळालां, कीं अधिक पाठीस लागतील. तुम्ही धिम्मेपणानें, निर्भयपणानें जा, तीं जागच्या जागीं थबकतील. समाजाचेंहि कांहींसें असेंच आहे. तुम्हीं त्याची फिकीर करतां असें वाटलें, कीं त्याचें तुम्हीं भक्ष होऊन बसतां. मग तो उंदरामांजराचाच खेळ! पण तुम्हीं बेफिकीर व्हा, समाजांतील कोणी

तुम्हांला “ निर्लज्ज ” म्हणेल, कोणी “ धीराचे ” म्हणेल आणि गप्प बसेल. अचला विरागची बेफिकीरी अशाच निरनिराळ्या दृष्टींनीं लोकांनीं पाहिली.

## ३१

एकमेकांसाठीं त्याग करणारीं अचला व विराग. पण तिला कोणत्या संदेहानें ग्रासलें होतें कोण जाणे ! भावनांच्या आत्यंतिक परिसीमेला जाऊन देहाची कुरवंडी करून टाकणाऱ्या अचलेला वाटे, “ छेः माझा त्याग कसला ! विरागचा त्याग खरा मोठा ! त्याच्या जीवितांत कांटे पसरविणारी मी. माझा त्याग कांहींच नाहीं. ती त्याच्याकडे पहात राहिली. या थोर पुरुषाचा माझ्या सुखासाठीं मी नाश केला. उंच उंच भरारी घेणाऱ्या गरुडाचे पंख मी कापून टाकले. ”

कित्येक वेळां ती गहिंवरून विरागला विचारी, “ विराग, घरच्या निर्भय तटबंदींत स्वतःचा मनोदेह वांचवूं पहाणारी, जगाचे आघात तुम्हांला एकट्याला, उघड्या मैदानावर, सोसायला लावणारी मी कृतघ्न आणि स्वार्थी आहें नाहीं ? ”

“ तूं मला अजून ओळखलं नाहींस, अचल. ”

“ विराग, तुम्हाला ओळखलं आणि तुमच्या त्यागाचं फळ आपस्वार्थीपणानें लुटायला लागलें. ”

“ तुझ्यापेक्षां मी भयंकर स्वार्थी आहें. जी गोष्ट माझ्या आयुष्यांत कधीं मिळेल, अशी मला आशा नव्हती, ती हाताशीं येतांच तिचा अपहार करणारा मी किती स्वार्थी आहें पहा ! ”

विराग अचलेचें जसजसें अधिकाधिक समाधान करी, तसतसा तिला त्याच्या मोठेपणाबद्दल अधिकाधिक आदर वाटूं लागला. आपल्या नैकृष्टयानें ती अधिकाधिक उदासीन होई. तिला विरागचें अनहित केल्याची बोंचणी अधिक दुःसह होई. थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्यासाठीं गरीबाला उबदार पण भारी कपडा मिळाला, तर अंगावर घेतांच तो चुरेल, मळेल अशी त्याला भीति वाटूं लागते. तो दूर ठेवून कुडकुडत त्याच्याकडे पहात बसण्यांतच त्याला अधिक समाधान वाटतें! त्याला कोण काय करणार! 'विरागची मायेची दुशाल पांघरायला मी अयोग्य आहें' असें तिचें तिलाच वाटत होतें.

विरागच्या बुद्धीची तीव्रता, भावनांची खोली, त्याचें मनःसामर्थ्य तिला दिपवून टाकी. नानातऱ्हांनीं लोक त्याचा कसा उपमर्द करीत असतील, याची भेसूर कल्पना तिच्या डोळ्यांपुढें सतत वावरत असे; पण त्याचा नेहमींसारखाच शांत, गंभीर चेहरा, त्याचें अभंग मन पाहून ती थक्क होई. माझ्यासाठीं हा आपलें असमाधान दडवून टाकीत आहे, असें अचलेला वाटे.

कष्टानें असाध्य तें साध्य करून त्यांतच सुख मानणाऱ्या विरागला समाजाची भीति वाटत नव्हती. त्या त्या क्षणापुरता तो अस्वस्थ होई. पण त्याला कोणत्याही तऱ्हेनें पश्चात्ताप होत नव्हता. समाजाच्या औदार्याचीही त्याला कल्पना होती. नेहमीं समतोलपणानें आयुष्य घालवून, तात्पुरतें समाजाला न पटणारें पाऊल तुम्हीं टाकलें, तर समाज खवळतो; पण लगेच विचारही करतो, कीं हा मनुष्य सगळा

चांगला आहे; मग यानें हीच गोष्ट अशी कां केली! तसें करण्यांतही कांहीं शहाणपण असेल.

समाज जो मार्ग आक्रमीत आला आहे, त्या मार्गाचा रोख कुठें आहे, उदयोन्मुख पिढीची विचारांची मजल कुठें आहे, हें त्याला कळत होतें. समाजाच्या रोपाला कारण होणारी एखादी विचारवंताची कृति, कालांतरानें समाजाच्या आदरालाच कशी पात्र होते, हें त्यानें पाहिलें होतें. अचलेसारख्या सधवा पण वस्तुतः विधवा असणाऱ्या स्त्रीबद्दल समाजाला अनुकंपा असते. पण अनुकंपेनंतर काय करावयाचें हा विचार करायला समाजाला वेळ लागतो. त्यांत पुढाकार कोणीतरी घ्यावा लागतो. अशा मनुष्यावर समाज उलटला तरी लवकरच झाल्या अन्यायाची जाणीव त्यालाही होते. व तोही त्याची भरपाई करायला तयार होतो. हा इतिहास त्याच्या डोळ्यांपुढं स्पष्टपणें उभा होता. अचलेला समाजांत मानाचें स्थान नाहीं, मुलांनाही कदाचित् मिळणार नाहीं, हें त्याला दिसत होतें. त्यानें आपली सारी संपत्ति त्यांना देऊन टाकली होती. धनाची जादू त्याला माहीत होती. समाजाची मान्यताही धनावर अवलंबून आहे. अचला–विरागनीं नानातऱ्हांनीं या गोष्टींचा खल केला होता. तिला त्यानें सगळ्या अडचणी, त्यांतून निघणारे मार्ग समजावून दिले होते. आणि मगच त्यानें तिचा कृतनिश्चय पाहून पाऊल उचललें होतें. पण अचला! कित्येक माणसांना आपली आपणच सतत शिकार करण्याची संवय असते. अचला नेहमींच स्वतःकडे कठोरपणें पाही.

एकादे दिवशीं केविलवाणी होऊन ती विरागला म्हणे, "तुम्हांला माझा तिरस्कार नाहींना वाटणार पुढें मागें?" "तुमचा आश्रय घेण्यांत मी विकारवश तर नाहीं ना वाटत?" "मी एकाशीं अविश्वासू होऊन तुमच्याकडे धांव घेतली, आणि तुमच्याशीं तशाच अविश्वासानें वागेन असं नाहीं ना तुम्हांला वाटत?"

तिच्याच शंका! तिच्याच मनाचीं भूतें! तीं तिला सळो कीं पळो करीत! विराग तिला उत्तर देत नसे. त्याच्या हृदयांतील ठोके तिच्या कानांत सांगत, "ऐक ऐक. तूं माझा प्राण आहेस. पटली खात्री?" तिचा तळमळणारा जीव शांत होई. त्या संदेहांत ती स्वतःला किती दूषणें लावून घेई.

तो म्हणे, "तूं केलंस हें पाप का वाटतं तुला?"

"मुळींच नाहीं."

"मग? अविचार वाटतो?"

"नाहीं. गैर नाहीं. अविचार नाहीं. पण–पण"

त्या "पण" चें पृथक्करण तिचें तिलाही झालें नव्हतें.

तशा आंदोलनांतही सुखाचे क्षण दुःखापेक्षां अधिक होते. कारण तें दोघांचेंच विश्व होतें. दोघें एकमेकांना भारून टाकीत. एकमेकांच्या सान्निध्यांत दुःखाचा विचारसुद्धां रिकाम्या मनाला कधीं कधीं विसांवाच देई.

शाश्वत सुख आणि समाधान! हीं कोणाला जगांत लाभलीं असतील का? अखिल मानवजात त्या सुखासाठीं धडपड धडपड

करीत असते. पण कालाचें चक्र अव्याहत फिरत असतें. कशासाठीं कोण जाणे! पण अनादि अनंत निर्हेतुकपणें फिरणाऱ्या त्या कालचक्रांत मानव जात धांवत धडपडत असते! पण छेः किती धांवा, त्यांत सुधारणा नाहीं. तेंच असुख! तेंच असमाधान! विवेकानें गोष्टी करा. भावना जळत राहतात. भावनांनीं पाऊल उचला. विवेकाची टोंचणी लागते. आणि भावना आणि विवेक समतोल अगदीं एका पातळींत राहूंच शकत नाहीं. भावना आणि विवेक निरनिराळीं होऊंच शकत नाहींत. भावना, विवेकांचीं पारडीं बांधलेला ताजवा तोलतां तोलतां माणसाचा सारा जन्म निघून जातो. पण आयुष्याचें माप बरोबर पदरांत पडत नाहीं.

असमाधानी मनुष्य समाधानासाठीं पाऊल टाकतो तें नेमकें असमाधानाच्याच मार्गावर पडतें कीं काय? जें हातीं लागलें तेंही मायानगरींतील प्रसादासारखेंच मायावी ठरतें. मग वाटतें, कीं एकादी गोष्ट हवी असून मिळत नाहीं तेव्हां त्या अलाभांतच खरें सुख असतें. लाभ, लाभ आणि पूर्णता?—छेः कधींच नाहीं. डोंबाघरचा फुटका रांजणच तो! ही असमाधानाची भेग इतकी खोल खोल आहे कीं कसलीही भर त्यांत टाका, ती कधीं भरून यावयाची नाहीं. म्हणूनच श्रमलेले तत्त्वज्ञानी सांगतात कीं, "निरासक्त व्हा. ही आसक्ति नको. आणि असमाधानही नको." पण मातेच्या कुशींतून "सोहम् सोहम्" म्हणून गर्जना करून आत्मप्रतिष्ठेसाठीं धडपडत बाहेर पडणाऱ्या जीवाला "निरासक्त हो" म्हणणें, हें वाऱ्याला "वाहूं नको" म्हणून

सांगण्यासारखेंच आहे. सृष्टीची चिरंतनताच मुळी आसक्तीनें आपल्या मुठींत दाबून ठेवली आहे. तेथें सृष्टींतील कःपदार्थ प्राणी त्या मुठींतून निरासक्त होऊन बाहेर कुठें आणि कसा पडणार? मग काय? मग हेंच खरें, कीं जीवित हा लढा आहे. तो काढून टाका कीं जीवितच नाहीं. निराशेचें, असमाधानाचें, संकटाचें जंगल तुडवीत तुडवीत, दूरवर, क्षितिजावर दिसणारी आशेची, असमाधानाची ज्योत कवळावयाला जायचें हेंच जीवित. जवळ जवळ म्हणून तुम्हीं जितके तिच्याकडे धांवाल, तितकें तें क्षितिज आणि ती ज्योत दूर दूर सरकते. तुमच्यांतील आणि तिच्यांतील तें अंतर भूमंडळ तुडवूनही तुटायचें नाहीं. मग? हलत्या डुलत्या सजीव सृष्टीनें थबकून रहायचें? नाहीं. त्या थबकण्यांत तर भयंकर असमाधान आहे! आयुष्याच्या ससेहोलपटींतच अधिक समाधान आहे.

## ३२

सर्व जगाकडे पाठ फिरवून अचला बसली होती. ती आणि विराग, दोघांचेंच विश्व. पण त्या विश्वांत तिच्या जीवनलतेनें जीवन-कलिका धारण केली. त्या कलिकेचा प्रतिदिनीं कानोसा घेत असतां, ती आंवतींभोंवतींचा सारा कोलाहल विसरून गेली. सारें वातावरण स्तिमित झालें. एक-दोन, नव्हे, प्रति क्षणीं अंतर्मुख होऊन तीक्ष्ण दृष्टीनें ती पहात होती. हातांच्या ओंजळींत धरलेलें चिमणें पांखरूं बाहेर उडून जाण्यासाठीं फडफडूं लागतें, तसाच तो चिमणा जीव फडफडूं लागला. त्या फडफडण्यानें अचलेला भीतीचा धक्का बसला.

## हिंदोळ्यावर

" कां ही फडफड ? " ती अधीरपणें ऐकूं लागली. पुन्हां तो जीव फडफडूं लागला. तिचें हृदय कातर झालें.

सुंभाला पीळ भरण्यापूर्वी काथ्याचा दोरान्‌दोरा कुटून, पिसून घ्यावा लागतो. समाजाविरुद्ध कृति करीत असतांना विचारांविकारांना पिसून, पिंजून तिनें घेतलें होतें. पण सत्याची कल्पना निराळी आणि प्रत्यक्ष सत्य निराळें. त्या सत्याचें स्पंदन तिला ऐकूं येऊं लागलें, तसतशी ती कावरी बावरी होऊं लागली.

आपले विकार, आपल्या इच्छा, आपले विचार, यांचें फळ निर्जीव नाहीं. सजीव आहे. आईच्या हृदयाच्या ठोक्याशीं सुताल ठोका न देतां तो चिमणा जीव बेताल फिरत आहेसें तिला वाटूं लागलें. साऱ्या समाजाची भीति फुंकरून टाकणाऱ्या अचलेला त्या इवल्याशा जीवानें भेदरवून टाकलें.

तिला वाटलें, त्या चिमण्या जीवासाठीं विरागापासून दूर दूर पळून जावें. पण ती जितकी दूर जाई, तितकाच तो अधिक थैमान करी. विराग जवळ बसली असतां, विरागचा तिटकारा करून तो जीव त्याच्याकडे पाठ फिरवीत आहेसें तिला वाटे! त्या क्षणीं तिला विरागचा तिटकारा येई. दिवसा दिवसांत ती त्याच्याशीं अक्षर बोलत नसे. एखादेवेळीं विरागच्या अंतरंगांत उठलेले मुके कढ पाहून त्याच्याच गळीं पडून ती स्फुंदून रडूं लागे. " विराग, माझाच सारा दोष. "

" विराग, विराग, काय करूं! कालवाकालव होते. "

तो काय उत्तर देणार! त्याचा चेहराच असा होता कीं अत्यंत मृदु भावना त्याच्या चेहऱ्यावर दिसूंच नये. तो दीर्घ श्वास टाकी. तिच्या तप्त अंतःकरणाला शांत व्हायला वाचा तरी होती. त्याचें अंतःकरण आंतल्या आंत करपत होतें "तिची तळमळ शांत कशी करूं? काय देऊं?"

बाबा, माणिक घरच्या सर्वांचे बंध तिनें विरागसाठीं तोडले होते. समाजाला झिटकारून ती विरागच्या छायेला राहिली होती. ती छायाच तिला तप्त करूं लागली. आतां कुठें जाणार? तिच्या तप्त अंतःकरणाची धग त्या कोमल सत्वाला लागे. तें गरगर फिरूं लागे. ती थरकून जाई. "काय! आई होण्याच्या जबरदस्त इच्छेनें या जीवाची इच्छा नसतां मी त्याला जन्म देतें आहें काय? तो अधिक अधिक गरगर फिरे. तिला त्याचे मुके बोल ऐकूं येत. "आई, आई, मी कोण? कुणाचा? माझें जगांत स्थान?"

ती विव्हल होई. "पोरक्या पोरासारखं मानहानीचं जिणं मी चांडाळीण तुला देणार! माझ्या बेफाम वृत्तींना तुझा बळी द्यायला लावणार!" जन्मापूर्वीच दुःखाच्या खाईंत पडलेल्या त्या पोटांतील गोळ्याची तगमग बघून तिला वेदना होत.

तिच्या पुढें भेसूर चित्रें दिसत. "मुलगा कीं मुलगी?"

मुलगी? तिच्या पोटांत धस्स होई. तिच्या उभ्या आयुष्याचें सुख होरपळून टाकणारी ही आई! तिला ते भीषण देखावे दिसत...सारे लोक हेटाळणी करीत आहेत. आणि हा केविलवाणा जीव हताशपणें मृत्यूची

वाट पहात आहे. “ आई, आई ” म्हणून कानाला गोड लागणारी हांक ऐकूं यावयाच्या ऐवजीं, तिरस्कारानें दूर दूर पळणारें, वणवण हिंडणारें, तिचें पोरकें अर्भक तिला दिसूं लागे. समाज व्याधासारखा त्या पाडसाच्या मागें लागलेला तिला दिसे. रक्तबंबाळ झालेलें तें पाडस, आसऱ्याविना, मायेच्या पांखरेविना, मृत्यूच्या दाढेंत शिरलेलें तिला दिसे ! विचार ! विचार ! विचार ! त्यानें थकलेला मेंदू निश्चेतन होई. त्या भेसूर स्वप्नांतून ती किंचाळून जागी होई.

विराग सारें पहात होता. त्याची बुद्धि कुंठित झाली होती. तिची समजूत घालण्यांत अर्थ नव्हता. तिला पाहिजे तें तो तिला करूं देत होता. तिला त्याचा तिरस्कार येई. तो तिच्या पासून दूर जाई. ती स्वतःला एकटी कोंडून घेई. स्वस्थ शांत पडून राही. तो कोंवळा जीव झोंपीं जाई. अचलेला त्या जीवाचा विसर पडे. स्वतःची शुद्ध येई “ विराग, किती दुःख देतें आहें मी तुम्हाला ? किती छळ चालविला आहे मी तुमचा ! मीच तुमचा आसरा घेतला. तो मीच कृतघ्नपणें उध्वस्त करूं पहात आहें. ” तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळूं लागत. तें चिमणें पांखरूं भिरी भिरी हिंडूं लागे. आईच्या दुःखाचा शोध करायला पाही. ती स्तिमित होई. त्या मुग्ध जीवाचें स्पंदन ऐकूं लागे. एकदां विरागची कींव, एकदां त्याची कींव ! स्वतःची कींव तिला येतच नव्हती.

अशाच हिंदोळ्यावर झोंके घेतां घेतां भोंवडून ती निस्तब्ध पडली होती. विराग अनिमिष नेत्रांनीं तिच्याकडे पहात होता. त्या

कृश शरीराकडे पाहून त्याच्या डोळ्याला पाणी आलें. तिनें आपले निस्तेज डोळे उघडले. त्याच्या—विरागच्या डोळ्यांत पाणी !

तिला भडभडून आलें. " विराग ! "

" अचल, ज्यांवर ज्यांवर मी प्रेम केलें त्यांची माझ्यापासून फारकत होत आली आहे ! " त्याच्या ओठांवर आलेले शब्द माघारे फिरले !

" विराग, नाहीं. तुमचं कांहीं चुकलं नाहीं. "

" अचल, तुझंही चुकलं नाहीं. कशी खात्री करूं ? "

" विराग, तुमचें—माझें—कोणाचें कांहीं चुकलें नाहीं पण काय करूं ? या देहकोषांत मुरलेले पिढ्यानुपिढ्यांचे संस्कार मला गुदमरवून टाकीत आहेत. "

" त्यांतून बाहेर ये. "

" त्यासाठींच धडपडतें आहें. "

" वाऱ्यावादळांतून झगडणं हेंच जीवित आहे. "